साप्ताहिक

# माणूस

११ मे ८५/दोन रुपये

अडोस-पडोस/खानदान/इधर-उधर
पेईंग गेस्ट/अपराधी कौन?
ये जो है जिंदगी

आणि

## हम लोग

## दूरदर्शनला 'प्रायोजित' कार्यक्रमांचा धक्का!



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : पन्नासावा

११ मे १९८५
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५, सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

पुणे । मॅजेस्टिक

## शंकर पाटील – रंगलेल्या गप्पा

साहित्य संमेलनाध्यक्ष शंकर पाटील याची मॅजेस्टिक गप्पामध्ये प्रा. भालचंद्र फडके, स. शि. भावे व द. मा. मिरासदार यांनी मुलाखत घेतली. (दि. २ मे)

मिरासदार व पाटील एका पिढीतले व जिवाभावाचे दोस्त. तेव्हा मिरासदारांनी ओळख करून देतानाच, पाटलांच्या 'कथा-अकलेच्या कांद्याची' व 'लवंगी मिरची कोल्हापूरची' या लोकनाट्यांवर 'पाटलानी 'कांदा' व 'मिरची' यावर मडईतील व्यापाऱ्यापेक्षा जास्त पैसा कमवलाय' अशी खुशखुशीत सुरुवात केली. त्यावेळी मिरासदार यांनी शंकर पाटलाच्या मूळ गावी, त्यांची साहित्य समेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतरचा सत्काराचा प्रसंगही सांगितला. 'काही तरी निवडून आला.' या भावनेतून त्या लोकांचा उत्साह अमाप होता असं ते म्हणाले.

यावेळी पहिला प्रश्न मिरासदारानी विचारला. तेव्हा शंकर पाटील यांनी प्रथम चांगली ओळख करून दिल्याबद्दल मित्राचे आभार मानले आणि काही ठिकाणी कशी पचाईत ओळख करून देणाराची व घेणाराची होते याचे किस्से सांगितले.

गाव, बालपणाचे संस्कार याविषयी बोलताना पाटील म्हणाले, 'मला ग्रामीण शब्दाचा शोध घ्यावा लागत नाही. लिहिताना सूर लागतो. शब्दयोजना आवर्जून करावी लागत नाही. कारण बालपणातच जन्मभर पुरेल इतकी शिदोरी मिळालीय...खेडं तसं लहान पण त्याचं रिकामपण फार मोठ. सुगी संपल्यानंतर माणसानी फुलणारे पार, ओटे यांतून गावच्या गोष्टी कळतात.'

ग्रामीण-शहरी हे भेद समीक्षकांनी आपल्या सोयीसाठी पाडलेले आहेत; पण सर्व साहित्य हे एकच असते असे सांगून ते म्हणाले, 'ग्रामीण माणसं फार शोषिक ..वगैरे हे समीक्षक, वाचक यानी करून घेतलेले समज आहेत; पण माणूस इथून–तिथून सारखाच. फक्त त्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या आहेत. इथं खेड्यातली माणसं फार भावनाप्रधान असतात. अगदी सात–आठ दिवसांसाठी पोरगं परीक्षेकरता तालुक्याला निघालं तरी चार वेळा 'जपून रं बाबा...असं सांगतील. अशा स्वरुपाची कथांमधली घालमेल ही मला गावानंच दिलीय.

मुलाखत रंगू लागली. प्रा. फडक्यांनी पाटलांच्या आंतरजातीय विवाहाचा नाजूक प्रश्न विचारला. तेव्हा गावात वाळीत टाकणं सहज शक्य होतं. तसं शहरात नसतं. ही आजची समाजव्यवस्था आहे असं सांगितलं.

प्रत्येक लेखकाची ज्याची–त्याची भाषा असते. त्यामुळे आपल्या नावामागील ग्रामीण हे विशेषण आपल्याला खटकत नाही असे स शि. भावेंच्या प्रश्नाला उत्तर देऊन भाषेच्या वेगळेपणाबद्दल ते म्हणाले, 'गाडगीळ, गोखले...श्री. ज. जोशीपर्यंतच्या कथा पाहा. त्या प्रमाण भाषेत नाहीत. त्यांच्या–त्यांच्या भाषेत आहेत. आता आमच्या ग्रामीण भाषेत काही रचनाच अशा असतात की त्यांचा अर्थ प्रमाणभाषेत पूर्णत: स्पष्ट करणे अतिशय अवघड असते. अगदी उदाहरणार्थ हेच पाहा. मी पदवी पास झाल्यावर गावाला गेलो. तेव्हा शेजारची काकू म्हणाली 'आज जर तुजी आई आसती तर भिंगरीवानी नाचली असती बग !' हे प्रमाणभाषेत 'आज जर तुझी आई असती तर तिला फार आनंद झाला असता...!' असं करावं लागेल पण '.. भिंगरीवानी नाचली असती' याचा मनावरील परिणाम '...आनंद झाला...' यान साधला जाणार नाही.'

ग्रामीण जीवन हे मात्र नंदनवन असावं असं सांगून आपल्या विनोदी कथांबद्दल श्री. पाटील म्हणाले, 'मी कथा विनोदी लिहायची म्हणून लिहित नाही. समाजातील, माणसांच्या प्रवृत्तीमधील विसंगती जशाच्या तशा मांडतो. 'शाळा', 'नाटक', 'मिटींग' या अशाच कथा आहेत. तर 'आफत' ही

तशीच. वर्तमानपत्रातील एक मुलगा हरवला आहे या जाहीरातीवरून ती सुचली. असं जर झालं तर अज्ञान, शका यामुळं खेड्यातील माणस कशी वागतील याचं चित्रण त्यात केलय. तसच 'टारफुला' कादंबरीच. तिच्या वास्तव नायकाला भेटायला गेलो. ते गृहस्थ त्यावेळी तीन खून पचवलेले व सभापती पदावर होते. त्यानी आम्हाला 'च्या' सागितला. स्वत काहीच घेईनात. म्हणून मी आग्रह केला. तेव्हा ते म्हणाले, 'साखर, मीठ नसल्याल सरबत घेतो' मी 'अस का?' म्हणून विचारताच ते गृहस्थ उत्तरले, 'आमी साकार, मीठ खायचं सोडून दिलंय. मानूस लई तामसी बनतं म्हनूनश्यान!' अशा किती तरी विसगती आढळतात

समीक्षक वा. ल. कुलकर्णी यानी आपल्या सत्यकथेतील 'वेणा' कथेमधील स्त्रीचित्रणाला अनन्यसाधारण म्हणून गौरविले. तसेच श्री. पु भागवत याच्या मार्गदर्शनाने स्त्री–जीवन चित्रणाला उत्कटता लाभली असे सागून श्री. पाटील म्हणाले, 'वेणा' कथेनंतर तब्बल सात वर्षे सत्यकथेबाहेर साहित्य प्रसिद्ध न करण्याचे गवयाच्या रियाझासारखे व्रत पाळले. पुढे श्री. पु. नी हेमिंग्वे वाचायला सागितला. त्यामुळे वाचनाला दिशा मिळाली. तसच माझ्या थोरल्या बहिणीला 'माणस टिपण्याची' ताकद लाभली होती. ती मुद्दाम माझ्यासाठी काही व्यक्तिरेखा ध्यानात ठेऊन मला आवर्जून सागायची त्या मधूनच 'भुजग', 'सारवण' या कथा जन्माला आल्या.

आपणाला चित्रपटकथाकडे अपघाताने वळावे लागले असे सागून ते म्हणाले, १९५९ साली आकाशवाणीची नोकरी सोडून ९ वर्षे मुक्त लेखन केले. तो सुवर्णकाळच होता! पण नतर लगेच 'आभार' कथासग्रहाला राज्य पारितोषिक मिळाल्यानतर त्यातील 'वावटळ' कथेवर निर्माते ना. बा. कामत यानी पत्र पाठवून, हट्टानेच माझ्याकडून चित्रपटकथा लिहून घेतली. त्यावेळी मी इतका गुतडला गेलो की चित्रपटाच्या शॉटसाठीही माझं 'ओ...के' लागायच. ते चित्र कोसळल. मग इतका अफाट खर्च वाया जातो ही जाणीव मनाला बोचू लागली. नतर 'केला इशारा...' लिहिल ते वर चालल.'

चित्रपटकथा लिहिताना फार कुचबणा होते, तडजोड करावी लागते असे सागून श्री. पाटील म्हणाले, 'चित्रनिर्माते अनेकदा स्वत.च प्रमुख चित्रबीज घेऊन येतात. अस ...अस लिहा म्हणून सांगतात. त्यात एकाच झाडाच्या एका फादीवर गुलाब, एका फांदीवर जाई, तर एका फादीवर झेडू फुलवावा, कुणाला आवश्यक वाटल तर एका फादीवर धोतराही फुलवावा लागतो. एकूण चित्रपट हा व्यवसाय आहे.'

अखेरीस आज चित्रपटकथासाठी चर्चा, वाद, यासाठी भरपूर वेळ खर्च होतो. चित्रसृष्टीने गिळकृत केल्याने आपल्या लेखनावर बराच प्रतिकूल परिणाम झाला आहे ही खत श्री. पाटील यानी बोलून दाखवली.

दोन समीक्षक व एक मित्र याच्या भडिमारातून सुटका झाल्यावर पाटलानी अखेरीस 'टाकीचे घाव' ही आपली कथा सागून कार्यक्रम सपविला

—पांडुरंग गायकवाड


## मुलांना त्यांच्या आनंदविश्वात आणि पालकांना त्यांच्या हरवलेल्या बालपणात नेणारी

### मराठी बालकुमार साहित्य-संमेलन पुरस्कृत

# राजहंस पुस्तक हंडी

**ज्ञान आणि मनोरंजनाचा एक अनोखा सप्ताह**

मे महिन्याची सुटी छंद, शिबीर, सस्कार वर्ग असे अनेक कार्यक्रम घेऊन येते. राजहंस प्रकाशनाने या सुटीत आणलीय एक आगळी-वेगळी भेट. ही भेट आहे अभ्यासाने शिणलेल्या मुलांसाठी, तसेच सुटीतील त्यांच्या उचापतीनी हैराण झालेल्या पालकासाठीसुद्धा.

या पुस्तक-हंडीत शेकडो-हजारो पुस्तके असतीलच पण त्या जोडीला तुमच्या आवडत्या लेखक, चित्रकार, कवी, खेळाडूच्या सहवासात तुम्ही या पुस्तकांची मौज लुटू शकाल.

एकेक संध्याकाळ रोज रंगणार आहे साहसकथांनी, काव्यगायनांनी, गमतीदार गोष्टींनी, बाल-गाण्यांनी, आणि बुद्धीला छेडणाऱ्या अनेक स्पर्धांनी.

ही पुस्तकहंडीची लयलुट चंदू-नंदू आणि नंदा-मंदासाठीच नाही तर त्याच्या आई-बाबांसाठीही आहे, कारण मुलांचे विश्व, त्यांच्या आवडी-निवडी, त्यांचा खेळ, त्यांचा अभ्यास या विषयी पालकांशी बोलणार आहेत बालमनाचा अभ्यास केलेलेली काही जाणकार मंडळी.

**तेव्हा चला आता पुस्तकांच्या दुनियेत**

**अल्लाउद्दीनच्या एका नव्या गुहेत**

**वेळ : ११ मे ते १८ मे पर्यंत रोज सायंकाळी ५॥ वाजता**

**जागा : भावे प्राथमिक शाळेचा नवा भव्य हॉल**

रेणुका स्वरूपच्या शेजारी, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

पुस्तक प्रदर्शन व विक्री स. ९ ते १ दुपारी ४ ते ८

**राजहंस प्रकाशन । पुणे ३०**

# मुंबापुरी ते गोहाटी.... गुवाहाटी

विष्णू जयदेव

गेले दोन आठवडे तुमची गाठभेट नाही. तुम्हाला वाटत असेल मुंबापुरीतील असह्य उकाड्यामुळे ह्याची लेखणी गार पडली असावी. खरं म्हणाल तर अशा हवेत दुसऱ्याची निंदा करण्यास फारसा उत्साह वाटत नाही. दुसरे म्हणजे ह्या काळात आम्ही गोहाटी येथील इंडियन फेडरेशन ऑफ वर्किंग जरनॅलिस्ट ( आय्. एफ्. डब्ल्यू. जे. ) च्या अधिवेशनाला गेलो होतो. त्यामुळे मुंबापुरीशी आमचा संपर्क तुटला होता.

आसाम आणि पंजाब ह्यावर आता काही लिहायची सोय राहिली नाही घासून गुळगुळीत झालेले हे विषय आहेत. एक राजकीय नेते सोडले तर शाळकरी पोरेसुद्धा आसाम आणि पंजाबचे प्रश्न कसे सोडवावे ह्यावर वृत्तपत्रे आणि मासिकात आलेले उपाय घडाघडा म्हणून दाखवतील

यामुळेच अधिवेशनासाठी मुंबापुरीहून निघालो,त्यावेळी आसाममधील आंदोलनावर काही लिहावे असा विचार नव्हता.

परंतु गेल्या पाच वर्षांहूनही अधिक काळ ऑल आसाम स्टुडंटस् यूनियन (आसू) ने चालविलेल्या चळवळीने राज्य आणि केंद्र सरकारच्या तोंडचे पाणी पळविले आहे या चळवळीबद्दल मात्र उत्सुकता होती चौऱ्याहत्तरमध्ये गुजरातमधील नवनिर्माण आंदोलनानंतर विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे चालविलेला वेगळ्या प्रकारचा हा दुसरा संग्राम. त्यातल्या काही नेत्यांना प्रत्यक्ष भेटायची इच्छा होती.

मुंबईहून गोहाटीला पोहोचायला तीन रात्री दोन दिवस लागतात संमेलनाला संपूर्ण देशातून २५० प्रतिनिधी येतील अशी गोहाटी पत्रकार संघाची अपेक्षा होती. प्रत्यक्षात ५०० प्रतिनिधी आले कामरूप एक्सप्रेस कलकत्त्याहून सुटली तेव्हा पत्रकारासाठी खास बोगी जोडण्यात आली होती बरेचसे प्रतिनिधी एक दोन दिवस आधीच गोहाटीत पोहोचले होते. मी ज्या दिवशी कलकत्त्याहून निघालो त्या गाडीत महाराष्ट्र (नागपूर, पुणे, मुंबई) आंध्र आणि केरळ येथील पत्रकार होते.

रात्रीचा प्रवास म्हणजे खाण्यापिण्याची व्यवस्था हवी काही पत्रकारांनी कलकत्त्याहून निघण्याआधीच पिण्याची व्यवस्था करून ठेवली होती युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नागपूरच्या अधिवेशनात दारू पिऊन धुमाकूळ घातला. ह्याबद्दल पत्रकारांनी त्यांना धारेवर धरले ह्याच नागपुरातील एका ज्येष्ठ पत्रकाराचा मद्यप्राशनात पुढाकार होता. कोणत्याही छोट्यामोठ्या स्थानकावर गाडी थांबली की, हे पत्रकार येणारी-जाणारी बायकामुले, गाईगुरे यांच्याकडे पाहून हातवारे करीत मधल्या एका छोट्या स्थानकावर गाडी थांबली असता हे ज्येष्ठ पत्रकार पाणी पिण्यासाठी खाली उतरले. ते डब्यापासून दोन हात दूर असतील तोवर गाडी सुरू झाली. त्यांना सहज दोन ढेंगात गाडी पकडणे शक्य होते, पण ते जागचे हलले नाहीत. त्यांनी बरोबरच्या पत्रकारांना साखळी ओढायला सांगितली. पाच–सहा पत्रकार साखळीला लोंबकाळले साखळी तुटली. गाडी स्थानकातून बाहेर पडता पडता थांबली. गार्ड खाली उतरून काय घडले आहे ते पहायला डब्यापर्यंत आला. पत्रकारांनी त्याला ठणकावून सांगितले 'वुई आर जर्नॅलिस्ट'. गार्ड त्याच्या डब्याकडे परत गेला अर्ध्या तासाचा खोळंबा झाल्यावर गाडी सुरू झाली.

Journalists are the holiest of the holy cows. They connot be punished.

## 'सरकारी' स्वातंत्र्य

हितेश्वर सैकियांच्या सरकारला आसामच्या लोकांमध्ये स्थान नाही आसूने निवडणुकांवर बहिष्कार टाकला असल्याने काँग्रेस आयचे हे सरकार अनधिकृत सरकार मानले जाते. जनमानसात आपली प्रतिमा उजळ रहाण्यासाठी सैकिया आणि त्यांच्या मंत्रिमंडळाची सतत धडपड चाललेली असते' आय्एफ्डब्ल्यूजेच्या अधिवेशनासाठी लाख–दोन लाखांची देणगी सैकियांनी दिली अधिवेशनाच्या उद्घाटनाला सैकियांना निमंत्रण देण्यात आले हे आसूच्या नेत्यांना रूचले नाही. आंदोलनाला सहानुभूती असणारे, आसाममधील काही पत्रकार संमेलनापासून दूर राहिले हे माझ्या नंतर लक्षात आले

गोहाटीमधील वातावरण पूर्वीइतके तंग नाही; पण जागोजागी पोलीस आणि एस. आर पी. यांचा पहारा दिसतो मंत्री जेथे जेथे जातात तेथे तर कडेकोट बंदोबस्त असतो. सैकिया असेच कडेकोट बंदोबस्तात उद्घाटनाला आले. रविंद्रभवनसमोर त्यांची गाडी थांबली तेव्हा रस्त्यावर शुकशुकाट होता त्यांनी भाषण वाचून दाखवले. भाषणाबाबत लिहिण्यासारखे काहीच नाही. आसाममध्ये पत्रकारांना लेखनस्वातंत्र्य दिले जाते आणि लोकांच्या मूलभूत हक्कांची कशी जपणूक केली जाते याचे त्यांनी वर्णन करून सांगितले

गोहाटीमधून निघण्यापूर्वी 'सेंटिनल' ह्या इंग्रजी वृत्तपत्राचे संपादक यांच्या घरी मी चर्चेसाठी बसलो असता त्यांनी सैकियांच्या या भाषणाचा उल्लेख केला ते म्हणाले, दोन महिन्यापूर्वीच 'दैनिक आसाम'च्या शिवसागर येथील प्रतिनिधीला पोलिसांनी मारहाण केली एका आसामी साप्ताहिकाच्या कार्यालयावरही ह्या काळात धाड घालण्यात आली होती

सैकियांचे भाषण तब्बल दहा–बारा पानी होते. त्यामुळे कटाळून मी रविंद्रभवनातून बाहेर पडलो रविंद्रभवनापासून थोड्या अंतरावर डिस्ट्रिक्ट लायब्ररी होती. या वाचनालयाची स्वतंत्र मोठी इमारत आहे. पुस्तकेही मोठ्या प्रमाणावर आहेत. मी आसामच्या प्रश्नावर गेल्या पाच वर्षात काही पुस्तके लिहिली गेली आहेत का, याची चौकशी केली तेव्हा मला दहा रुपयांचे एक जुने पुस्तक काढून देण्यात आले. मी प्रमुख ग्रंथपाल बिपिन बरुआ ह्यांना भेटलो. त्यांच्याशी बोलताना म्हटले, एव्हढ्या मोठ्या ग्रंथालयात आंदोलनावर इतके कमी साहित्य कसे काय ? त्यावर ते म्हणाले, 'हे सरकारी ग्रंथालय आहे, त्यामुळे आंदोलनावरची पुस्तके ठेवायला सहसा परवानगी मिळत नाही.'

मी रविंद्रभवनात परत येईपर्यंत सैकिया भाषण आटोपून परतही गेले होते.

## संकोच कसला ?

तीन दिवसाचे अधिवेशन संपल्यावर गोहाटीत करण्यासारखे काहीच उरले नव्हते. आम्ही सात–आठ पत्रकारानी काझीरगा येथील गेंड्याचे अभयारण्य पाहावे असा विचार केला. प्रत्येक पत्रकाराने एकदा तरी गेंडा पहावा असे मला पहिल्यापासून वाटत आले आहे. आमच्या बरोबर पुण्याचे दोन आणि दिल्लीचे दोन पत्रकार होते. काझीरंगाला जाण्याचा मार्ग नौगाववरून जातो. आम्ही दुपारी दीड दोनच्या सुमारास गोहाटीमधून मिनी बसने नौगावला निघालो. नौगावच्या सर्किट हाऊसवर पोहोचेपर्यंत सध्याकाळचे सहा वाजले. आसाममध्ये अंधार लवकर पडतो. शक्यतो रात्री जेवणाच्या वेळेस काझीरगा येथे पोहोचावे असा विचार होता.

सर्किट हाऊसवर चहा घेऊन होतोय तोवर तेथल्या प्रसिद्धी अधिकाऱ्याने आम्हाला सागितले की, नौगावच्या कॉंग्रेस आयचे पुढारी लक्ष्मीप्रसाद ह्याना पत्रकाराना भेटण्याची इच्छा आहे. ते म्हणाले की, सुदैवाने आसामच्या शिक्षण आणि पर्यटन खात्याचे मत्री मुकुल शर्मा हे ही लक्ष्मीप्रसाद ह्याच्या घरी उतरले आहेत. त्यानाही पत्रकार परिषद घ्यायची इच्छा आहे. एकूण रागरग पाहिल्यावर जेवण्याच्या वेळेस काझीरगाला पोहोचण्याची काही शक्यता दिसत नव्हती; पण पर्यटन खात्याचेच मत्री भेटत असल्याने पुढल्या प्रवासासाठी आणखी एक जीप मिळण्याची शक्यता होती.

सर्किट हाउसपासून लक्ष्मीप्रसाद याचे घर दहा मिनिटावर होते. आम्ही चालत निघालो. आसाममध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत लक्ष्मीप्रसाद कॉंग्रेस आयचे उमेदवार होते. त्याच्याविरुद्ध कॉंग्रेस एसचे डी. के. बरूआ उभे होते. नौगाव मतदारसघातील ४७ ठिकाणी मतपेट्या पोहोचल्याच नाहीत, त्यामुळे निवडणुकीची नव्याने तारीख निश्चित करण्यात आली. मधल्या काळात नेल्लीचे हत्याकाड घडून आले. त्यामुळे निवडणुकीचे निकाल राखून ठेवण्यात आले.

मुकुल शर्मा लक्ष्मीप्रसाद याच्या घरी आले असल्याने बाहेर कडेकोट पोलीसबदोबस्त होता. घराबाहेर मोठा मांडव घालण्यात आला होता आणि लोकाची बरीच गर्दीही जमली होती. लक्ष्मीप्रसाद साठीच्या जवळपास असतील त्यानी बाहेर येऊन पत्रकाराना नमस्कार केला. नतर बोलताना आम्हाला कळले की, लक्ष्मीप्रसाद याची पत्नी तेरा दिवसापूर्वी आजारपणामुळे मृत्यू पावली होती. आम्ही त्याच्या घरी गेलो तो तेरावा दिवस होता. त्यानी जेवण्याचा आग्रह धरला. सर्वांनाच सकोचल्यासारखे झाले. ज्या व्यक्तीला आपण उभ्या आयुष्यात कधी पाहिले नाही तिच्या श्राद्धाला कसे काय जेवायला बसायचे? पण लक्ष्मीप्रसाद ऐकायला तयार नव्हते. मुकुल शर्मा याचा पत्रकार परिषद घेण्याचा आग्रहही कायम होता त्याना भेटल्याशिवाय जीप मिळण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे जेवायला बसणे भागच पडले. जेवण आटोपल्यावर अर्धा तास मुकुल शर्मा याची पत्रकार परिषद झाली. त्यानी आसामच्या पर्यटन खात्याबद्दल माहिती दिली. अखेर दुसऱ्या जीपचीही व्यवस्था झाली

लक्ष्मीप्रसाद याच्या घरून निघेपर्यंत आठ वाजले. आमच्यापैकी एका पत्रकारास हा सगळा सोहळा कशासाठी आहे याचा पत्ता लागला नव्हता एक तर प्रवासाचा शीण होता आणि भूकही जबरदस्त लागली होती. निघताना इतराप्रमाणे त्यानीही लक्ष्मीप्रसाद याचा निरोप घेतला. जेवणाची वारेमाप स्तुती केली आणि विचारले, 'The food was wonderfool Mr. Laxmiprasad. But what was the occasion?'

काझीरगाहून परतल्यावर गोहाटीमधील एका आसामी पत्रकार मित्राला मी हा प्रसग सागितला. ते म्हणाले, 'तुम्हाला सकोचण्याचे कारण नाही. For Assamee politicians press is next to god.'

## नेल्लीची 'स्टोरी'

नौगावला जाण्याचा मार्ग नेल्लीवरून जातो. नेल्ली आता पत्रकाराचे तीर्थस्थान झाले आहे. राष्ट्रीय आणि आतरराष्ट्रीय पत्रकार नेल्ली रीव्हिझिटेड–नेल्ली रीरीव्हिझिटेड अशा स्वरूपाचे लेख वृत्तपत्रातून–मासिकातून लिहीत असतात. मिनी-बसच्या वाहकालाही गाडीत पत्रकार आहेत हे माहीत असल्याने त्याने नेल्ली येताच बोट दाखवून म्हटले, 'ही नेल्ली !'

वृत्तपत्रातील आकड्यानुसार एकूण १,५०० ते २,००० माणसे ह्या हत्याकाडात बळी पडली, पण आसपासच्या लोकाचे म्हणणे होते की, कमीत कमी ४,००० माणसे तरी मारली गेली असतील.

सबिता गोस्वामी ह्या ब्लिट्झ साप्ताहिकाच्या गोहाटी येथील वार्ताहार आहेत. त्या बीबीसी आणि असोशिएटेड फ्रेंच प्रेस (एएफपी) या वृत्तसंस्थेसाठी देखील काम करतात. गोहाटीमधील वास्तव्यात मी त्याच्या घरी जाऊन येऊन असे त्यानी ह्या हत्याकाडाबद्दल बोलताना काही उद्बोधक घटना सागितल्या. त्या म्हणाल्या, 'हत्याकाड झाले त्याच्या दुसऱ्या दिवशी नेल्लीला पोहोचले. ह्या लोकाच्या दारिद्र्याची तुला कल्पना येणार नाही. बायका मुले मिळून मी स्वत: ६०० प्रेते मोजली आणि मग जेवणावरची वासनाच उडाली. जागा दाखविण्यासाठी गावातलाच एक मुलगा आमच्याबरोबर होता. त्याच्या कुटुबातलीही माणसे ठार मारण्यात आली होती आम्हाला प्रेते दाखवता दाखवता निर्विकारपणे तो प्रेताच्या पायातले जोडे चपला काढून घेत होता.

जेवताना आमच्याबरोबर गावातलीच एक मुसलमान बाई होती. जेवण अर्ध्यावर आले असताना एका प्रेताची ओळख पटवण्यासाठी तिला बोलावणे धाडण्यात आले. तिने जवळ जाऊन चेहेरा निरखून पाहिला आणि मग म्हणाली, 'हा माझा नवरा आहे.' ओळख पटल्यावर ती शातपणे परत जेवायला येऊन बसली.

'दारिद्र्याच्या एका पातळीखाली जगणे हीच इतकी महत्वाची क्रिया होऊन बसते की क्रौर्य, दया, माया किंवा मानवी संबध ह्याना काहीच अर्थ उरत नाही. या सगळ्या मध्यमवर्गीय सकल्पना बनतात.' त्या म्हणाल्या.

'तुम्ही हे सगळे लिहिले का नाहीत?' मी त्याना विचारले. त्या हसल्या, 'तुला ठाऊक आहे ह्यूमन स्टोरी म्हणजे काय लिहायचे असते ते !

## पुन्हा पुन्हा, तेच तेच !

अधिवेशन सुरू असताना आसूच्या काही नेत्यांनी पत्रकाराशी बोलण्याची इच्छा व्यक्त केली होती, पण आयोजकाकडून त्याना परवानगी देण्यात आली नाही असे मला नंतर कळले. अधिवेशन सपल्यावर एक दिवस पत्रकाराना शिलांग दाखवून आणण्याचा विचार होता. शिलांगला जाण्याच्या आदल्या दिवशी आसाम ट्रिब्यूनच्या सहसंपादकाशी बोलत असताना त्यानी सागितले की, शिलांगहून परत येतेवेळी आसूचे कार्यकर्ते बहुधा पत्रकाराच्या बसेस वाटेत अडवतील आणि पत्रकार परिषद घेतील. ही योजना गुप्त रहावी अशी त्याची इच्छा होती. परतु नेमके परत येताना वाटेत भर रस्त्यात कोळशाने भरलेला ट्रक उलटला आणि त्याने रहदारीचा चारपाच तास खोळवा केला. रात्री आठ ऐवजी बसेस सकाळी दोनपर्यंत गोहाटीला पोहोचल्या. त्यामुळे ही पत्रकार परिषद काही झाली नाही.

गोहाटी हेच आदोलनाचे प्रमुख केद्र आहे. आदोलनाशी सबधित प्रमुख माणसे गोहाटीतच आहेत. पण अजूनही गोहाटी विद्यापिठाला भेट देणे शक्य झाले नव्हते. मी दुसऱ्या दिवशी मुबईला निघण्याऐवजी एक आठवडाभर मुक्काम वाढविण्याचा विचार केला.

आदोलनाच्या प्रमुख नेत्यापेक्षाही मला सर्वसामान्य आसामी लोक, आदोलनाशी सबधित लेखक–विचारवत अशा लोकाना भेटण्याची इच्छा होती नेते मडळींना पत्रकाराची इतकी सवय झालेली असते की, त्याच्याकडून नवीन असे काहीच मिळत नाही. तीच तीच विधाने ते पुन्हा पुन्हा करतात आणि छापील पत्रके हातात कोंबतात.

## आसूतली लोकशाही

पूर्वी गोहाटी शहरातील कॉटन कॉलेज हे आसूच्या चळवळीचे केंद्रस्थान होते. पण पोलिसानी आणि एस्. आर. पीनी विद्यार्थ्यांना ह्या कॉलेजमधून हुसकावून लावल्यानंतर त्यानी गोहाटी विद्यापिठाचा आसरा घेतला. विद्यापिठात जायला गोहाटी हायकोर्टापासून बस मिळते. विद्यापीठ शहरापासून थोडे दूर आहे. परिसर मोठा आहे. प्रत्येक इमारतीमध्ये अंतरही जास्त आहे. मी सकाळीच विद्यापिठात पोहोचलो, तेव्हा कँटीनमध्येही फार तुरळक विद्यार्थी होते. विद्यापिठाच्या बाहेर आसूची मोठी पाटी लावलेली होती. आसूचे प्रमुख कार्यालय हे विद्यापिठाचेच एखादे कार्यालय असल्यासारखे दिसत होते. पहिल्या दिवशी मी गेलो तेव्हा कार्यालयात कोणीच नव्हते. ह्या दिवसात विद्यापिठात फारसे कुणी भेटणार नाही ह्याची मला स्थानिक वृत्तपत्रांवरून कल्पना आलेली होती. आसाममध्ये नव्याने मतदार यादी तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले होते ह्यासाठी परकी नागरिकाना हुडकून काढण्याचे काम आसूने हातात घेतले होते. विद्यार्थ्यांना हे काम करणे शक्य व्हावे म्हणून आसूने ४ एप्रिल ते २८ एप्रिलपर्यंत विद्यापीठ बद ठेवण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे निम्म्याहून अधिक विद्यार्थी वसतिगृह सोडून गेले होते. माझ्या आठवडाभराच्या वास्तव्यात मी अधून मधून विद्यापिठात जाऊन येऊन राहिलो. त्यामुळे तशा स्थितीतही बऱ्याच विद्यार्थ्यांशी बोलणे शक्य झाले

विद्यापीठाच्या आवारात एकूण १९ वसतिगृहे आहेत. म्हणजे जवळजवळ १,८०० ते २,००० विद्यार्थी वसतिगृहात रहातात. आता विद्यापीठच बद असल्याने वसतिगृहेही ओस पडली होती. आसुचे पदाधिकारी असलेल्या विद्यार्थ्यांशी चर्चा ही विद्यापीठाच्या कँटीनमध्ये अथवा वसतिगृहाच्या खोल्यामध्ये होत असे. आसुचे सध्याचे अध्यक्ष प्रफुल्लकुमार मोहतो आणि कार्यकारी सचिव बिघू फुकन हे दोघेही मतदार यादीच्या कामानिमित्त गोहाटीबाहेर असल्याने त्याची भेट घेणे मात्र शक्य झाले नाही चर्चेतील विषय बहुधा आसुची कार्यपद्धती, चळवळीचे सध्याचे स्वरूप, सरकारचे धोरण असे असत.

आसुच्या सध्याच्या कार्यकारी मडळाचे एकूण ४४ सभासद आहेत. हे सारे सभासद लोकशाही पद्धतीने निवडले जातात असे विद्यार्थ्यांचे म्हणणे होते. मी सभासदाची यादी पाहिली. त्यात एकही स्त्री प्रतिनिधी नव्हता. लोकशाही पद्धतीने निवडणुका होऊनही एकही स्त्री प्रतिनिधी कसा नाही ह्याची मी विचारणा केली. तेव्हा कोणीच समाधानकारक उत्तर दिले नाही. आसुने जेव्हा तेलाची निर्यात रोखण्याचा निर्णय घेतला होता तेव्हा त्यात स्त्रियाचा प्रचंड सहभाग होता. ह्याप्रसगी झालेल्या लाठीमारात स्त्रियाही जखमी झाल्या होत्या. आसामच्या राज्यपालांनी तर मागे एकदा आरोप केला होता की, आंदोलक स्त्रियाच्या मागे दडून लाठीमारापासून स्वत ला वाचवित आहेत.. ह्यात सपूर्ण तथ्य असेल असेही नाही, पण आसुच्या नेत्याकडे ह्या प्रश्नावर समाधानकारक उत्तर नव्हते. म्हणून मी ह्या मुद्द्याचा फारसा पाठपुरावा केला नाही. एका विद्यार्थ्याने तर चक्क ‘ I don't think women are capable of fighting such an agitation. ’ असे उत्तर दिले.

आसाममध्ये आसुखेरीज गणसग्राम परिषद, जातीयवादी दल वगैरे बऱ्याच संघटना आहेत आसुच्या विरुद्ध असलेल्या ऑल आसाम मुस्लिम स्टुडंटस् युनिअन, ऑल आसाम इलेक्टेड स्टुडंटस् रेप्रेझेंटेटिव्हज् असोसिएशन्सारख्या सघटनाही आहेत आणि तरीही आसामचा प्रश्न जर पुढे मागे सुटलाच तर तो आसुला वगळून सुटणे शक्य नाही, हे आसाममधील प्रत्येकाशी बोलताना जाणवते. परतु याचा अर्थ ही संघटना म्हणजे सात्विकतेचा अर्क नव्हे.

राजश्री गोस्वामीशी माझी भेट गोहाटी विद्यापीठाच्या आवारात झाली. ती नुकतीच बी. ए. पास झाली होती आणि आता सपूर्ण इंग्रजी घेऊन विद्यापीठातून एम. ए. करायची तिची इच्छा होती. राजश्रीचा चळवळीला पाठिंबा होता; पण ती आसुची सभासद मात्र नव्हती. ज्या प्रकारे ही चळवळ चालवली जाते त्याबद्दल मात्र तिने नाराजी व्यक्त केली.

‘ AASU has become an extra constitutional authority.’ ती म्हणाली, एम. ए. साठी प्रवेश घेताना आसुच्या वेगवेगळ्या फंडासाठी तिला विद्यापीठाच्या फी खेरीज एकूण ८० रुपये भरावे लागले. ‘तुम्ही आसुचे सभासद असलात नसलात तरी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकाला हे डोनेशन देणे भाग पडते. विद्यापीठाच्या प्रत्येक निर्णयात आसु हस्तक्षेप करू शकते. आसामच्या तीन विद्यापीठापैकी जोरहाट येथील शेतकी विद्यापीठ आणि दिब्रूगढ येथील विद्यापीठ चालू आहेत. फक्त गोहाटी विद्या-

पीठ आसुने बंद ठेवले आहे आसुने विद्यापीठ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला तर तिला अडवण्याचे धैर्य विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांमध्ये नाही.

मी विद्यार्थ्यांना हा प्रश्न विचारला तेव्हा ते म्हणाले की, आमच्यापेक्षाही आसामचे भवितव्य अधिक महत्त्वाचे आहे. गेल्या पाच वर्षातील ह्या लढ्यामुळे विद्यार्थ्यांची एक–दोन शैक्षणिक वर्षे वाया गेली असली तरी आसामला वाचविण्यासाठी हा आमचा शेवटचा लढा आहे. वारंवार विद्यापीठ बंद केल्यामुळे शैक्षणिक वातावरण दूषित होते. हे मान्य केले तरी आसुच्या नेत्यांना हा त्यांच्या त्यागाचाच एक भाग वाटतो.

आसुचा फायनान्स सेक्रेटरी कालिता याने बोलताना मला सांगितले की, ह्या दिवसात युनिअनचा दिवसाचा खर्च ३,००० रुपये आहे. बराचसा खर्च हा प्रवास आणि परकीय नागरिक शोधून नव्या यादीसाठी हरकती नोंदवण्यासाठी होतो. आसला देणग्या मोठ्या प्रमाणावर मिळतात असे तो म्हणाला. विद्यार्थी पैसे स्वखुषीने देतात, संघटनेची त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती नाही असे त्याचे म्हणणे होते.

## हिरेन गोहाय...

गोहाटीमधील मॉडर्न बुक डेपोमध्ये पुस्तके चाळत असताना स्पेक्ट्रम पब्लिकेशन ह्या प्रकाशन संस्थेने गोहाटी विद्यापीठातील प्राध्यापक हिरेन गोहाय यांचे नुकतेच छापलेले ' Assam, a burning question ' हे पुस्तक पहाण्यात आले. हिरेन गोहाय यांच्याबद्दल मी आधीही मुंबईत असताना ऐकले होते. कलकत्ता येथून प्रसिद्ध होणाऱ्या टेलिग्राफ ह्या वृत्तपत्रामध्ये आसामविषयी त्यांनी लिहिलेल्या लेखांपैकी काही लेख ह्या पूर्वी माझ्या वाचनात आले होते त्याचे नवे पुस्तक हे ह्याच लेखांचे संकलन करून तयार करण्यात आले होते

प्राध्यापक गोहाय यांचा पत्ता मी प्रकाशकाकडूनच मिळवला. गोहाटी विद्यापिठाच्या परिसरातच टेकडीच्या पायथ्याशी एकांतात त्यांचा बंगला आहे. मी सकाळीच त्यांच्या घरी गेलो पुस्तकाला त्यांनी लिहिलेली दीर्घ प्रस्तावना वाचताना त्यांच्या मनातली अस्वस्थता मला जाणवली होती. आता प्रत्यक्ष भेटल्यावर हा एकांत त्यांना अधिक जाचक वाटत असावा असे वाटले

हिरेन गोहाय वयाने ४० ते ४५ च्या दरम्यान असतील. गोहाटी विद्यापीठात ते १९६९ पासून असल्याने आसामचे आंदोलन त्यांनी फार जवळून पाहिले. ते स्वत. आसामी आहेत. त्यांच्यावर डाव्या विचारसरणीचा विशेष पगडा आहे. सुरुवातीस त्यांचा आसूच्या आंदोलनाला विरोध होता, पुढे ८२–८३ मध्ये हजारोंच्या संख्येने स्त्री–पुरुष आंदोलनात सहभागी होऊ लागले, ते पाहून त्यांची आंदोलनाबद्दलची सहानुभूती वाढू लागली. आजही ज्या परकीय नागरिकांच्या प्रश्नामुळे आंदोलन सुरू झाले तो प्रश्न किती मूलभूत आहे ह्याबद्दल त्यांच्या मनात शंका नाही; पण गेल्या पाच वर्षात आसुच्या नेतृत्वात जे बदल होत गेले आणि ज्या प्रकारची राजकीय शक्ती आसू निर्माण करू पहात आहे. ह्याबद्दल मात्र त्यांना शंका आहे.

आसू बद्दलच्या ह्या त्यांच्या साशंक वृत्ती मुळेच आसूच्या नेत्यांनी त्यांना वाळीत टाकले आहे. गोहाय यांच्या घरी एरवीसुद्धा फार कमी लोक येतात त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या हेतूची त्यांना शंका वाटत असावी. त्यांच्याशी बोलताना त्यांच्या मनावरचे दडपण जाणवते. अस्वस्थपणे खोलीत फेऱ्या घालत ते माझ्याशी बोलत होते. गोहाटी विद्यापिठात त्यांना ज्या प्रकारची वागणूक मिळत होती त्यामुळे त्यांच्या मनाचा कोंडमारा होत असावा.

'या विद्यापिठात कुणाचाच पायपोस कुणाच्या पायात नाही.' ते मला म्हणाले. आसू मन मानेल तेव्हा विद्यापीठ बंद करू शकते. त्यामुळे शैक्षणिक वातावरण वगैरे साऱ्या गोष्टी म्हणजे पोरखेळ झाल्या आहेत.

—AASU has become a holy cow. त्यांना कोणत्याही प्रकारचा विरोध सहन होत नाही. ह्या वेळेस परीक्षा केवळ दोन महिन्यावर आलेली असताना विद्यापीठ बंद करण्यास मी विरोध केला. तेवढ्यासाठी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी माझ्यावर उपहासात्मक नाटक विद्यापिठाच्या आवारात केले. आसाममधील वृत्तपत्रेही आसुच्याविरुद्ध असलेली पत्रे प्रसिद्ध करीत नाहीत.

विद्यापिठातील सगळ्याच गोष्टीवर आसूचा कसा प्रभाव आहे हे सांगताना त्यांनी एक किस्सा सांगितला.

गल्या मार्चमध्ये चित्रपट दिग्दर्शक सईद मिर्झा सरकारच्या निमंत्रणावरून गोहाटीला आले होते. त्यांची हिरेन गोहाय यांच्याशी जुनी मैत्री आहे. एक दोन दिवसात काम आटोपल्यावर त्यांनी गोहाय यांना सुचविले की, त्यांना आर्टस्च्या विद्यार्थ्यांना भेटण्याची इच्छा आहे त्यानुसार गोहाय यांनी मिर्झांना आपल्या डिपार्टमेंटमध्ये बोलविण्याचे ठरवले. विषय होता चित्रपट तंत्राबद्दलचा. आदल्या दिवशी आसुचे नेते गोहाय यांच्या घरी आले. त्यांनी बजावून सांगितले की, मिर्झांना विद्यापीठात येऊ दिले जाणार नाही. त्यांचे म्हणणे होते की, मिर्झा हे सरकारी पाहुणे आहेत. गोहायनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, मिर्झा हे काही राजकीय पुढारी नाहीत. त्यांना केवळ चित्रपटाच्या तंत्राविषयी बोलायचे आहे; पण विद्यार्थी बधले नाहीत त्यांनी सांगितले की, उद्या जर मिर्झा आले तर आम्ही पिकेटिंग करू भेट रद्द झाली.

निघण्यापूर्वी हिरेन गोहायना मी एक प्रश्न विचारला 'गेल्या पाच वर्षात बाहेरच्या प्रांतातून येथे बरेच पत्रकार येऊन गेले असणार. बहुतेकजण येथे आठवडा दोन आठवडे राहून जातात. एवढ्या कमी वेळात मूळ प्रश्नाचा सर्व बाजूने कसा काय अभ्यास होणार? ह्यात माझाही समावेश होतो. अशा लोकांनी लिहिलेले लेख तुमच्या वाचनात आले असतील. आसामच्या प्रश्नावर आलेल्या ह्या लेखाबद्दल तुमचे काय मत आहे?'

गोहाय हसायला लागले 'जे पत्रकार आसुच्या विरुद्ध लिहितात ते मला येऊन भेटतात. जे आसुच्या बाजूने लिहितात ते पोलिटिकल सायन्सचे प्रमुख डी. पी. बारूआंना भेटतात. त्या काळात येथे येणाऱ्या बहुतेक पत्रकारासाठी गायडेड् टूर्स आयोजित केल्या जात असत. तुमची जशी विचारसरणी तशा स्वरूपाच्या लोकांशी तुमची गाठ घालून दिली जाते महाराष्ट्र आणि दिल्ली येथील वृत्तपत्रांनी थोड्याफार प्रमाणात वास्तव चित्र रंगवले आहे; पण कलकत्याच्या वृत्तपत्रांनी मात्र जाणूनबुजून

पृष्ठ ३२ वर

## आंभाण : मुंबईपासून अवघ्या दीड तासाच्या अंतरावर

# हिंदू सेवा संघाचे कृषी केंद्र...संस्कार केंद्र

मुलाखत । विनया खडपेकर

माझी मैत्रीण अलका सावरकर बरेच दिवस म्हणत होती, एकदा आभाणचे हिंदू सेवा संघाने चालविलेले कृषी केंद्र पहायला चल रविवारला जोडून सुट्टी आली आणि २१, २२ एप्रिलला आम्ही आंभाणला जाऊन आलो, दोन दिवस अगदी वेगळ्या वातावरणात गेले. हिंदूसेवा संघाच्या निवासस्थानासमोरच शेत पसरलेले. आंबा–पेरूची झाडे. निवासस्थानाची शेणाने सारवलेली मोठी ओटी. सारवलेलं अंगण. वारा अगदी सुसाट होता. त्या ठिकाणी पोहोचता क्षणीच मन अगदी प्रसन्न झाले. रांजणातले पाणी प्यायल्यावर विलक्षण तरतरी आली. सगळे वातावरण पाहून वाटले, प्राचीन काळी ऋषीचे आश्रम आश्रम म्हणायचे ते असेच असावेत. बोरीवली ही मुंबईची हद्द मानली तर मुंबईपासून अवघ्या दीड तासाच्या अंतरावर वातावरण इतके बदलू शकते पुन: पुन्हा आश्चर्य वाटते !

पालघर तालुक्यात मनोर या गावाजवळच्या साधारण पन्नास घरं असलेल्या आभाण या लहानशा गावी बारमाही पिके देणारे हिंदू सेवा संघाचे कृषी केंद्र आहे. तेथे सुधारलेल्या पद्धतीने कृषी शिक्षण आजूबाजूच्या ग्रामीण लोकाना देण्यात येते तसेच शेतकऱ्याना बी–बियाण्याचे, आर्थिक व गोपालनाचे सहाय्य करण्यात येते. येथे वनवासी विद्यार्थ्यांसाठी एक वसतीगृह आहे.

खेडेगाव, तेथली शेती, गाई–गुरे, हिरवी झाडे, नदी, ओढा हे सारे दिसायला जरी रम्य दिसले तरी तेथे राहणे तितके रम्य नसते. खेड्यात राजकारण, गुंडगिरी कमालीची चालते तेथील लोकाचे अज्ञान, दारिद्र्य, आपसातले हेवेदावे यामुळे परक्या माणसाने जाऊन विधायक कार्य करणे अशक्य होते. लेख, पुस्तके, वृत्तपत्रीय बातम्या वाचून, चित्रपट पाहून या परिस्थितीची आपल्याला कल्पना आहे. तरीही काही व्यक्ती, काही स्वयसेवी संस्था ग्रामीण भागात पाय रोवून उभ्या राहिलेल्या दिसतात. त्याचा प्रवास जाणून घेण्याच्या दृष्टीने आभाणच्या कृषी केंद्राचे सचालक श्री. दा. वा टोकेकर म्हणजे अण्णा टोकेकर याच्याशी गप्पा केल्या.

**प्रश्न :** अण्णा, तुमचा जन्म कुठचा ? शिक्षण कोठे झाले ? मॅट्रिक कधी झालात ?

**श्री. टोकेकर :** माझा जन्म ९ सप्टेंबर १९१७ मधला नागपूरचा. शालेय शिक्षण नागपूर आणि वर्धा या दोन ठिकाणी झालं. १९३६ मध्ये मी मॅट्रिक झालो.

**प्रश्न :** आज तुम्ही एक कृषी केंद्र चालवता आहात हे शेतीचं शिक्षण कुठे घेतल ? वडील किंवा आई–कोणाच्या घराण्यात शेतीचा लहानपणापासून संस्कार तुमच्यावर होता का ?

**श्री. टोकेकर :** छेः छेः मुळीच नाही. मातुल घराण क्रांतिकारक त्यांच्यापैकी पांडुरग सदाशिव खानखोजे गदर पार्टीचे काम करण्यासाठी अमेरिकेत गेले होते. माझे वडील रेल्वेत नोकरीला होते. शेतीचा सबध कुठेच नव्हता. राष्ट्रीय स्वयसेवक सघाचा प्रचारक म्हणून मी काम करायला लागल्यावरच हळूहळू शेतीशी सपर्क आला. खेरवड्याला हिंदू सेवा सघाचे केंद्र सुरू केल्यावर प्रत्यक्ष शेती करायला लागलो.

**प्रश्न :** रा. स्व. सघाशी तुमचा संबंध केव्हापासून आला ? प्रचारक म्हणून केव्हापासून काम करू लागलात ?

**श्री. टोकेकर :** वर्ध्याला शाळेत असताना शेजारच्या मुलाबरोबर मी सघाच्या शाखेत जायला लागलो. म्हणजे साधारण १९२८ पासून सघाशी सपर्क आला म्हणा त्या वयात शाखा म्हणजे काय ते मला आणि त्या मित्राला कळत नव्हत; पण आम्ही जात होतो. ते काय आहे ते नतर कळायला लागल. १९५२ मध्ये प्रचारक म्हणून काम करू लागलो.

**प्रश्न :** १९३६ मध्ये तुम्ही मॅट्रिक झालात आणि १९५२ पासून सघाचे प्रचारक म्हणून काम करू लागलात. यामधला काळ कसा गेला ? या काळात तुम्ही काय काय केलत ?

**श्री. टोकेकर :** मी मॅट्रिक झालो तेव्हा वडील बदलून जबलपूरला गेले. मीसुद्धा वडिलाबरोबर जबलपूरला गेलो. जबलपूरच्या रॉबर्टसन कॉलेजमध्ये प्रा. तेलग म्हणून होते. ते आमच्या शेजारीच रहायचे. प्रा. तेलगाना गायन–वादनाचा नाद होता. तेलंग स्वत: वाद्ये तयार करीत असतात. मी त्याना म्हणालो, मलाही वाद्य तयार करायला शिकवा. ते म्हणाले, ‘मला ज्यानी शिकवले त्या गुरूंशीच तुझी गाठ घालून देतो.’

**प्रश्न :** वाद्य तयार करायला शिकावी असं तुम्हाला वाटलं म्हणजे लहानपणापासून गायन–वादन याकडे तुमचा ओढा होता ? घरात काही भजनी मंडळाचा सस्कार वगैरे ?

**श्री. टोकेकर :** गायन–वादनाचा कोणताही सस्कार माझ्यावर नव्हता, त्याना वाद्य तयार करताना पाहिलं आणि वाटलं आपणही शिकाव. बस ! या पलीकडे ओढ–बीढ काहीही नाही. प्रा. तेलगानी रघुनाथराव खेर याच्याशी माझी गाठ घालून दिली. एका फार दिलदार माणसाशी त्यानी माझी भेट घालून दिली. रघुनाथराव हे गोविंदराव बुंदेले याच्या राजघराण्यातले वशज. रघुनाथराव सस्कृतचे पडित होते. त्यांना गायनाचा नाद होता. त्याच वाद्याच वर्कशॉप होतं. ते स्वतः वाद्य तयार करीत. इतर कारागीर, नोकर अगदी

कोणाचीही मदत घेत नसत. मला वाद्य तयार करायला शिकवण्याची त्यानी तयारी दाखवली. मी त्याच्याकडे शिकू लागलो. रघुनाथरावा-इतका निगर्वी आणि स्वाभिमानी माणूस मी पाहिलाच नाही. आमची भेट झाली तेव्हा ते सत्तरीचे होते. मी अठराच्या आसपास. ते राज-घराण्यातले. मी सामान्य घराण्यातला. वय आणि सामाजिक दर्जा यात एवढा फरक असूनसुद्धा ते अतिशय साधेपणाने वागत. त्याचे शिष्टाचार कमालीचे सुसंस्कृत कोणकोणत्या कारणानी त्याच्या वाड्यावर विशेष भोजने होत मी पुष्कळदाच त्याच्याकडे असल्याने 'चल, आता जेवायला बैस' अस ते म्हणू शकत होते; पण ते तसे करीत नसत. आदल्या दिवशी माझ्या घरी कळवत, 'हा उद्या आमच्याकडे जेवायला राहील.' दुसऱ्या दिवशी मी गेलो की सागायचे 'आज जेवायला थाबायच, मी तुझ्या घरी कालच निरोप पाठवला आहे.' सत्तराव्या वर्षी त्याच शरीर पीळदार कधी भिंतीला, लोडाला, टेकून बसत नसत. मधे ताठ बसायचे दुपारचे झोपत नसत. वामकुक्षी वगैरे प्रकार नाही. नेहमी पाढरे धोतर नेसलेले वर उघडेबब. वाड्याच्या चौकात बसून अघोळ करायचे. भोवताली चारपाच पाण्याची घंगाळी असायची. सगळ वागण भारदस्त, खानदानी.एकदा त्यानी सागितलेली वस्तू आणायला मी बाजारात गेलो, लवकर मिळेना, खूप उशीर झाला, आलो तर ते माझ्यासाठी जेवायचे थांबले होते. आश्चर्य वाटले.

रघुनाथरावाकडे त्याचे गायनगुरू कधीकधी यायचे. ते गुरू कमरेत वाकलेले; पण गायचे सुदर. गुरू आले की, रघुनाथराव मला बोलवायचे वाद्य तयार करणाऱ्याने सगीत शिकलच पाहिजे अस म्हणायचे. त्या गुरूकडे मी सगीत शिकू लागलो. ते गुरू गावाबाहेर दूर रहायचे. ते जुने लहरी गुरू सकाळी तगड्या तोडत चार मैल जायच आणि त्याची लहर नसली की, ते म्हणणार, आता नको सध्याकाळी या; पण तसाच मी शिकलो वडिलाची दुसऱ्या गावी बदली झाली; पण वडील बदलीच्या गावी गेले तरी रघुनाथरावांच्या आग्रहाने मी जबलपूरमध्ये त्यांच्या वाड्यावरच राहिलो त्याच्या गुरूकडे सहा महिने सगीत शिकलो नतर मुबईला वडिलाकडे आलो जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये ड्राईंग आणि कारपेंटरीच्या कोर्ससाठी जाऊ लागलो. हा कोर्स तेव्हा तीन वर्षाचा होता. ता मी दीड वर्षा-तच पास केला. आमचे भावसार म्हणून शिक्षक होते. मी तीन वर्षात शिकायचे ते दीड वर्षात शिकल्यावर त्यानी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाण-पत्र दिले. तीन वर्ष भरलीच पाहिजेत असा त्या काळी आग्रह नव्हता नंतर कल्याणला वाद्य तयार करण्याचा कारखाना सुरू केला. कार-खान्यात माझ्या हाताखाली चार-पाच कारागीर होते सारंगी, सतार, तबोरे, दिलरुबा ही वाद्ये मी तयार करीत होतो. फर्निचरही तयार करीत होतो. वडिलाना सुतार कामाची आवड होतीच. ती माझ्यात उतरली.

**प्रश्न** : गायन-वादन या कलाशी तुमचा चांगलाच परिचय झाला. मग सगीत नाटकांकडे किंवा त्या काळातल्या चित्रपटाकडे तुम्ही खेचला गेलात का? हल्ली मुलाना जसा अमिताभ आवडतो, तसा तुमचा कोणी आवडता नट होता का?

**श्री. टोकेकर** : नाटक चित्रपटाचा मला जरासुद्धा ओढा नव्हता. अगदी लहान असताना आई-वडिलाबरोबर नाटक पहायला मी जायचो. बहुतेक बालगधर्वांची नाटकं असायची. नाटक सुरू झाल की मी झोपून जात असे. घरात सुखानी झोपायला मिळत नाही म्हणून मला नाटकाचा राग यायचा वीस वर्षाचा असताना 'मायामच्छिंद्र' हा चित्रपट मी वडिलाच्या आग्रहाने पाहिला. नतर एकनाथजी रानड्याच्या आग्रहाने 'वॉर अँण्ड पीस' हा सिनेमा पाहिला; पण मला स्वतःला सिनेमा आवडीने पहावा असं कधी वाटलं नाही. आमचे नाना पालकर नाटकाचे फार रसिक. त्यांच्या आग्रहाने मी 'पुण्यप्रभाव' नाटक पहायला गेलो; पण थोड्याच वेळात मला कटाळा आला. योगायोगाने एकजण गाडीने निघाले होते नाटक तसच अर्धवट सोडून मी त्याच्याबरोबर मुक्कामी निघून गेलो. कोणत तरी वाद्य वाजवायला शिकाव अस मात्र वाटायच. एका मियाकडे मी सारगी वाजवायला शिकलो. मियाची गावातच एक बाई होती. ती गाणारी होती. सारगी वाजवायला शिकल्यावर एकदा तो म्हणाला, 'अभि साथ करना होगा।' साथ करण्यासाठी मी त्याच्याबरोबर त्याच्या बाईकडे गेलो घरी गावात हे कळलं; पण मला कोणी काही बोलल नाही वडिलाचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता

**प्रश्न** : या गायन-वादनापासून आज तुम्ही तसे दूर गेलेले दिसता. हा प्रवास कसा झाला?

**श्री. टोकेकर** : शाखेशी सतत सपर्क होता. १९३०–३१ मध्ये मी काँग्रेसच्या चळवळीत सामील झालो त्यातून नाशिकला तुरुगात जाऊन आलो होतो. नतर १९३९ मध्ये सावरकराच्या प्रेरणेने भागा-नगर सत्याग्रह सुरू झाला त्या सुमाराला मी कल्याण स्टेशनवर पाहुण्याना आणायला गेलो होतो. कोणतीशी गाडी आली. फर्स्ट क्लासच्या डब्याच्या दारात स्वातंत्र्यवीर सावरकर उभे होते. ते अगदी एकटे होते. मी झटकन् पुढे होऊन त्याना नमस्कार केला. सावरकरांनी विचारले, 'भागानगरला जाणार का?' एवढा मोठा माणूस विचारतो आहे क्षणभर काय उत्तर द्याव तेच कळेना. 'मी हिंदू सभेचा कार्यकर्ता नाही.' मी म्हणालो 'पण हिंदू आहात ना?' सावरकरानी विचारले. मी तत्क्षणी भागानगर सत्याग्रहाला जाण्यास होकार दिला.

**प्रश्न** : तो सावरकराचा काळ होता. ते दिसल्याबरोबर लोकानी त्यांच्याभोवती गर्दी केली नाही?

**श्री. टोकेकर** . कशी कोणास ठाऊक, गर्दी नव्हती. ते अगदी एकटे होते मी त्याच्याशी अगदी सहजपणे बोललो, यावर तेव्हा कोणी विश्वासच ठेवेना; पण तस खरच घडल होतं.

**प्रश्न** : सत्याग्रहासाठी उघड उघड गेलात?

**श्री. टोकेकर** नाही. कस जायच, कुठ जायच, काय करायचं याच्या सूचना सूत्रचालकानी दिल्या होत्या एका लहान मुलाला बरोबर घेऊन मी औरंगाबाद स्टेशनवर उतरलो. तेथे कडक बदोबस्त होता. पोलिसानी आमच्या खूप चौकशा केल्या 'या लहान मुलाचे वडील आजारी आहेत. यांच्या घरोब्यातले वकील येथे आहेत. त्याच्याकडे मी याला घेऊन चाललो आहे' असे उत्तर आधीच ठरल्याप्रमाणे मी दिले. 'याच्या गावाला वकील नाही का? तुम्ही लबाड आहात. आमच्याशी खोट बोलता. खर सागून टाका' अस पोलीस म्हणाले. मी माझ उत्तर कायम ठेवून त्या मुलासह स्टेशनमध्ये बसून राहिलो.

थोड्या वेळानं पोलिसाला काय वाटलं कोणास ठाऊक त्याने आम्हाला गावात जाऊ दिल. दुसऱ्या दिवशी एके ठिकाणी काही जणाबरोबर मी निजामाच्या विरुद्ध घोषणा दिल्या. भोवताली लोक जमले. निजामशाहीविरुद्ध मी एक भाषण ठोकल. पोलीस आले. मी स्टेशन-वरून येथपर्यंत पोचलोच कसा, कधी आलो वगैरे चौकशी केली. मी म्हटले, 'आज सकाळीच आलो.' आदल्या दिवशी आल्याच सागितल नाही कारण मग कुठे, कोणाकडे उतरलो त्याचीही तपासणी झाली असती गावातल्या पोलिसानी स्टेशनवरच्या पोलिसांना फैलावर घेतले मी पकडला गेलो औरंगाबादमध्येच एक वर्ष तुरुगात होतो.

**प्रश्न :** तुम्ही चाकोरी सोडली, वेगळी वाट धरलीत, तेव्हा घरात प्रतिक्रिया काय झाली ? आई-वडिलानी विरोध केला ?

**श्री. टोकेकर :** मला कोणीही विरोध केला नाही ब्रिटिश विरोधी चळवळीबद्दल वडिलाना आत्मीयता होती. त्यामुळे मी जे काही करतो ते चागले आहे याबद्दल त्याची खात्री होती.

**प्रश्न :** पण सर्वसाधारण मध्यमवर्गीय घरात मुलाने नियमित वेतनाची नोकरी करून, लग्न करून व्यवस्थित मार्गाला लागावे अशी तीव्र इच्छा असते. त्यासाठी आई-वडील, नातेवाईक याचा दबाव येतो. तस तुमच्या बाबतीत झाल ?

**श्री. टोकेकर :** नोकरी मी कधी केली नाही. कोणी तसा आग्रहही धरला नाही. वडिलाच्या सेवानिवृत्तीनंतर दोन-तीन वर्षं मी घरातली व्यवस्था पहात होतो; पण नोकरी केली नाही. लग्नासाठी आई मागे लागली; पण फार नाही. तिन चार-पाच वेळा सागून पाहिल. मी ऐकलं नाही. वडील लग्नाबद्दल काही म्हणाले नाहीत. सघाच काम करताना माझ्या डोळ्यासमोर इतकी शेकडो काम दिसत होती की लग्न करावस वाटलच नाही.

**प्रश्न :** सघाची काम म्हणजे काय करीत होतात ? सघाचे प्रचारक म्हणून केव्हा, कोठे काम सुरू केल ?

**श्री टोकेकर :** कल्याणला घर होत. तिथच आसपास मी सघाच कार्य करीत होतो. खेड्याखेड्यात जाऊन शाखा सुरू करायची. शाखेवर गुरुपौर्णिमा, तिळगूळसमारभ असे नियमित उत्सव साजरे करायचे. त्या गावातली लहान मुलं, तरुण माणसं, महत्त्वाचे गावकरी यांच्याशी सपर्क ठेवून, एकदर वातावरणात आपण काय करू शकू ते ठरवायच ! कल्याणमध्ये आधी मी शहर कार्यवाह होतो. नंतर कल्याण तालुका कार्यवाह होतो. १९५२ मध्ये मी सघाचा प्रचारक म्हणून काम करू लागलो. ठाणे, कुलाबा, मुबई या ठिकाणी मी काम करीत होतो

**प्रश्न :** सघामध्ये फक्त वरून येणारी आज्ञा ऐकायची असते. त्यावर उलटसुलट चर्चा वादविवाद होत नाहीत, असा सर्वसाधारणपणे जनतेत समज आहे. याबद्दल तुम्हाला काय म्हणायचं आहे ?

**श्री. टोकेकर :** हा समज साफ चुकीचा आहे. कोणतेही धोरण ठरविताना सघस्वयसेवकामध्ये खूप वाद होतात. सकाळी सातपासून रात्री तीन-तीन वाजेपर्यंत उलटसुलट चर्चा, वादविवाद झालेले आहेत-प्राताचे संघचालक अंतीम निर्णय घेतात. तो निर्णय एकदा झाला की इतरानी त्याप्रमाणे वागायचं असा सकेत आहे. 'मला हे मान्य नव्हतं म्हणून मी आता काम करणार नाही' असं म्हणून लगेच वेगळी चूल माडायची असलं, विचारस्वातंत्र्य संघाला अभिप्रेत नाही. माणूस म्हटला की वेगळे विचार येणार नाहीत, मतभेद होणार नाहीत, हे कस शक्य आहे ? पण ते कुठपर्यंत ताणायचे याचं तारतम्य ठेवायला लागत. पुण्याला प्राताचा अभ्यासवर्ग झाला की, प्रातप्रमुख प्रत्येक प्रचारकाशी स्वतत्र बोलत. त्याच्या घरातल्या अडचणी, सघकार्यातल्या अडचणी विचारून घेत. मदत करण्याचा प्रयत्न करीत एखादा प्रचारक एखाद्या गावाला कटाळलेला असला तर त्याला गाव बदलून दिलं जाई. अभ्यासवर्गाच्या शेवटच्या दिवशी प्रचारकाना आपली नियुक्ती कोठे झाली ते कळे. या वर्गानतर पंधरा दिवस घरी जाण्यासाठी सुट्टी असायची. काही गरजेमुळे अधेमधेसुद्धा प्रचारक घरी जाऊ शकत असे. कोणत्याही गोष्टीची सक्ती नव्हती. माझ घर कल्याणला आणि प्रचारक म्हणून काम करीत होतो ठाणे, कुलाबा, मुबई या ठिकाणी. वारंवार घरी जाणं मला शक्य होतं. कोणी काही म्हटलही नसतं; पण लाबून आलेले जे प्रचारक होते त्याना काही स्वतःच्या घरी एकसारखं जाणं शक्य नव्हत, म्हणून मीसुद्धा माझ्या घरी एकसारखा जात नसे. हे मीच पाळलेलं बधन होत. कोणी लादलेलं नव्हतं.

**प्रश्न :** प्रचारक म्हणून काम करीत असताना इतर संघटनाचे कोणी वादविवाद करायला, चर्चा करायला यायचे ?

**श्री. टोकेकर :** यायचे कॉंग्रेसचे लोक विचारायचे, तुम्ही कार्य करीत असता तरी जनसघ निवडणुकीत पडतो का ? आम्ही आमच्याकडून कारणं देत होतो. एकदा एक समाजवादी शिक्षक आले. म्हणाले, तुम्ही सघाचे लोक भावनात्मक आहात. आम्ही वास्तववादी आहोत मी म्हटल, 'तुम्ही फार ढोबळ शब्द वापरता. तुमच्या पार्टीला झेंडा आहे ?' 'हो. आहे'-ते म्हणाले. 'कशाला ठेवता झेंडा ? ते नुसतं फडकं आहे. फाडून टाका'-मी सागितले. 'अहो, अस कस चालेल ? झेंडा म्हणजे ध्येयाच, विचाराचं प्रतिक आहे'-ते गृहस्थ म्हणाले. 'म्हणजे तुमच्या भावना कापडाच्या तुकड्यावर तुम्ही लादता. तुमच्यात भावनात्मकता आहे'-मी म्हणालो. 'कबूल !' त्यानी उत्तर दिले. 'आई, बहीण, पत्नी प्रत्यकीचं पुरुषाशी नातं वेगळ हे मानता का ?' मी त्या समाजवादी शिक्षकाना दुसरा प्रश्न केला. 'हो. अर्थातच मानतो.' त्यानी उत्तर दिले 'मग तुम्ही कसचे वास्तववादी ? वास्तवात फक्त स्त्री-पुरुष एवढच नातं. ही आई, ती बहीण, ती पत्नी हा सगळा भावनेचा खेळ प्रत्येकीला फक्त स्त्री एवढच गृहित धरून वागायचं का ?' मी विचारलं. 'अहो, भलतच का ? अस कसं चालेल ?' ते म्हणाले.

हे असे वादविवाद नेहमीच कोणाकोणाशी चालायचे.

**प्रश्न :** सघाचे काम करताना या कृषी-केंद्राकडे कसे वळलात ?

**श्री टोकेकर :** डिसेंबर १९६६ मध्ये ठाण्याला काही सघ-स्वयसेवकाची बैठक झाली. प्रातानी सघाच्या योजनेनुसार वनवासी भागात काम करावं अस या बैठकीत ठरल. एक कार्यकारी मंडळ स्थापन झालं. भगवानराव जोशी हे त्याचे अध्यक्ष झाले वनवासी केंद्रात काम करणाऱ्या सस्थेच्या नावाविषयी चर्चा झाली. 'हिंदू सेवा सघ' हे नाव पुढं आल. काहीजण म्हणू लागले, हे नाव नको. हे नाव जातीय वाटतं. त्यामुळे लोक बिचकतात. सरकारी मदत मिळणार नाही. मी म्हटलं, 'हिंदू या शब्दाला संघानं बिचकावं ?

सरकारनं मदत केली नाही तरी हरकत नाही. आपण कुठे सरकारच्या जिवावर काम करणार आहोत!' नंतर आणखीही चर्चा होऊन 'हिंदू सेवा संघ' हेच नाव ठरलं. वनवासी भागात जमीन विकत घेऊन त्या ठिकाणच्या सामाजिक गरजा भागविण्यासाठी केंद्रं उभी करायची असं ठरलं.

त्यानुसार डहाणुजवळ धरमपूर या गावी पंचावन्न एकर जागा घेतली. जवळून नदी जात होती. दाट जंगल होतं. १९६७ मध्ये तलासरीला केंद्र सुरू केलं. माधवराव काणे त्या ठिकाणी काम पाहू लागले. नंतर जव्हार तालुक्यात खेरवंडा येथे हिंदू सेवा संघाची पहिली झोपडी उभी झाली. तलासरीहून पाच विद्यार्थी खेरवंडा येथे आणले. वसतिगृह सुरू केलं. १९७१ मध्ये मोरेश्वर लहानगे हा मॅट्रिक झालेला मुलगा तलासरीहून आला. तो शेतीची व्यवस्था पहायला लागला.

**प्रश्न** : खेरवंड्याला केंद्र सुरू केल्यावर अटीतटीचे संघर्षाचे प्रसंग आले असतीलच. त्याबद्दल काही सांगू शकाल का?

**श्री. टोकेकर** : गंमतीचे, निर्णयाचे, संघर्षाचे सगळे प्रसंग येऊन गेले.

एकदा मी शेतात काम करीत होतो. माझ्याजवळ बसलेलं कुत्रं केकाटलं. मी त्याला नेहमीसारखं चुचकारलं; पण गप्प झालं नाही. पुन्हा केकाटलं. त्याला जरा दाणकलं. तरी गप्प झालं नाही. दूर बघून आणखी केकाटलं. ते बघत होतं त्या दिशेला मी पाहिलं. बापरे! आमच्यापासून थोड्या अंतरावर, शंभर–दीडशे फुटांवर असेल, वाघ बसला होता. मी सटपटलो. भोवताली पाहिलं. माझ्याबरोबर वनवासी मंडळी शेतात काम करीत होती. त्यांनी सगळ्यांनी वाघाला पाहिलं होतं; पण त्या कुणावरही काही परिणाम झाला नव्हता. वाघ अगदी आरामात बसला होता. एखाद्या मांजराकडं पहावं तशी वनवासी मंडळी मधून मधून त्या वाघाकडे नजर टाकत होती. मी चांगलाच घाबरलो होतो; पण करणार काय? आम्ही त्या वनवासींचं पुढारीपण स्वीकारलेलं! ते घाबरलेले नाहीत तर मी घाबरून पळ कसा काढणार? पळालो तर त्यांना माझ्या नेतृत्वाचा भरवसा कसा वाटणार? मग मी पण जिवाचा धडा करून त्यांच्यासारखाच कामात गुंतून गेलो. कधीतरी वाघ निघून गेला.

त्या रानात सापही बरेच निघायचे. वनवासींचा आणि त्यांचाही नित्याचा परिचय. ते लीलया साप पकडतात. दगडांनी ठेचून मारून टाकतात. त्या ठिकाणी गवतातून, झुडुपातून फूऽऽस करून केव्हाही साप समोर यायचे. कधी झाडावर लोंबकळताना दिसायचे. घाबरून चालत नसे. म्हणजे मला मनातून भीती वाटायची; पण ती भीती मी अजिबात तोंडावर दिसू देत नसे.

परिस्थितीशी असा अनेक प्रकारे शह द्यायला लागला. केंद्राचे काम जसजसे रूजू लागले तसतसे भोवताली काही विरोधी वातावरण निर्माण होऊ लागले. हे काम जनसंघाचे आहे यात राजकारण आहे असं बोललं जाऊ लागलं. ख्रिस्ती मिशनरी, काँग्रेस आणि कम्युनिस्ट या तिघांच्या गराड्यात ते केंद्र होते. या तिघांचाही केंद्राला सतत विरोध होता. त्याचं पर्यवसान ९ ऑगस्ट १९७२ या दिवशी केंद्रावर हल्ला होण्यात झालं. हल्लेखोरांचा लक्ष्य खरं म्हणजे मी होतो. पण मी त्या दिवशी कामासाठी शेजारच्या गावी गेलो तर



–अण्णा टोकेकर.

**प्राचीन काळी ऋषींचे आश्रम आश्रम म्हणायचे ते असेच असावेत!**

◻

रात्री परत येणं मला जमलंच नाही. आमच्या घरात पासष्ट वर्षांचे सहस्त्रबुद्धे आणि त्यांची पत्नी हे होते. घर साधे कुडाचे होते. दहा–बारा हल्लेखोर कुऱ्हाडी, कोयते घेऊन आले. दार मोडून आत शिरले. सहस्त्रबुद्धे यांच्यावर प्रहार केले. ते बेशुद्ध झाले. हल्लेखोरांनी त्यांच्या पत्नीच्या पोटात वार केले आणि ते पळून गेले. शेजारच्या घरांना बाहेरून कड्या लावल्या होत्या. सकाळी मी आलो तेव्हा सगळं कळलं. सहस्त्रबुद्धे शुद्धीवर आले होते, पण त्यांच्या पत्नी अगदी अत्यवस्थ होत्या. कसबसं त्यांना दूर असलेल्या हॉस्पिटलपर्यंत पोहोचविले. सुदैवाने त्या प्राणंतिक हल्ल्यातून त्या बचावल्या. पूर्ण बऱ्या झाल्या. पण नंतर सहस्त्रबुद्धे यांनी आता तेथे काम करायचं नाही असा निर्णय आम्ही घेतला ते निघून गेले. विरोधकांना वाटलं आता हे केंद्र बंद पडेल. पण आम्ही मुळीच माघार घेतली नाही. १९७२ मध्ये दुष्काळ होता. धान्य, कपडे यांची लालूच दाखवून मिशनरी आदिवासींना बाटवत. आम्ही तेव्हा शुद्धीकरण मोहीम सुरू केली. एकंदर १९८ गावांमधून आमचे बारा प्रचारक काम करीत होते. ते सगळे प्रचारक वनवासी होते. दोनशेपासून हजारच्या संख्येपर्यंत समूहच्या समूह शुद्धीकरण करून आम्ही पुन्हा हिंदू धर्मात घेतले. दोन वर्षात दहा हजार लोकांना पुनःश्च हिंदूधर्मात घेतले.

**प्रश्न** : जे हिंदु धर्मात परत आले ते मिशनऱ्यांच्या अमिषांनी पुन्हा ख्रिस्ती झाले नाहीत का? स्वतःच्या फायद्याप्रमाणे वेळोवेळी धर्म बदलावा असा विचार या शुद्धीकरणामुळे वनवासींच्या मनात येणं शक्य नाही का?

**श्री. टोकेकर** : शुद्धीकरण करून हिंदूधर्मात आलेली वनवासी मंडळी पुन्हा ख्रिस्ती धर्मात गेली असं कधी घडलं नाही. कारण या लोकांचं तसं स्वतःच्या धर्मावर प्रेम असतं. आपला गाव, आपली माणसं त्यांना प्रिय असतात. खेड्यातली परिस्थितीही शहरांपेक्षा

वेगळी असते. धर्म सोडणाऱ्या माणसाकडे गावातली इतर माणस भल्या नजरेन बघत नाहीत. 'आईबापाचा धरम सोडलास तो खोटा आणि फादरचा धरम तो खरा काय ? बघून घेऊ.' अशा धमक्या इतर गावकरी धर्मांतर करणाऱ्या माणसाला देतात. त्यामुळे हल्ली कोणी ख्रिश्चन झालं तरी नाव बदलत नाहीत. दर रविवारी चर्च-लाही जात नाहीत. त्यामुळे मुबईत दिसणारी ख्रिस्ती सस्कृती, एकदर ख्रिस्ती जीवनपद्धती इथ खेड्यात दिसणार नाही धर्म बदलला तरी ते आपल्या भोवतालच्या माणसाप्रमाणेच रहातात. या डहाणु भोवतालच्या परिसरात सत्तर वर्षांच जुन चर्च आहे मिशनरी वर्षाला दहा दहा लाख रुपये खर्च करतात. पण एक दशाश वन-वासीनासुद्धा ते ख्रिस्ती करू शकले नाहीत.

**प्रश्न :** हिंदू धर्माबद्दल कोणत्या कल्पना वनवासीच्या मनात आहेत ? रामायण–महाभारतातल्या कथा त्याना माहिती आहेत का ? महाराष्ट्रातले सत, वारकरी पथ याच्याबद्दल त्याच्या भावना काय आहेत ?

**श्री टोकेकर** . गेल्या पाचशे वर्षात या भागात हिंदूधर्माची अस्मिता अशी नव्हती. वनवासी लोक धर्माचा उल्लेख जातीवाचक करत. आम्ही हिंदू अस ते म्हणत नसत आम्ही महादेव कोळी, आम्ही वारली असे ते म्हणत. रामायण–महाभारताच्या आपल्याला माहिती असलेल्या कथा, आख्यान त्याना माहिती नसतात. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम या संताची तर त्याना जरासुद्धा माहिती नाही राम–कृष्ण, गणपती याच्या मूर्ती त्यांच्याकडे आढळत नाहीत खडोबा, वाघोबा असे आपल्याला अपरिचित त्याचे बरेच देव आहेत.

**प्रश्न :** आपण तरी त्याना हिंदु अस कशावरून म्हणायला लागलो?

**श्री. टोकेकर :** त्याना शकराची माहिती आहे माता माऊली ही त्याची देवीची मूर्ती आपल्या महालक्ष्मीसारखी असते. तिच्या उत्स-वात ते नाच करतात त्यावेळी जी पद गातात त्यात राम, कृष्णाचे काही उल्लेख आहेत. यामुळे याचा धर्म हिंदूच आहे हे सहज कळत. रूढीच्या जोरावर त्याचा हिंदू धर्म इतका काळ टिकला. बाकी हिंदू ग्रथ, तत्वज्ञान त्याच्यापासून खूप दूर होते. त्याची पुसट जाणीवही त्याना नव्हती. आता मात्र स्वत.ला ते हिंदू म्हणवतात गणपती उत्सव त्याना माहिती नव्हता पण आमच्या केंद्राने त्याना तो माहिती करून दिला. गौरीपुढे नाच ही कल्पना आपल्याला माहिती नव्हती. पण गणपती उत्सव साजरा करताना वनवासीचा गौरीपुढचा नाच आम्ही त्यात सामील करून घेतला. गणपती उत्सवात एक दिवस ते अगदी रात्रभर नाचतात. यातून हळूहळू याच्यावर सस्कार होत जातात त्याना अनेक प्रकारे शिकवाव लागतं. चागल जेवण, नीट स्वयपाक करणं, रोज आघोळ करणं सगळे संस्कार त्याच्यावर करावे लागतात. आमच्या केंद्राद्वारे आमचा त्यासाठी सतत प्रयत्न चालू असतो.

**प्रश्न :** आता तुम्ही, तुमच केन्द्र याद्वारे रा. स्व. सघ वनवासी भागात कार्य करतो आहे; पण कम्युनिस्टाचा एक दावा असतो की त्यांनी या उपेक्षित, शोषित माणसासाठी कार्य करायला केव्हाच सुरुवात केली होती कम्युनिस्टाकडे पाहून नतर सघवाले येथे उगवले यावर तुमचं म्हणणं काय आहे ?

**श्री. टोकेकर :** कम्युनिस्ट आमच्या आधी आलेही असतील. माझ्या माहितीप्रमाणे १९४२ मध्ये कम्युनिस्ट तलासरीला आले. पण ते आदिवासीचा उद्धार करण्यासाठी, त्याच शोषण थाबवण्या-साठी मुळीच आलेले नव्हते तलासरी म्हणजे उबरगाव पट्ट्यातली गाव घेऊन निर्माण केलेला बत्तीस गावाचा तालुका. या तालुक्यात कारूळकर, पिपुटकर ही बरीच जमीनदार मडळी होती.

गाधीजीची चळवळ सुरू होती. गाधीजीच्या पाठीमागे सर्वसामान्य जनता होती. त्याप्रमाणेच व्यापारी होते. जमीनदार होते. तलासरी-मधली कारूळकर, पिपुटकर जमीनदार मडळीही गाधीच्या मागे होती. जमीनदार मडळी वागण्यात अर्कच होती. कुळाना छळणारीही होती. तलासरीमध्ये ब्रिटिश सरकारी अधिकारी या जमीनदारां-विरुद्ध भाषणे देऊ लागले. याची प्रेरणा गाधीविरोध ही होती. शोषिताचे प्रेम ही प्रेरणा बिलकूल नव्हती. दुसऱ्या महायुद्धात रशिया दोस्त राष्ट्राच्या बाजूला होता. रशियाने दुसऱ्या महायुद्धाला लोक-युद्ध म्हटले ब्रिटिश आणि रशिया तेव्हा मित्र होते. त्यामुळे रशिया-प्रेमी कम्युनिस्ट जमीनदाराना विरोध करण्यासाठी सिद्ध झाले. जमीनदाराविरुद्ध लढा देण्यासाठी कम्युनिस्ट तलासरीत आले, ते ब्रिटिशाचे हस्तक म्हणून. शोषिताचा उद्धार करायला ते आलेले नव्हते तो केवळ बुरखा होता

**प्रश्न :** बर ! तुम्ही तुमच्या खेरवंड्याच्या कामाबद्दल सांगितलत. पण खेरवंड्याहून तुम्ही आभाणला कसे आलात ?

**श्री. टोकेकर :** १९७७ च्या आधीपासून वात्रळ आणि सूर्या या नद्यांवर सूर्यधरण बाधले जाणार, असे घाटू लागले, या धरणामुळे खेरवडा गाव जाणार अशी चिन्ह दिसू लागली. गाव वाचविण्याचा आम्ही प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. जमीन नवी घेणे वगैरे बाबीसाठी गावकरी माझ्यावर अवलबून होते या धरणग्रस्त गावकऱ्याची चौकशी कॉंग्रेसने केली नाही. कम्युनिस्टानीही केली नाही.

हिंदू सेवा सघाच्या केंद्रासाठी मनोरीजवळ सहा एकर जमीन आम्ही खरेदी केली खेरवड्याला उभी केलेली सगळी घरं आम्ही पाडली. ते सगळं सामान घेऊन आम्ही आभाणला आलो. त्या सामानातूनच आम्हाला आभाणला पुन्हा सुरुवात करायची होती. फॉरेस्ट खात्याचा सप सुरू होता. त्यामुळे सामान हलवताना त्रास झाला. आभाणच्या सहा एकरापैकी चार एकर जमीन लागवडीखाली आणली. दोन एकरावर घरं बाधली.

**प्रश्न :** आज या केंद्रावर काय काय चालू आहे ?

**श्री. टोकेकर :** मुख्य उद्योग शेती. आम्ही भात, गहू, हरभरा, भाजीपाला पिकवतो. याच वार्षिक उत्पन्न वीस ते पचवीस हजार रुपये आहे. आम्ही भाजीपाला थोडाफार विकतो. इतर काही विकत नाही. पचवीस विद्यार्थ्यांच वसतिगृह आहे. सगळे वनवासी विद्यार्थी आहेत त्याचा निर्वाह या शेतीवर होऊ शकतो. शेतीबरोबर लहान प्रमाणात गोपालनही सुरू आहे. एका विद्यार्थ्याला महिना साधारणपणे शभर रुपये खर्च येतो. सकाळची पेज आणि दोन वेळचं जेवण आम्ही विद्यार्थ्यांना देतो. एका विद्यार्थ्याला दिवसाला साधारण आठशे ग्रॅम तादूळ लागतो. शक्य होईल त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना लागणारी पुस्तकं आणि कपडे याचाही खर्च थोडाफार प्रमाणात आम्ही उचलतो.

**प्रश्न :** या कुणी केंद्रावर एकदर किती जण काम करतात ?

त्यांना वेतन दिलं जातं का ?

**श्री. टोकेकर :** एकंदर दहा जण काम करतात. त्याना दरमहा दीडशे रुपये वेतन आहे. लावणीच्या दिवसात बाहेरून आणखी मजूर आणावे लागतात. त्यांना रोजी सहा रुपये आमचं केंद्र देत. हाच भोवतालच्या गावामधला मजुरीचा दर आहे.

**प्रश्न :** बायका–पुरुष याच्या काम करण्याच्या ताकदीत, कार्यक्षमतेत काही फरक पडतो ? दोघांची मजुरी सारखीच असते की वेगळी ?

**श्री. टोकेकर :** बायका–पुरुष दोघाना आम्ही मजुरी सारखीच देतो. कामाचा भार दोघंही सारखाच उचलतात. तसं कोणती कामं कोणी करायची हे साधारणपणे ठरलेल असत. नागरणीच काम फक्त पुरुषच करतात. पाया खणणं, विहिरीतले दगड काढणं ही साधारणपणे पुरुषाची कामं. खड्ड्यातली माती बाहेर काढणं, वाहून नेणं ही बायकाची कामं. त्याला कमी श्रम लागत नाहीत. पुरुष साधारणपणे आळशी. विड्या ओढण्यात वेळ घालवतात. बायकाच तसं नसतं. लावणीचं काम तर त्या चपळपणे, पुरुषापेक्षा जास्त वेगानं उरकतात.

**प्रश्न :** साधारण चाळीस पचेचाळीस वर्ष तुम्ही सामाजिक कार्यात आहात. या काळ'त खेडेगावातल्या परिस्थितीत काही बदल झाला का ?

**श्री. टोकेकर :** पन्नास वर्षांपूर्वीच खेडेगाव खूप बदलल आहे. हल्ली बऱ्याच खेड्यात घराघरात चोरट्या दारूचा व्यवहार चालतो. त्यामुळ काही करायच असेल तर ओळख काढून खेड्यात शिरावं हे बर. कारण चोरटी दारू किंवा तत्सम इतर व्यवहारात गुतलेल्या माणसाना गावात आलेला परका इसम पोलिसाचा असेल अशी सतत शंका असते. त्यामुळे ओळख निघाली नाही तर ते त्याला खतम करायला मागेपुढे पहात नाहीत.

**प्रश्न :** खेड्याच चित्र इतक्या वाईट प्रकारे बदलत असताना रा. स्व. सघ काय करू शकला ?

**श्री. टोकेकर** . रा. स्व. सघ स्वत:च्या शक्तिनुसार या दृष्टीने सतत प्रयत्नशील आहे संघाचा प्रभाव ज्या गावावर आहे ती गाव तुम्हाला निश्चित वेगळी दिसतील संघ सुसंस्कृत वातावरणाची केन्द्र निर्माण करतो. या आमच्या कृषी केन्द्राच्या सपर्कात असलेले वनवासी लोक दारू पित नाहीत. येता जाता विड्या ओढत नाहीत. सघाचा प्रचारक विडी ओढू नको, दारू पिऊ नको असा उपदेश करीत नाही. स्वत च्या वागण्याने तो तस वातावरण निर्माण करतो. शेतीच्या बाबतीतसुद्धा असच ! शेती करा, आधुनिक पद्धतीन करा हे सरकारी खात सागतच असत. आमची संस्था न बोलता शेतीच्या प्रात्यक्षिकातच वनवासीना सामावून घेते. आमच्या केन्द्रात काम करणाऱ्या वनवासीचा गावावर आपोआप प्रभाव रहातो. यामुळे रा. स्व. सघ काही सत्प्रवृत्ती रूजवू शकतो अस मला वाटत. आपाणजवळच्या या मनोरी गावाचच उदाहरण घ्या. या मनोर गावात आजही अठ्ठेचाळीस टक्के मुसलमान आहेत. साधारण पन्नास–साठ वर्षांपूर्वी 'मनार' मधल्या जमिनी मुसलमानाच्या मालकीच्याच होत्या जंगल तोडीचे ठेकेदार मुसलमान होते. एकदर पहात मुसलमान पैसेवाले होते. हिंदू त्याचे अगदी मिंधे होते. १९४२ मध्ये सघाने मनोरमध्ये काम सुरू केले. अगदी लहान मुलावर संस्कार केले. आज ती मुले तरुण आहेत' निर्व्यसनी आहेत त्याचे पिढीजात चालत आलेले धदे चागल्या प्रकारे करत आहेत. त्यामुळे हिंदूच्या हातातही पैसा आला आहे ते मुसलमानाचे मिंधे राहिले नाहीत. पण हिंदु–मुस्लिम दोन्ही समाजाची येथे जवळजवळ समान सख्या असूनही दंगल होत नाही. भिवडीच्या दंग्याचे पडसाद मनोरमध्ये उमटले होते. पण ते तावडतोब मिटवले गेले. सघाच्या प्रभावामुळे मनोरमध्ये हिंदू-मुस्लिम दगली होत नाहीत. गावातली विठ्ठल–रखुमाई मदिराची जमीन योग्य मार्गानं आपल्या ताब्यात घेऊन सघान गावात आपली ताकदही दाखवली आहे आमची शक्ती मर्यादित आहे हे कबूल. ती अजून खूप वाढायला हवी आहे.

**प्रश्न :** सघ परिवारातील वनवासी कल्याण आश्रमही वनवासींसाठीच काम करतो तुमच्या आणि त्याच्या कार्यात फरक काय आहे ?

**श्री टोकेकर** · फरक म्हणण्यासारखा काहीच नाही. 'वनवासी कल्याण आश्रम' ही अखिल भारतीय पातळीवर काम करणारी सस्था आहे. आमचा व्याप महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे.

¤

एकाच भेटीत श्री. 'अण्णा'च्या कार्याचे मूल्यमापन करणे शक्य नाही किंवा अण्णाचा जीवन प्रवासच्या प्रेरणाही तितक्याशा कळू शकल्या नाहीत. पण आपल्या भोवतलची परिस्थिती पाहिली की, अण्णासारखी कार्य करणारी माणसे म्हणजे मोठाच दिलासा वाटतो· सकाळचे वर्तमानपत्र उघडले की या राष्ट्रातले अराजक जाणवते· अतुले खटला, भोपाळची दुर्घटना, हेरगिरी प्रकरण ही दीर्घकाळ चालू राहणारी दुखणी, भिवंडीची धार्मिक दगल, गुजराथमधला राखीव जागाचा प्रश्न हे अधुनमधून होणारे भूकप. बाकी अपघात, चोऱ्या, हुडाबळी, लाचलुचपत. खून, बलात्कार याना गणतीच नाही. परंतु अशा सगळ्या परिस्थितीत कोणी तरी कुठे तरी कोपऱ्यात हिरवळ फुलवतो चार लोकाच्या अन्नपाण्याची सोय पहातो हे फार महत्त्वाचे आहे अशी काही माणसे महाराष्ट्रात, भारतात आहेत, त्याचा वेध घ्यावासा वाटतो श्री. अण्णा टोकेकर हे अशाच व्यक्तीपैकी एक. बालपणी योगायोगाने रा स्व. सघाच्या शाखेत जाऊ लागलेल्या अण्णानी पुढे जीवनभर संघनिष्ठेच्या आधारानेच प्रवास केला असे दिसते. यातून आज एक कृषी केन्द्र उभे राहिले आहे केवळ कृषी केन्द्र असे म्हणता येणार नाही. तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सात्त्विक सस्कार करणारे केंद्र उभे झाले आहे ही वाटचाल संघर्षमय असणारच पण स्वीकारलेल्या सघर्षाविषयी अण्णा खूप बोलले नाहीत. खेरवंड्याचे केंद्र मोडावे लागणे ही साधी घटना नव्हती. परंतु अण्णानी कोणाविषयी कटु उद्गार काढले नाहीत. एकदरीतच अण्णा स्वत च्या कार्यात गुतले तसे कोणत्या व्यक्तीच्या राग लोभात गुतले असे वाटत नाही. जबलपूरच्या रघुनाथरावाविषयी बोलताना मात्र ते भरभरून बोलले. खरे म्हणजे असेच भरभरून अण्णानी स्वत च्या कार्याबद्दल, जीवनातील सघर्षाबद्दल, माहाच्या, सयमाच्या क्षणाबद्दल बोलायला हवे त्यातून पुढच्या पिढीला प्रकाश मिळू शकेल

एखाद्या गुन्ह्याचे धागेदोरे जसे बारकाईने तपासले जातात, तसे सात्त्विक निष्ठेने विधायक कार्यात रत राहणाऱ्या व्यक्तीच्या वृत्तीचे धागेदोरे प्रकाशात येणे ही काळाची तीव्र गरज आहे. ☐

प्रायोजित कार्यक्रम

# दूरदर्शनचा 'नवा' चेहरा - 'हमलोग'नं केलेली क्रांती!

● ललिता बर्वे ●

एका गमतीशीर इग्रजी चित्रपटात एका चित्रपटगृहातले प्रेक्षक बैल उधळल्याच दृश्य चित्रपटात पहात असतात. त्याच वेळेला बाहेर रस्त्यावर 'एका ट्रकमधून काही बैल मोकळे होऊन धुडगूस घालत असतात. हे दोन्ही कळप थोडे एकमेकात मिसळतात ! पडद्यावरच्या सैरावैरा सुटलेल्या बैलाना दूर करीत, मोकाट सुटलेला एक बैल पडदा फाड्न सरळ प्रेक्षकांमध्ये शिरतो आणि तसाच दौडत चित्रपटगृहाबाहेर निघून जातो! एकूण सगळ्या दृश्याच्या जिवतपणाच कौतुक प्रेक्षक करत असतात; पण त्या पडद्यावरच्या जिवतपणाला 'प्रत्यक्षाच' आणि 'वास्तवाच' हे जे 'परिमाण' मिळतं, ते मात्र अगदी धक्कादायक आणि अनपेक्षित !

अशीच काहीशी गोष्ट झाली आहे भारतीय दूरदर्शनची. तस आपल्या करमणूक पटावर दूरदर्शन झळकल, त्याला आता बरीच वर्षं झाली; पण घरात शिरलं तरी दूरदर्शन आपल्या मनात शिरल नव्हत,आतापर्यंत. अगदी आता आतापर्यंत टेलिव्हिजन सेट म्हणजे घरोघरी हमखास आढळणाऱ्या शोकेसवजा कपाटात मधोमध ठेवायची वस्तू होती ! दिवाणखाना आणि त्याचा मालक याच्या प्रतिष्ठेत भर पडण्यासाठी एक आवश्यक वस्तू हे त्याच प्रमुख काम होतं. फार तर 'टोपॅझ् स्टेनलेस ब्लेड' असा पुकारा झाला की, फिल्मी सगीत का रंगारंग कार्यक्रम पहायला माणस टी. व्ही.भोवती कोंडाळं करत तेवढंच. आणि रविवार सध्याकाळचं 'नेसेसरी इविल' अर्थात हिंदी चित्रपट; पण या कार्यक्रमांची लोकप्रियता अनधिकृत होती म्हणजे अस की, प्रत्यक्षात छायागीत मोठ्या चवीनं पाहिल तरीसुद्धा– हॅं, कसली तुमची ती छायागीत! अस म्हणून ते सगळं उडवून लावण हे अगदी सर्रास शक्य असत!

अशा पार्श्वभूमीवर टी व्हीमध्ये प्राण ओतले आणि त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली ती दोन बाबीमुळे एकतर रगीत टेलिव्हिजन सेटस्ची निर्मिती आणि दुसर म्हणजे गेल्या आठ-दहा महिन्यापासून प्रायोजित कार्यक्रमानी उडवून दिलेली धमाल इधर उधर, अडोस पडोस, अन्वेषण, अपराधी कौन, खानदान, पेइग गेस्ट आणि या साऱ्या कार्यक्रमाच्या आघाडीवरचा हमलोग आणि त्यानतरचा ये जो है जिंदगी. या सगळ्या प्रायोजित कार्यक्रम मालिकानी दूरदर्शनच्या कार्यक्रमाचा पार चेहरामोहराच बदलून टाकला आहे आबालवृद्धासह सर्व कुटुबाने एकत्र बसून पहाता येईल असं काही असण हे आपल्याकडे बऱ्याच जणाच्या मते एखाद्या कार्यक्रमाचं सर्वात मोठ क्वालिफिकेशन असतं ! दुर्दैवाने अशा बहुसख्य गोष्टी सुमार दर्जाच्या आणि बालबुद्धी असतात; पण या काही दूरदर्शन मालिकाच्या निमित्ताने बहुधा पहिल्यादाच या अटीमध्ये बसणारे काही चागले कार्यक्रम आपल्याला पहायला मिळताहेत.

## जबर प्रतिस्पर्धी

या ठिकाणी एक किस्सा सांगण्यासारखा आहे. एका पाहणीत दूरदर्शनच्या निर्मात्या– अधिकाऱ्यांची मतं आजमावली तेव्हा त्यांच्यापैकी कोणीही प्रायोजित कार्यक्रमाच्या लोकप्रियतेबद्दल खूष दिसले नाहीत. त्याचं म्हणणं, हे सगळे कार्यक्रम चित्रपट माध्यमावर आधारलेले आहेत त्याची गुणवत्ता दूरदर्शन निर्मित कार्यक्रमापेक्षा कितीतरी कमी आहे; पण मग तरीही प्रेक्षकामध्ये ते इतके लोकप्रिय आहेत त्याचं काय ? यावर उत्तर– त्यात आश्चर्य वाटण्यासारख काय आहे, अहो प्रेक्षकाची अभिरूची फारशा बऱ्या दर्जाची नाही हे तर प्रसिद्धच आहे !

पाहणीचा हा निष्कर्ष 'आबट द्राक्ष' अशा शीर्षकान प्रसिद्ध झाला आहे आणि ते अगदी चपखल खवचट शीर्षक आहे !

म्हणजे काहीही असो, प्रायोजित कार्यक्रम आणि त्यामुळे दूरदर्शन लोकप्रिय होत आहे आणि तेही समाजाच्या सर्व बौद्धिक स्तरात याचा हा पुरावाच आहे. केवळ काही महिन्यापूर्वीच दूरदर्शनच्या कार्यक्रमांचा विचार गाभीर्यान करावा अशी काही आवश्यकता नव्हती, पण आता मात्र या इडियट बॉक्सची इडियसी– ( किंवा सूज्ञपणा ! ) दखलपात्र ठरली आहे.

प्रायोजित कार्यक्रमाची ही एवढी चलती एकाएकी कशी काय आली ? तसं करमणूक प्रकारांना बरे दिवस आले, त्याला तर पुष्कळच दिवस झाले मॅगझिन बूम आता चागली रूजली आहे. प्रायोजित कार्यक्रमाची अशी चलती हा याचाच एक भाग आहे. दूरदर्शनच्या वाढत्या जाळ्याबरोबर आणि वाढत्या प्रसाराबरोबर ते एक प्रभावी जाहिरात माध्यम बनू शकते हे एक कारण. तिसरं

महत्त्वाचं कारण अजून आपल्यापर्यंत येऊन फारसं भिडलेलं नाही; पण ते तसं भिडण्याचे दिवस आता दूर नाहीत. टेलिव्हिजनमुळे चित्रपटसृष्टीला एक जबर प्रतिस्पर्धक निर्माण झाला होताच आणि व्हिडिओमुळे तर त्याचं स्वरूप चागलंच उग्र बनू लागणार आहे. घरच्या घरीच आणि कमी दरात चित्रपट पहायला मिळणार असतील तर चित्रपटगृहं आणि एकूणच चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, तत्रज्ञ, कलाकार याच्यावर त्याचा खूपच परिणाम होणार यात काही शकाच नाही. आणि ही नवीन कुमक अशा मालिका कार्यक्रमाकडेच अधिकाधिक आकर्षित होत जाईल असा अदाज आहे.

## तुलना—मर्यादा

सरकारी धोरणाचाही थोडाफार हातभार यामध्ये आहेच. सध्याच्या सरकारी धोरणानुसार परदेशी मालिका, प्रायोजित कार्यक्रम म्हणून दाखवता येणार नाहीत. तेव्हा आता अशा मालिका इथेच निर्माण होण अपरिहार्य आहे. एक प्रकारे देशी मालासाठी ही सुरक्षित, बदिस्त आणि हुकुमी बाजारपेठच निर्माण केली आहे, अस म्हणायला हरकत नाही ! कारण या मालासाठी प्रायोजकामध्ये चढाओढ लागते एवढी त्याची मागणी वाढती आहे.

ये जो है जिंदगीचे कुंदन शाह आणि मजुल सिन्हा म्हणतात, परदेशी तोडीच्या दूरदर्शनमालिका आपणही बनवू शकतो हे आम्हाला दाखवून द्यायच होतं. या क्षेत्रातला 'परकी अंमल' आपल्यावर इतकी वर्षं चालू होता. विशेषतः निरनिराळ्या ल्यूसी मालिकाच्या निमित्तान ही अशी तुलना करावीशी वाटण साहजिकच आहे. पण परदेशी टीव्हीच्या मानानं आपल्याकडचा टीव्ही आणि असे कार्यक्रम अल्पवयीन आहेत आणि अशी तुलना मुळातच अन्याय्य ठरेल. परदेशातल्यासारख्या सोयी सवलती अजून आपल्याकडे उपलब्ध नाहीत. व्हिडिओ इक्विपमेंट महागड आहे. मुख्य म्हणजे अशा प्रकारच्या चित्रणासाठी लागणारे व्हिडिओ स्टुडिओ मुळात नाहीतच. 'हमलोग' च चित्रीकरण गुरगावच्या अपर्णा स्टुडिओत होत आणि हा अशा कार्यक्रमासाठी पुष्कळ सोयी असलेला स्टुडिओ मानला जातो. तरीही त्याच्या चित्रीकरणाचा दर्जा अनेकदा समाधानकारक नसतो. भितीच खोटेपण, सेट्स परत परत तेच तेच वाटण हे टाळता येत नाही. ये जो है जिंदगीच चित्रीकरण मुंबईच्या राजकमल स्टुडिओत होत. व्हिडिओ स्टुडिओसाठी छत खाली आलेल आणि त्याला माइक लावण्याची व्यवस्था असावी लागते. तशी इथे नाही. छत उंच आहे त्यामुळे मधे येणाऱ्या माइकमुळे तीनाऐवजी एकच कॅमेरा वापरून चित्रीकरण कराव लागतं. त्याचा परिणाम म्हणून प्रत्येक दृश्य तीन वेगवेगळ्या कोनातून टिपाव लागतं. जे दृश्य पडद्यावर साधारण तीस सेकंद दिसेल, त्याच्या चित्रीकरणाला जवळजवळ दोन तास लागतात ! उदाहरणार्थ, सेटवर जर तीन कलाकार असतील आणि एकजण जर दाराकडे चालला असला, तर आधी एका कोनातून कॅमेरा खोलीतलं दृश्य टिपेल मग दाराकडच दृश्य आणि कलाकाराची हालचाल टिपली जाईल. नंतर आणखी एका कोनातून क्लोजअप्स घेतले जातील आणि यातला प्रत्येक प्रसग दिग्दर्शकाचं समाधान होईपर्यंत म्हणजे साधारण तीन–चार वेळा घेतला जाईल आणि हे सर्व तेवीस मिनिटापर्यंत चालू राहील परिणाम ? महिन्याचे वीस दिवस रोज बाराहूनही अधिक तास काम एकदा तर आम्ही छत्तीस तास सतत काम करत होतो, आणि स्टुडिओच्या कामगारानी नाकारल नसत, तर ते कदाचित आणखीही काळ चालू राहिल असतं. सतीश शाह सागतात चक्क पिळवणूक वगैरे शब्द वापरावेसे वाटतात की नाही? या साऱ्यातला निव्वळ मानवी पातळीवर येणारा कटाळा आणि दगदग याबद्दल निदान 'च–च' तरी म्हणावस वाटेल, अगदी त्यासाठी कलाकाराना ढीगानी पैसे मिळत असले, तरी आणि हो, चित्रपटाच्या मानानं इथे मिळणारा पैशाचा ढीगही बराच छोटा असतो हेही उघडच आहे. याखेरीज स्टुडिओबाहेरचं चित्रीकरण करता येत नाही, कारण त्यासाठी बिनतारी माइक लागतात आणि त्याला सरकारी परवानगी मिळत नाही. त्यामुळे एकाच एका पार्श्वभूमीवर घटना घडवाव्या लागतात आणि कार्यक्रमाच्या रगतीत यामुळे बाधा येऊ शकते. ये जो है जिंदगीच्याबाबतीत हे विशेष जाणवतं किंवा परदेशातल्याप्रमाणे आपल्याकडे लेखक, दिग्दर्शक, तत्रज्ञ याचे वेगवेगळे पैलू हाताळणारे ताफे नसतात. त्यामुळे एखादा दुसराच लेखक, एखादा दुसराच दिग्दर्शक यांच्या प्रतिभेवर प्रचड ताण पडतो आणि त्याचा परिणाम दर्जावर होण अगदी अटळ असत.

## लोकप्रिय का ?

परंतु या साऱ्या कमतरतासहही हे कार्यक्रम लोकप्रिय होताहेत, अगदी तुफान लोकप्रिय होताहेत. याबद्दल बोलताना मंजुल सिन्हा म्हणतात, परदेशात एखादी मालिका साधारण सहा महिने चालते. उन्हाळ्यात जेव्हा प्रेक्षक घराबाहेर पडण्यात अधिक रस घेतो, तेव्हा तेच कार्यक्रम फिरून दाखवले जातात. हिवाळ्यात जेव्हा घरात बसणं भाग असतं, तेव्हा नवे कार्यक्रम काढले जातात; पण भारतातली परिस्थिती अशी नाही. दूरदर्शनचा वाढता प्रसार आणि त्यामुळे नवा, विस्तृत प्रेक्षकवर्ग आणि दूरदर्शनबाबत त्याच्या सतत वाढणाऱ्या अपेक्षा यामुळे टिव्हीचा मोसम इथे वर्षभरच चालू आहे, निदान सध्या तरी !

टिव्ही आपल्या जीवनाच्या चाकोरीचा एक अविभाज्य घटक होतो आहे आणि तोही नकळत त्यान आपल्याशी साधलेला सवादही अधिक जवळचा, सूक्ष्मपणे आत भिडणारा. कारण त्याचे कार्यक्रम चित्रपटगृहासारख्या सार्वजनिक अ–व्यक्तिगत (इम्पर्सनल) ठिकाणी बसून बघावे लागत नाहीत चित्रपटाप्रमाणे प्रत्येक माणसाला ते बघण्याचा निर्णय–कॉन्शस चॉइसही करावा लागत नाही. ते तुम्हाला दिसतातच, नाही तर ऐकू येतात, त्याच्या चर्चा गाडी-बस-ऑफिसमध्ये. तेव्हा चित्रपट प्रभावी असेल, तर दूरदर्शन त्याहूनही अधिक प्रभावी ठरू शकत आणि आपल्या बाबतीत तर ते अधिकच प्रभावी ठरणार आहे कारण माध्यमाविषयीची परिपक्वता आपल्याकडे नाहीच. कला आणि जीवन यात आपण फार झगाट्यानं गल्लत करतो. कलावाद्याची माफी मागून अस म्हणावस वाटतं की, कलेसाठी कला किंवा कलेला सपूर्ण स्वायत्तता देणारा विचार भारतीय जनमानसात रूजू शकणार नाही. इथे प्रश्न त्या विचारसरणीच्या तार्किकतेचा किंवा तिच्या खरेपणाचा नाही, तो केवळ आपल्या वृत्तीचा किंवा आपल्या कलाचा।

प्रश्न आहे पडद्यावरच्या सनोषीमातेला नवस बोलायला आपल्याला वेळ लागत नाही चित्रातल्या फुलाचा वास घेतल्याशिवाय आपल्याला चैन पडत नाही आणि ओबडधोबड मर्दानीपणा दाखवायला 'अरी ओ साबा'चे सवाद आपल्याला हाणावे लागतात. यामागची सास्कृतिक आणि सामाजिक कारणही मोठी इटरेस्टिंग असतील; पण आपल्या मानसिकतेत कलास्वादासाठी लागणारी तटस्थ वृत्ती फारच अभावानं आढळते हे मात्र नक्की.

म्हणजे आता लोकप्रिय होत जाणारे प्रायोजित कार्यक्रम किती गभीरपणे घ्यायला हवेत हे तुम्हाला जाणवल असेल. हे कार्यक्रम आपल्याला केवळ मॅगी–मिल्कमेड–नेसकॅफे–विको वज्रदतीच विकत नाहीत, काही मूल्य ते आपल्याला विकताहेत. काही घटना, काही मत, विचार परत परत आपल्या मनावर ठसवताहेत आणि या सामाजिक घटनेची तपासणी करण, काय विचार आपल्याला जवळजवळ अधिकृत म्हणून दिले जाताहेत ते पहाण आवश्यक ठरेल.

## बिन झालरीचा विनोद

ये जो है जिंदगी आणि हम लोग हे सगळचात जुने कार्यक्रम आणि सगळचात लोकप्रिय विनोदाच्या अगाने जाणारे असल्यामुळे त्यात मूल्यं किंवा गांभीर्यपूर्वक काही सलग विचार याचा फारसा सबध येत नाही ठराविक साचेबद आणि ठोकळेबाज विनोदाचे विषय वगळणं ही सगळचात मोठी जमेची बाब. नाहीतर हसवू न शकणारा, रटाळ विनोद हीच प्रेक्षकासाठी विनोदाला लावलेली कारुण्याची झालर ठरते ! ये जो है जिंदगीतला विनोद झालरीचा अट्टाहास न धरणारा कधी शाब्दिक, बहुतेक वेळा प्रासगिक, फार्सिकल, क्वचित स्लॅपस्टिक कुटुबातली सगळी पात्र खमकी आहेत हे सुखावह वाटत. नाही तर विनोद म्हटला की गरीब बिच्चारा नवरा आणि लठ्ठ कजाग बायको (आणि विनोदाचा कळस म्हणजे रविवारी सकाळी नवऱ्याला पेपर वाचायचा असणे आणि बायकोनं त्याला अघोळ करायला लावणे) अस काही आलं की, प्रेक्षकाची 'परिस्थिती हसनेकी चाहने इतना मुझे रुलाया है' रणजीत मेल शॉवनिस्ट पिग, तर रेणू त्याला पुरून उरणारी आणि राजा या दोघाना धक्के मारत स्वत:ला मधोमध जागा करून घेणाऱ्या मिकी माऊससारखा.पार्श्वभूमी मध्यमवर्गाची आणि बहुतेकवेळा त्यातल्या समस्या नाटकी आणि त्याचो उत्तरही नाटकी. घट्ट जमीन आणि तनोतत वास्तवाशी सबध मुळातच तोडलेला. तशा समस्या रोज भेटणाऱ्या आणि परिचित; पण त्याचा वेष तद्दन नाटकी. यातून कधीतरी परिस्थितीवर भेदक भाष्य होतं, आणि काही प्रस्थापित समजुती उलटपालट तपासल्या जातात तेव्हा चमकदार आणि बुद्धीला सुखवणारा विनोद निर्माण होतो उदाहरणार्थ फिल्मी स्टाइलचा 'बॉम, इसको काटू ?' म्हणणारा खलनायक, दक्षिण भारतीयांची रूढीप्रियता आणि त्याच 'विदेशी जानवं', लग्न जमवण्याच्या सनदशीर मार्गातला निर्जीवपणा, प्रत्यक्षात नसली तरी मनानं स्त्री ही अनत काळची माताच असते इत्यादी समजुतीना खुमखुशीत छेद अशी विषयाची अपरिचित हाताळणी ही एक प्रकारे अपरिचित आणि निराळ्या मूल्याची तोडओळखच आहे अशा प्रसगाशी परत जेव्हा गाठ पडेल तेव्हा त्याच्या पोकळपणाची जाणीव प्रेक्षकाच्या मनात कुठल्यातरी कोपऱ्यात नक्कीच असेल

हम लोगचा विचार अधिक विस्तारानं करायला हवा. हा कार्यक्रम अधिक जुना, प्रस्थापित, अधिक लोकप्रिय. त्याचा प्रेक्षकवर्गही विस्तृत हम लोगवर सहसा कुणी तटस्थ सापडणार नाही. माणस झडूनझडून त्याच्या बाजून तरी बोलतील नाहीतर तुटून तरी पडतील तो कटाळवाणा आहे की रजक, फिल्मी आहे की सत्याला धरून, भरकटनोय की रागेत चाललाय, अशा सगळ्या मुद्यावर प्रेक्षक तावातावान बोलतात. म्हणजे एवढी सगळी माणस हम लोग बघतातच मग भले ते टीका करण्यासाठीच असो ! हम लोगच स्वरूपच अस आहे की त्याच अपील जबरदस्त आहे, कारण एक तर तो आहे सोप ऑपेरा, म्हणजे चक्क कौटुबिक जिव्हाळ्याचे नाटक करमणूक, थोडा बोध ( तेवढच जरा सद्सद्विवेकबुद्धीला समाधान) आणि पात्र, घटना, विषयाच्या वैविध्यामुळे प्रत्येकाला त्यात कुठेतरी काहीतरी खास व्यक्तिगत सापडेलच.

## बहुसूत्री–हम लोग

हम लोगच्या लोकप्रियतेच आणखी एक महत्त्वाच कारण आपल्याकडच्या माध्यम पद्धतीत सापडेल आपल्याकडे एकच टेलिव्हिजन तोही सरकारी ! दोन तीन वेगवेगळ्या कपन्या नाहीत, त्यावरही एक चॅनल, एका वेळी एकच कार्यक्रम. तुम्ही पेडर रोडला रहा की धारावीच्या झोपडपट्टीत महानगरात रहा की झुमरीतलैयाला रहा, तुमच वय, आवडीनिवडी काहीही असोत, तुमची दूरचित्रवाणी तुम्हाला एकच कार्यक्रम दाखवणार अशा परिस्थितीत हम लोगसारखा घरदार, पसाऱ्याचा कार्यक्रम बरा त्यातलं मध्यवर्ती कुटुब आहे कनिष्ठ मध्यम वर्गातलं आणि हा वर्ग भारतातला मध्यवर्ती बहुसख्याक मानला पाहिजे, मग ते शहर असो की खेड आणि कुटुब उच्चवर्णीय असो की कनिष्ठवर्णीय त्याच्या जीवनात येणारे निरनिराळे प्रसग आणि त्यातून प्रवेश करणारा उच्च वर्ग, उच्च मध्यमवर्ग. पात्रातही वैविध्य आहे प्रत्येकाचा स्वभाव वेगळा, नशीब वेगळं आणि तरीही सगळे एकमेकाशी अटळ धाग्यानी बाधलेले, कधी ना कधी तरी दुसऱ्याच्या आयुष्यावर काही ना काही प्रभाव टाकणारे हम लोग दीर्घसूत्री होतोय का अशी मधून मधून आरडाओरड केली जाते. पण मला वाटतं हम लोग दीर्घ सूत्री 'होतोय' नव्हे, तो दीर्घसूत्री 'आहेच'. त्याच्या स्वरूपाचा दीर्घसूत्रीपणा हाच स्थायीभाव आहे एवढी पात्र आणि त्या प्रत्येकाच्या घडामोडीचा मागोवा घ्यायचा तर कथासूत्र झपाट्यान पुढे सरकणं शक्यच नाही कारण त्याचा पायाच मुळी असा आटोपशीर नाही आणि एवढा आखीवरेखीव बाधलेपणा फक्त एखाद्या छोट्याशा कथेला नाहीतर कवितेलाच शक्य होतो. हम लोग एखाद्या आधुनिक काळातल्या सामान्य लोकाच्या जीवनाच्या महाभारतासारखं पसरट आहे

कौतुकाची गोष्ट वाटते ती ही की, या पसाऱ्यामध्ये प्रथमपासून मान्य केलेली किंवा गृहीत धरलेली मूल्य आज दहा महिन्यानतरही तीच आहेत. कार्यक्रमामध्ये एक वैचारिक घट्ट बाधणी आहे आणि तिच्यामधे अखडपणा, सलगपणा जाणवतो आणि अर्थातच ही मूल्यं बहुधा योग्य प्रकारची मूल्यं आहेत.

सोप ऑपेराच्या मानान हम लोगचं हे स्वरुप धक्कादायकपणे वेगळं आहे (जाता–जाता सोप ऑपेरा या नावामागच कारण फक्त एवढच आहे की, अशा प्रकारचा कार्यक्रम एका साबण बनवणाऱ्या कपनीनं अमेरिकेत प्रथम सुरू केला) तसं तर बोधप्रद, कौटुंबिक आणि सोज्वळ नाटकाची कमतरता आपल्याकडे मुळीच नाही; पण अशा रीतीच्या तात्पर्य अधोरेखित केलेल्या नाटकामधला बोध हा बोध नसून फक्त बाळबोधच असतो. कौटुंबिक प्रसंग म्हणजे एका ठराविक छापाचे सोज्वळ नाही तर भयंकर अनैतिक वागणुकीचे नमुने अस फक्त काळ्या–पांढऱ्या रंगातल चित्र आपल्याला पहायला मिळतं; पण हम लोग हा अशा दुर्मिळ कार्यक्रमापैकी एक आहे की जिथे 'कौटुंबिकता' हा शब्द गुणविशेष म्हणून नाही, तर केवळ वर्णनात्मक म्हणून वापरता येईल.

## प्रेक्षकांशी तादात्म्य

तसे सर्वच प्रसग यथातथ्य (ऑथेंटिक्) उतरतात की नाही हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. कनिष्ठ मध्यम वर्गीय बसेसर आणि कुटुंबियाच्या चित्रणातला मोकळेपणा आणि खरेपणा, किशोरीलालच्या उलाढालीत पुरेसा जाणवत नाही खलनायकीत स्पष्ट फिल्मी झाक जाणवते.

अशा कौटुंबिक वळणानं जाणं हेच खरं तर सोप ऑपेराच्या स्वभावात बसत ढॅण–ढॅण पाश्वसंगीताच्या पार्श्वभूमीवर नन्हे किशोरीलालच्या फार्मवाल्या कुटियात जायला निघाला, म्हणजे हिन्दी चित्रपट पहाताना जसा पश्चात्ताप होतो, त्याची आठवण यायला लागते ! त्यातल्या त्यात बरी गोष्ट म्हणजे हम लोग मधल्या खलनायकीच घाऊक कत्राट तरी कुणाला दिलेल नाही. *त्यामुळे इथली गुतागुत खोलवरची वाटते.* हिंदी चित्रपटात सगळ्या दुष्ट गुतागुतीची जबाबदारी एखादाच खलनायक (आणि अर्थात त्याचा एखादा 'नवर एक') घेत असतो. त्यामुळे त्याला खतम केल की आनदी आनद गडे; पण हम लोग मधले मझली, नन्हेसारखे लोक आपापल्या कर्तृत्वान भानगडीत अडकतात आणि एकदा ते तसे अडकल्यावर बाहेर पडायचा एखादा चोरदरवाजा लेखक त्याच्यासाठी ठेवत नाही म्हणजे किशोरीलाल कसा चांगलाच असतो, किंवा नन्हेची हिरोगिरी त्याला पुरुन उरते, टोनीचा खूनच मुळी झाला नाही किंवा मझलीची इज्जत बचावायला थेट स्वर्गातून भगवानने हिरोला विमानातून पाठवल असला पळपुटेपणा नाही. इथे सगळेच हिरो, सगळेच विलन आणि सगळ्याचे पाय मातीचे.

*हम लोग सारख्या एखाद्या केवळ दूरदर्शन मालिकेची चर्चा एवढ्या गांभीर्याने* का करावी असा परत परत प्रश्न पडतो आणि बसमधलं, गाडीमधलं, फोनवरचं एखाद सभाषण ऐकलं म्हणजे त्याच उत्तर मिळत. 'अरे, बडकीच लग्न जमल बरं का!' 'लल्लू तो यार बॅक टू पॅविलियन आ गया!' 'किशोरीलाल खरोखरच मेला हं!' असं सभाषण ऐकलं की कळत हम लोगशी प्रेक्षकाच जबरदस्त आणि वास्तवाच्या पातळीवरच तादात्म्य झाल आहे, आणि म्हणून *हमलोगचा गांभीर्यान विचार करण भाग* आहे. (सेवन हड्रेड डॅश थर्टीन हड्रेडच्या नोकरीमाठी झुरणारा लल्लू) इथली कुठली व्यक्ती आपल्याला अपरिचित आहे ? खास जुन्या पठडीच्या नैतिक शिस्तीचे, निर्भीड पण स्वतःची पुनरावृत्ती करणारे दादाजी, खाष्ट दादी, बेजबाबदार आणि दारुबाज, निबर तरीही मुलासाठी माया असणारा बाप बसेसर, प्रेमळ आणि त्याग करणारी माँ हिंदी चित्रपटाच्या सौजन्याने, एक बावळट मुलगा लल्लू, एक स्मार्ट आणि धडपड्या मुलगा नन्हे आणि मझली ज्याच्या धडपडीला गरिबी अज्ञान आणि दुःसाहसी वृत्ती याच्यामुळे योग्य दिशा मिळू शकत नाही. चटपटीत छुटकी, पुरुषप्रधान समाजरचना आणि मूल्यव्यवस्था याच्या आघातामुळे कुढत बसणारी आणि नंतर परिस्थितीवर मात करणारी बडकी. ही सगळी ठळकपणे प्रतिनिधिक *आहेतच, पण आजूबाजूची विलायती चाचा* आणि कुटुंबीय, अपत्यहीन डॉक्टर अश्र्णी आणि तिचा नवरा, मनाचा चागला पण नाटकीपणाचा आणि क्वचित दंभाचा स्पर्श असलेला डॉ. अश्विनी, किशोरीलाल आणि त्याच मायाजाल, बडे बापकी लाडकी बेटी कामिया, महादेव बाब आणि त्याचे गण, प्रीतम उस्ताद आणि फिल्मी दुनियेतले आणि भ्रष्टाचारातले पहुचे हुए केसरी सारखे पैसेवाले खर म्हणजे या सगळ्याची करावी तेवढी यादी थोडीच आहे *या सगळ्याचा* मिळून हम लोग म्हणजे एक छोट्या प्रमाणावरचा समाज बनला आहे आणि यातल्या प्रत्येकाच्या समस्याचा पाठपुरावा करत गेलो तर कुठल्यातरी अधिक व्यापक प्रश्नावर आपण येऊन भिडतो. भ्रष्टाचार, सरकारी धोरणाचा विपर्यास, बेकारी, अज्ञान, रूढीप्रियता, स्त्रीमुक्ती, हुडयाचा प्रश्न, दारिद्र्य, वर्तमान सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीत व्यक्तीची होणारी घुसमट, कुटुब नियोजन आणि अशाच अनेक लहानमोठ्या प्रश्नाना स्पर्श हा हमलोगमधला महत्त्वाचा भाग. दुर्दैवाने कधीकधी तो कथानकाच्या नैसर्गिक ओघात येत नाही आणि मग बहूनच्या कार्यालयापासून ते पोलीस स्टेशन आणि महादेव बाबूच घर या सगळ्या ठिकाणी नाचणारा एकच एक इंदिरा गाधींचा फोटो ठिगळासारखा वाटतो (तोही *खोट्या वाटणाऱ्या भिंतीवरचा !) असल्या* सगळ्या जुन्या आणि हुकुमी क्लृप्त्या कार्यक्रमाचा दर्जा धाडकन खाली आणतात.

## लोकप्रियतेची गणितं ?

हम लोगमध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नाना उत्तर कशी मिळतात ? किंवा निराळ्या शब्दात म्हणायच तर या प्रश्नाकडे बघण्याच पर्स्पेक्टिव कस येत ? एक तर अशोककुमारच्या वक्तव्यातून आणि स्वतः पात्राची काही वक्तव्य, घटनाची माडणी, सवाद (*आणि अर्थातच त्यातून डोकावणारा लेखक !*) या साऱ्यामुळे एका अतर्गत भाल्याबरोबरच घटना प्रेक्षकापर्यंत पोचतात आणि घटनाना नवा अर्थ देणारा कॅटलिस्ट इथेच असतो उदाहरणार्थ टोनीच खून प्रकरण, खटला या साऱ्यातून मझली बाहेर पडते आणि त्या साऱ्याच्या शेवटी इन्स्पेक्टर म्हणतो, तू बहादूर मुलगी आहेस तुझ्याजागी दुसर कोणी असनं तर तिनी जीव दिला असता तू मात्र या सगळ्या मानसिक ताणाला तोड दिलस हाच खंबीरपणा ठेव लोकाची पर्वा करू नकास–सगळ्या गडबड घोटाळ्यात हा खास शाबीत मुद्दा येतो तो सगळ्यात शेवटी, आणि या सपूर्ण प्रकरणाचा अर्थच त्यामुळे बदलल्यासारखा वाटतो हे धक्कातंत्र हा अर्थात लेखनाच्या तांत्रिक कौशल्याचा भाग झाला. पण त्यातला आशय जरा सावरून

बसायला लावणारा आहे, इतपत श्रेय हम लोगला द्यावं लागेल. अग्निदिव्य करूनही सीतेला माफ न करू शकणाऱ्या आपल्या परंपरेत असा वेगळेपणा अक्षम्यही ठरू शकेल. थोड्या फार फरकानं हम लोगमधल्या सगळ्याच कथासूत्रांमध्ये असा वेगळेपणा आहे, कारण तो हम लोगमागच्या जीवनदृष्टीचा, world view चा ( किंवा अधिक उचित शब्द म्हणजे weltanschuung ) चा भाग आहे. भिकार चित्रपट निर्मिती करून वर आणखी 'आम्हाला काय, लोकांना आवडतं ते आम्ही देतो' अशी उद्दाम वक्तव्यं करणारांची आपल्याला इतकी सवय झाली आहे की, लोकप्रियता म्हटलं की अंग चोरून पळ काढावासा वाटतो. या पार्श्वभूमीवर हम लोगचं स्वरूप आणि लोकप्रियता एकत्र जाताना पाहिलं की अगदी 'युरेका' चा जल्लोष जरी नाही, तरी सुटकेचा सुस्कारा तरी सोडायला हरकत नाही. निदान ते या दृष्टीनं निरुपद्रवी तरी आहे !

## प्रसार माध्यमातली क्रांती !

अर्थात हम लोग लोकांच्या मताप्रमाणं घडत जातं की लोकांची मतं घडवण्याचा प्रयत्न करतं याचं उत्तर 'हे दोन्हीही खरं आहे' असंच द्यावं लागेल. दिग्दर्शक पी. कुमार वासुदेव यांनी तर म्हटलंच आहे की, या सगळ्या पात्रांचं भवितव्य कसं घडवायचं याबद्दलचे तीन आराखडे आमच्याकडे तयार असतात आणि लोकमताचा कौल पाहून त्याबद्दलचा निर्णय आम्ही घेतो. पण काही बाबतीत लोकमताच्या विरुद्ध हम लोग गेलेलं असावं. विशेषतः बडकीच्या लग्नाची घाई तर बऱ्याचजणांना झाली असावी असं दिसतंय. मुलीला एक बरं स्थळ विनासायास आणि बिन हुंड्याचं मिळावं असा बसेसर सारखाच दृष्टिकोन या प्रेक्षकांचाही असावा! या एकाच प्रसंगातून आपल्या तत्त्वांवर निष्ठा ठेवण्याचं एक झळझळीत उदाहरण मिळतं— मग त्यापासून वैयक्तिक पातळीवर दुःखच मिळालं तरी बेहत्तर. स्त्री म्हणजे सेवा, त्याग आणि घरात नवीन येणाऱ्या स्त्रीनं उगीचच बाजी लावून सासरच्यांची मनं जिंकून वगैरे घ्यावी अशा अनेक जाचक आणि वेडगळ समजुतींना तडा गेला आहे तो याच प्रसंगात. स्त्रीमुक्तीचा असा तार्किक शेवट त्याच्या बऱ्यावाईट परिणामांसह मांडण्याची हिंमत आपल्या दृश्य माध्यमातून मला तरी फारशी पहायला मिळालेली नाही पण बडकीच्या या खंबीरपणाला प्रेक्षकांनी अखेरीस का होईना पण दाद दिली. तिने स्वतःच्या व्यक्तित्त्वाची विश्वासार्हता टिकवली म्हणून ही दाद होती की, अखेर जमलं बुवा लग्न एकदाचं म्हणून होती असा प्रश्न पडेलच ! वाईट, भडक आणि हिंसक दृश्यांचे परिणाम खोलवर कुठेतरी ठसा उमटवत असतातच, पण एरवी सौम्य असणाऱ्या बडकीचा तत्त्वासाठीचा तेजस्वी आग्रहही मनात नोंदला जाईल का? हे तर काळच सांगू शकेल.

हम लोगमधली आणखी एक धीट पायरी म्हणजे वडिलधाऱ्यांच्या मानसिक अधिपत्याला आव्हान. भारतीय मनोवृत्तीत वय आणि अधिकारानं येणाऱ्या वडिलकीपुढे सपशेल मान तुकवणं याचा भाग एवढा एवढा मोठा असतो, की त्याला आव्हान देणारं काही आपल्याला रुचणं कठीणच आहे; पण अश्विनीच्या चाचासमोर बडकीनं कणखर पवित्रा घेतला आणि तरुणांचेही उसूल असतात, आपण त्यांचा आदर ठेवला पाहिजे असं म्हणून दादाजींनी त्याला प्रतिष्ठाही दिली. खानदानकी इज्जतशी लढून जिंकणारी मुहब्बत आतापर्यंत आपल्याला माहीत होती; पण हा विचार त्याच्यापुढचा, त्याहून अधिक खोलात जाणारा आहे. बसेसर, दादी ही मुलांच्या आयुष्यात व्यत्यय आणणारी आहेत आणि या सगळ्या संबंधात तरुण पिढीच्या सूज्ञपणावर शिक्कामोर्तब केलं आहे. आंतरराष्ट्रीय युवक-वर्ष झिंदाबाद !

आपल्या बंदिस्त तसबिरीतून हम लोग आत्ताच खाली उतरलं आहे. स्त्रियांना मदत करणाऱ्या संस्थांची माहिती, परदेशी नोकरीसाठी जाण्यासंबंधी माहिती या साऱ्यासाठी संदर्भकेंद्र म्हणून हम लोगनं काम करायला सुरुवात केलीच आहे असं दिसतं. भारतासारख्या विकसनशील देशात, जिथे केवळ साधनसामुग्रीच नाही, तर सगळ्याच प्रकारे सकस जीवनाची कमतरता आहे, त्याच्या मार्गांबद्दल अनभिज्ञता आहे, तिथे अशा सामाजिक महत्त्वावर भर द्यावा तितका कमीच.

हम लोगनं प्रसारमाध्यमात क्रांती घडवून आणली आहे हे निःसंशय. प्रायोजित कार्यक्रमांची लाटच्या लाट आपल्यावर येऊन थडकते आहे. करमणूक करण्याबरोबर अशा काही वैचारिक, भावनिक गुलामगिरीतून आपल्याला सोडवायला ती अशीच सहायभूत होईल, अशी आशा करू या. हे कार्य सिद्धीस नेण्यास आपलं दूरदर्शन आणि सरकारी खाक्या समर्थ आणि सहायभूत होईल का? मनोर बॉर्न आणि डिफरंट स्ट्रोक्ससारखे सुंदर सुंदर कार्यक्रम उगवले आणि तडकाफडकी मावळले. – खरं तर त्यांचा उल्कापातच झाला. हम लोगचे दोनशे कार्यक्रम होणार का पाचशे याविषयीच्या खमंग चर्चा आपण ऐकत असतानाच हम लोग गप्प झाले नाहीत म्हणजे मिळवली !

□



पुस्तके

### दीर्घ आणि चिकाटीच्या परिश्रमाचे फलित

# मराठी वृत्तपत्रांचा इतिहास

मुंबईचे एक पत्रकार श्री. रा. के. लेले यांनी 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' नामक ११११ डेमी पृष्ठांचा ग्रंथ लिहून मराठी संदर्भ–साहित्याला भूषणावह ठरावे असे कार्य निश्चित केले आहे. प्रस्तुत इतिहासग्रंथात 'दर्पण' या पहिल्या वृत्तपत्रापासून तो थेट १९८२-८३ पर्यंतच्या वृत्तपत्रांचा त्यांनी ऐतिहासिक पद्धतीने आढावा घेतला आहे. म्हणजे स्थूलमानाने गेल्या दीडशे वर्षातील यच्चयावत मराठी दैनिके, साप्ताहिके आणि पाक्षिके यांचा त्यांनी परिचय करून दिला आहे. इतकेच नव्हे तर 'संकलनावर अधिक भर' ही आपली भूमिका विसरून त्यांनी परिचयाला परामर्शाचीही जोड दिली आहे. नाहीतरी इतिहास ग्रंथ म्हणजे निव्वळ संकलन नसतेच. अचूक संशोधन, संकलन आणि संकलन-सामग्रीचे ताटस्थ्याने आलोचन असेल तरच 'इतिहास' या संज्ञेला एकादा ग्रंथ पात्र होतो. या दृष्टीने श्री. लेले यांचा वृत्तपत्रांचा हा इतिहासग्रंथ महाराष्ट्राच्या सर्वांगीण इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन होऊन बसेल यात शंका नाही.

'मराठी नियतकालिकांचा इतिहास' (रा. गो. कानडे, प्रकाशन, १९३८) आणि 'वृत्तपत्रांचा इतिहास' (मुख्यतः वि. कृ. जोशी आणि रा. के. लेले, प्रका. १९५१) असे दोन ग्रंथ यापूर्वी प्रकाशित झाले आहेत. पैकी पहिला मुख्यतः संकलनात्मक असून त्यात वृत्तपत्रांबरोबर मासिकादी नियतकालिकांचीही माहिती (१९३७ पर्यंतची) आलेली आहे. दुसऱ्या ग्रंथाची कालमर्यादा १८८० पर्यंतचीच आहे व त्या ग्रंथाच्या लेखनात श्री. रा. के. लेले हे कै. जोशी यांचे साहाय्यक होते. वरील दोन्ही ग्रंथांच्या कालमर्यादा आणि स्वरूप ध्यानी घेऊन श्री. लेले यांनी आपला नवा ग्रंथ अद्यावत स्थितीस आणून पोचविला आणि दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके यांवरच तो केंद्रीभूत केला हे त्याचे ठळक वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील एकही वृत्तपत्र आपल्या ग्रंथातून वगळले जाता कामा नये, याविषयी त्यांनी जी दक्षता बाळगळी आहे ती विशेष कौतुकास्पद म्हटली पाहिजे. (संदर्भ सूची पाहा) आपल्या 'भूमिके'त त्यांनी विनम्रपणे (आणि सावधपणे) ग्रंथ प्राधान्याने संकलनपर असल्याचे म्हटले असले तरी समग्र ग्रंथ वाचून पाहता त्यांचा ग्रंथ इतिहासग्रंथच आहे असे निःशंकपणे म्हणावेसे वाटते.

श्री. लेले यांचा हा भलामोठा ग्रंथ माहितीपूर्ण आणि विवेचनपर असल्यामुळे अंतरंगासह त्याचा परामर्श घेणे मर्यादित जागेत शक्य नाही व त्याची तितकी आवश्यकताही नाही. त्यानी आपली ग्रंथरचना किती परिश्रमपूर्वक आणि कशा पद्धतीने केली आहे याचे थोडे दिग्दर्शन केले तरी पुरेसे होईल. या ग्रंथाचे शेवटी 'निवडक संदर्भ व अन्य साधने' आणि परिश्रमपूर्वक केलेली 'संदर्भसूची' असा ५३ पृष्ठांचा उपयुक्त मजकूर आहे. तो वरवर चाळला तरी ग्रंथकाराच्या कळकळीची, चिकाटीची नि परिश्रमशीलतेची कल्पना येऊ शकते. ग्रंथारंभी दहा निवडक प्रातिनिधिक वृत्तपत्रांच्या जुन्या अंकांच्या मजकुराचे ब्लॉक्स आहेत; पण निवडक समर्थ संपादकांची छायाचित्रे मात्र अजिबात नाहीत हे खटकते. (कै. कानडे यांचा सचित्र ग्रंथ या दृष्टीने उठावदार, उपयुक्त म्हणावा लागेल.) प्रास्ताविकासह एकूण २१ प्रकरणांपैकी मूळ विषयाशी संबंधित असणारी १५ प्रकरणे आहेत, तर आरंभीच्या सहातून भारतात वृत्तपत्रे आधी निघाली केव्हा, कुठल्या शहरी, कोणी काढली, कोणत्या हेतूने, कोणाच्या भाषेत, वृत्तपत्रे आणि शासन यांचे त्याकाळी संबंध कसे होते–इत्यादी माहिती देण्यात आली आहे. मराठी वृत्तपत्रांच्या उदयापूर्वीची पूरक-प्रेरक पार्श्वभूमी या दृष्टीने ही पहिली सहाही प्रकरणे अत्यंत उद्बोधक आहेत यात शंका नाही. मुंबईच्या आधी कलकत्ता आणि मद्रास या इंग्रजांच्या पुढाकाराने मुख्यतः इंग्रजी वाचकांकरिता इंग्रजी पत्रे सुरू झाली आणि नंतर हळूहळू भारतात विदेशी–देशी पत्रांचा प्रबोधनाच्या हेतूने उदय होऊ लागला. यासंबंधीचा श्री. लेले यांनी दिलेला सर्व तपशील महत्त्वाचा आहे. मुंबईत मराठीच्या आधी गुजरातीने पत्रसृष्टीत प्रवेश मिळविल्याचे ते साधार दाखवून देतात. 'दर्पण' या आद्य (१८३२) समजल्या जाणाऱ्या पत्राचे आधी १८२८ साली 'मुंबापूर वर्तमान' नावाचे एक अल्पजीवी पत्र निघत होते (पृ. ५४–५५) ही माहिती वाचून तर अनेकांना धक्का बसेल. या पत्राच्या अस्तित्वाचा अस्सल पुरावा मात्र ग्रंथकाराला उपलब्ध झाला नाही. दुय्यम, पण भक्कम पुरावा तेवढा मिळतो.

## अभिमानास्पद कार्य

श्री. लेले यांच्या या इतिहासग्रंथाची रचना सामान्यपणे अशी आहे. पत्र कोणी, केव्हा, कोणत्या उद्देशाने सुरू केले ते सांगून त्याचे स्वरूप व कामगिरी वर्णन करावयाची आणि नंतर संपादकाच्या वा संपादकांच्या कर्तृत्वाचे आलोचन करावयाचे. याप्रमाणे त्या त्या पत्राच्या इतिहासलेखनाचे स्वरूप आहे. दीर्घकाळ चालू असलेल्या पत्रांचे बाबतीत लेले यांनी त्या त्या पत्राचा एकसंध सलग इतिहास कथन केला आहे. (उदा. केसरी) अशा बाबतीत अन्य पर्याय स्वीकारणे कुणालाही कठीण गेले असते; पण या पद्धतीने वृत्तपत्रांचा, विशेषतः महत्त्वाच्या पत्रांचा इतिहास सांगताना पुनरुक्ती आणि अकारण विस्तार झाला आहे व ग्रंथाची पृष्ठे त्यामुळे २५०–३०० तरी वाढली आहेत. आधी एखाद्या प्रभावी वृत्तपत्राची सर्वंकश माहिती द्यायची आणि पुन्हा संपादकाच्या कामगिरीचा नि शैलीचाही आढावा घ्यायचा–अशा लेखनपद्धतीमुळे विशिष्ट पत्र

आणि त्याचा सपादक याची एकत्रितच, पण पुनःपुन्हा माहिती वाचत असल्याचा वाचकास भास होत राहतो आणि ग्रथ पसरट झाल्याची जाणीव होत राहते. तथापि याबरोबरच वृत्तपत्रावरील शासकीय निबंध, गाजलेले खटले, मुद्रणस्वातत्र्याचे कायदे, अलीकडच्या काळातील आणीबाणी इत्यादी अनेक अनुषगिक अगाची श्री. लेले यानी माहितीपूर्ण चर्चा केली आहे. अनेक सपादकाविषयी त्यानी निर्भीडपणे लिहिले आहे; पण वृत्तपत्र म्हणजे काय, ते कसे चालवावे, चालते, बुडते, आदर्श संपादकाच्या आपल्या सकल्पना कोणत्या, जाहिरात, वितरण आणि व्यवस्थापन यांचा वृत्तपत्राशी किती निगडित संबध असतो—इत्यादी गोष्टीचा या ग्रंथात पुरेसा उहापोह हवा होता संपादकाचे कर्तृत्व जोखताना श्री. लेले बव्हंशी वस्तुनिष्ठ दृष्टी वापरतात. तर काही व्यक्तिनिष्ठ उपद्रवशक्तीकारक सपादकांची अवाजवी भलावण करतात. अर्थात एकूणत: गुणदोषांसकट ते परामर्श घेतात हेही नमूद करावेसे वाटते. मराठी पत्रकार परिषदा आणि वृत्तपत्र विद्यालयाचे कार्य याच्यासंबंधी ग्रंथात स्वतंत्र अधिक माहिती अपेक्षित होती

आणखी दोन-तीन उणिवा वा खटकलेल्या गोष्टी सागतो. सायदैनिकात पुण्याच्या दीर्घकाळ चाललेल्या दै. संध्याचा उल्लेख आढळला नाही. ग्रथारंभीचे 'प्रास्ताविक' हे प्रकरण समालोचनात्मक प्रकरण या नात्याने थोडे वाढवून शेवटी द्यायला हवे होते. शेवटच्या जोशीकृत विस्तृत 'संदर्भसूची'चे व्यक्तिनामे आणि विषयनामे—असे दोन भाग असते तर सदर्भ पाहणे अधिक सोयीचे झाले असते. शिवाय अग्रणी, घोरपडे बाबासाहेब, भारत, वदेमातरम् अशा काही नोंदी जाणकार वाचकाच्या दिशाभूल करणाऱ्या आहेत वेगवेगळचा सदर्भातील शब्द एकाच नोंदीत कोंडणे अशास्त्रीय आहे; पण या झाल्या किरकोळ गोष्टी. त्यामुळे ग्रथाचे सदर्भमूल्य आणि महत्त्व मुळीच कमी होणारे नाही 'एका व्यक्तीने आपल्या बौद्धिक व शारीरिक मर्यादेत केलेले' हे कार्य ग्रथकाराला आणि मराठी भाषेला अभिमानास्पद आहे यात किमपी सशय नाही. या ग्रथाला शासकीय अनुदान आणि शासकीय स्वस्त कागद मिळाला याबद्दल शासनाचं आणि तरीही हा महाग्रंथ वाजवी किंमतीत प्रकाशित करणाऱ्या काँटिनेंटलच्या रा अनंतराव कुलकर्णी याचे अभिनंदन.

—म. श्री दीक्षित

मराठी वृत्तपत्रांचा इतिहास
रा. के. लेले
काँटिनेंटल प्रकाशन
मूल्य : १५० रु.

# समृद्ध प्रेमकविता

बोरकरांच्या निवडक एकशे अकरा प्रेम कवितांचा रा. चि ढेरे यांनी संपादित केलेला हा सग्रह. पुस्तक उघडण्यापूर्वी सुभाष अवचटाचे मुखपृष्ठ आतील कवितेच्या आशयाबद्दल खूपशी जाण देऊन जातं अथाग पाणी आणि तितकंच अथाग गूढ आकाश हे या सृष्टीतले आजीव मूक निरीक्षक. त्याच्या आतल्या चौकटीत चितारलेली काळी निळी माती, दगड, पाणी, मातीतून उगवलेले पाण्याच्या काठावरचे लाल जांभळे खडक आणि त्या खडकावरच पक्षांच विश्रब्ध प्रणयी युग्म. बोरकराची कविताही मातीतूनच उमललेली आहे प्रेमाचा झुळझुळता ओलावा घेऊन आलेली ही कविता शारिरी आहे आणि त्या शरीराच्या रोमारोमातून घेतलेला सनातन सत्याचा मानवी, व्यक्तिनिष्ठ अनुभवातून घेतलेला शोधही यात आहे लाल जाभळ्या निळ्या रगासारखी आतली कविताही आनदाचे प्रेमाचे रंग उधळते आहे आणि चिवचिवणाऱ्या पक्षाप्रमाणे प्रेमाच गोड गीतही गाते आहे

'Our sweetest songs are those that tell us of saddest thought' या शेलेच्या उक्तीला बोरकर अपवाद आहेत कारण त्याची रसाळ कविता आनदोर्मींनी फुलली आहे. त्याचप्रमाणे ''Look before and after we pine for what is not' याही शेलेच्या उक्तीला त्याची कविता छेद देते. कारण गेलेल्या भूतकाळाला कुरवाळत बसून येणाऱ्या भविष्याची स्वप्नं बघत बसणं आणि वर्तमानाबद्दल अश्रू ढाळण त्यांच्या पिंडाला मानवत नाही म्हणूनच ते आनदयात्री आहेत विचारापेक्षाही बोरकरांच्या कवितेला भावनेचा ओलावा जास्त भावतो. त्याची प्रेमाची धुदीही भोगापेक्षा योग्याची आहे. शेवटी जरी अपार्थीव अतीताशी अद्वैत साधल जात, तरी त्याच माध्यम बोरकराच्या लेखी शरीर आहे शारीरिक सवेदना मनाला स्पर्श करतात आणि त्यातूनच अनासक्त पण तृप्त मिठी निर्भेळ आनद देते अस्सल ललित आविष्कारात विचाराला भावनेचा लेप असतो. त्यामुळे भावनेच्या माध्यमातूनच त्याला अर्थ येतो

निसर्गाची सर्वं विलसितं दिमाखानं मिरवणाऱ्या गोव्याच्या कुशीत वाढल्यामुळे बोरकराची कविता प्रेम हा एकच आविष्कार प्रसवते. प्रेम मग ते निसर्गावरच असो, देवावरच असो, नाही तर स्त्रीवरच असो. कथाकीर्तनाच्या श्रवणामुळे त्या प्रेमाला पक्वता आली आहे आणि ताव्याच्या छायेखाली वावरल्यामुळे त्यात गेयताही आहे ताव्याच्या छायेखालची बोरकराची पहिली वहिली प्रेम कविता तितकीशी मनाला भिडत नाही

येई सखी हसतमुखी हळूहळू वर जाऊ
अणुअणूनी पार्थिवता गाळित जग पाहू !

अशा काही कवितामध्ये भाबडा स्वप्नाळूपणा जाणवतो किंवा

क्षणभगुर जरि जीवित सखे सुखसुंदर करू
सखे ग शाश्वत करू आपण

यासारख्या कवितेवर ताव्याची छाया असली तरी, नववधू प्रियाची उची आणि आशयघनता ती गाठत नाही· निसर्ग, प्रेम आणि नाद हा स्थायी भाव असलेली आणि त्यातच सातत्य राखत गेलेली बोरकराची कविता समष्टीला फारसा स्पर्श करत नाही.. सामाजिक विषमतेची, सामाजिक प्रश्नाची जाण या धुद आनदाच्या जवळपासही फिरकत नाही. विपुल काव्यलेखन केल्यामुळे कवितेत तोच तोचपणा जाणवणेही अपरिहार्य आहे. विशेषत· प्रारंभीच्या काळातल्या कवितामध्ये. 'डोळे तुझे बदामी' आणि 'जपानी रमलाची रात्र' मध्ये मात्र खरे बोरकर सापडतात या सग्रहाच्या सपादकानी म्हटल्याप्रमाणे प्रेमाचा शारीर आविष्कार बोरकरानी कधीच गौण लेखला नाही उलट त्यातल्या सौदर्यासक्त रसिकतेसह धुदीत तो

मिरवला. त्यांतीच त्याला ऐंद्रीय साम्य-विहार म्हटलय. शारीर प्रणयाची इतक्या सौंदर्यासक्तपणे केलेली खुलावट, धुंदी त्यातले विभ्रम, त्यातला आनद, चटके शातवन, त्यातली तृप्ती याचं मनोज्ञ दर्शन त्याच्या अस्सल प्रेमकवितामधून घडत. अतृप्तीचं रडगाणं त्यानी कधीच गायलं नाहीय म्हणूनच मी वर म्हटल्याप्रमाणे शेले, कीटस् या प्रेमकवीसारखी भळभळणारी वेदना त्याच्या कवितेत नाही. आहे ती टवटवी, आनद आणि जाई जुई मोगऱ्याचा गध कथा कीर्तनाच्या वारशाने त्याना मरण ही पुनर्जन्माची नादी वाटते आणि वेदना रडत नाही तर सुखाला सोन्याचे रूप देते. 'सोसरे माझ्या जिवा तू, सोसण्याचा सूर होतो.' यातच त्याच्या कवितेचं सार आहे. तिला शोक करायला सवड नाहीय. शोक तिला मजूरही नाही.

निसर्ग आणि सखी याचा सवाद, त्याची एकरूपता हेही बोरकराच्या कवितेच एक वैशिष्टच आहे.

नक्षत्रानी बाधुनि कुंतल रात कोवळी निळी
हुरळुनिया मोगरा बहरला कळी कळीला
खळी।

किंवा

डाळिंबीच्या डहाळीशी नको वाऱ्यासवे
झुलू।
सदाफुलीच्या थाटात नको साजवेळी फुलू।

किंवा

वेली ऋतुमती झाल्या ग सरिवर सरी
आल्या ग।

किंवा

जाभा रगा आला दारी जरा बिलगुनी
हास

अशी अनेक उदाहरण देता येतील.

सृष्टी आणि सखीच सौदर्य एकमेकात विरघळून जातं.

'समुद्रसभव सकाळशी तू उगवलीस
वेल्हाळ
नितळ उन्हाळा वितळविणारे आरसपानी
भाळ।'

अशी ही एकरुपता असते.

'उष्टी घोळविता बोरे रामा उमगली
सीता
भोळ्या मिठीत राधेच्या कृष्णा गवसली
गीता
रती असुन मी सती बोले हेलावत फांदी
माझ्या शुकाच्या मुखात नवी ओलावते
नादी।

या परिपक्व अवस्थेत पोचलेली बोरकराची प्रेमकविता म्हणजे आसक्ती आणि विरक्ती, प्रेम आणि परमार्थ याचा मनोज्ञ संगम आहे. मदनाला तृतीय नेत्राने जाळणारा शिव लगेच उमेशी हळुवार कोवळीकेने शृगाररतही होऊ शकतो तशीच बोरकराची प्रेमभावना उन्नत होत होत शिवपदी पोहोचते. अस्सल कवीप्रमाणे तिचा आविष्कार सवेदनामधूनच होतो. अतोम सत्याप्रत नेणारा प्रेम हा एकच मार्ग बोरकरानी उत्कटपणे दाखवून दिलाय

'ये पुढल्या दाराने हरी पुढल्या दाराने'
किंवा
'करि गहन हृदय दोहन गे
घन वदन मनमोहन गे।

अशा तऱ्हेच्या मधुरा भक्तीने ओथबलेल्या कविताही बोरकराच्या विपुल काव्यलेखनांतर्गत नेमकेपणान येतात, बोरकराच्या कवितेत राधा भरून राहिली आहे असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. कारण सपादकानी म्हटल्याप्रमाणे ते राधाभावाने भरलेले आहेत. ताबूस गौर कातीने रसरसलेली राधा कृष्ण दर्शनाने श्यामल झालेलीही बोरकराची प्रतिभा पहाते. उदाहरणार्थ—

निळावले मन, निळावले तन,
निळावले नवनीत घटातून,
निळ्या वेळुतिल शीळ निळी सखी,
निळा उरातील पीळ
घननीळाच्या निळ्या गालिचा निळा
निळा मी तीळ।

पूर्णपणे पारंपारिक वाटचाल करणारी बोरकराची कविता याच भूमित याच मातीत वाढलीय, फुललीय तिच्यावर पश्चिमेची कृत्रिम छाया नाही आहे ज्ञानेश्वरी, भागवत मीरा याच्या पारमार्थिक सत साहित्यातून उगम पावलेला हा रसिक पार्थीव झरा भारतीय प्रेम कवितेचा दुसरा टप्पा म्हणायला हरकत नाही. आळंदीच्या भगव्या वाटेची ओढ त्याच्या अणुरेणूत भरून राहिलीय त्यामुळे पार्थिव अनुभवाना अपार्थिवतेच्या उंचीवर पोचवणारे ज्ञानदेव हा त्याच्या काव्यप्रवासातला चमचमणारा, तारा आहे.

'घर चिये बाये। जोइली बिंदुली
ओजलिये सचली। यमुना गे माय
प्याले तशी धाल्ये। जवळण जाल्ये
साखरेचे आळे। मन खिरले गे माय'

ही ज्ञानेश्वरांची गवळण आहे असे म्हटलं तर कुणालाही ते पटेल.

किंवा

'मज सजवी बाई ये मज सजवी बाई ये'

किंवा

'माझ्या कानी बाई वाजे अलगुज
सागो जाता तुज गुज सांगता नये।'

अशा काही कवितावर ज्ञानेश्वराचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. वरवर सीमामध्ये बदिस्त असलेले किंवा भासणारे प्रेम वैराग्याच्या बळावर त्या कक्षा ओलाडून बाहेर पडते आहे. त्यातील कोवळीक राखूनही ते परिपक्व अशा अतीताकडे धाव घेतय. म्हणूनच सपादकानी म्हटल्याप्रमाणे माती आणि ज्योती याच्या नात्यातील दृढता बोरकरांच्या कवितेत ओसडून वहाते आहे मातीच्या आश्रयाविना ज्योतीचे अवतरण अशक्य आहे, अशी त्याची धारणा आहे

'शरीराच्या तृष्णेविण रस कुठला
प्रीतीला?'

हा निर्णायक प्रश्न आणि 'विरहाने
झुरल्याविण द्रव नाही गाण्याला'

ही मनमोकळी कबुली आहे माती ज्योतीच्या नात्याची ओढ ते स्पष्टपणे व्यक्त करतात.

'ये, हे सखी, मातीचे आश्वासन घेउनि ये
प्रीतीवर विश्वासुन उन्मनमन होउनि ये
ये दिठीत, ये मिठीत, भेट पेट घेत जरा
शत ज्योतीमधुनि करू मातीचा हेत
पुरा!

अशी ही सर्वांगी समृद्ध प्रेम कविता. या प्रेमसागरातून निवडक मोत्ये उचलणे कठीण. पण ते अवघड काम सपादकानी कौशल्याने केलय विशेषत संशोधनाचा पिंड असूनही त्याच्या रसग्रहणातील लालित्य वाखाणण्याजोगे आहे यात शका नाही.

—शकुंतला जोग

बोरकरांची प्रेमकविता
सपादक : रा. चिं. ढेरे
सुरेश एजन्सी
किंमत : चाळीस रुपये

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

## लीला पाटील

# विश्वास

### अशा कितीतरी रतन

**चौ**दा–पंधरा वर्षांची रतन संध्याकाळी उशिरा घरी आली. 'इतका उशीर का? कुठं होतीस?' असे प्रश्न पुनः पुन्हा आईनं विचारले. 'खरं सांग. कुठं होतीस?' असंही आई दोन-तीनदा म्हणाली. शाळेच्या बाईंनी नाचाच्या प्रॅक्टीससाठी थांबवून घेतलं असं रतननं सांगितल्यावर 'उद्या बाईंची चिठ्ठी घेऊन ये, तुला थांबवून घेतलं होतं यावद्दल' असं आई म्हणाली. रतनची मैत्रीण दुसरे दिवशी आल्यावर, 'तू किती वाजता आलीस काल शाळेतून?' असं खोदून खोदून आईनं तिला विचारलं. हे सारं पाहिल्यावर रतन आईला म्हणाली, 'तुझा इतका कसा विश्वास नाही माझ्यावर? बाईंची चिठ्ठी मागताना मला किती लाज वाटते आणि शिवाय तू माझ्या साऱ्या मैत्रिणींना नाचाची प्रॅक्टिस किती वेळ चालते हे विचारलंसच! मला तुझ्याशी खोटंच बोलायचं असेल तर मी तुला बाईंच्या सहीची खोटी चिठ्ठीही नाही का आणून देऊ शकणार?' रतन फारच भडकली होती.

### ही घ्या अविश्वासाची यादी

घरातले पालक अनेक बाबतीत मुलामुलींवर विश्वास ठेवायला तयार नसतात. शाळेतले शिक्षकही विद्यार्थ्यांवर विश्वास टाकायला तयार नसतात. शाळेमध्ये विद्यार्थ्यांवर जो अविश्वास दाखविला जातो त्याची काही उदाहरणं पाहू.

१) शाळेत उशिरा येणं, शाळेतून लवकर घरी जाणं अथवा लांब मुदतीच्या सुटीनंतर दोन-चार दिवसांनी शाळेत रूजू होणं–अशा प्रकारच्या घटनांसाठी पालकांच्या सहीचं पत्र आवश्यक असतं.

२) आजारपणामुळं। पाहुणे आल्यामुळं। घरून सहलीसाठी गेल्यामुळं–गृहपाठ पूर्ण करता न आल्यास पालकांची चिठ्ठी लागते.

३) शिक्षकांच्या गैरहजेरीत वर्गात काही घटना घडल्यास वर्गचिटणिसालाही साक्षीदार सादर करावे लागतात.

४) काही महत्त्वाचं काम असल्याशिवाय मुलं वर्गाबाहेर असणार नाहीत असा विश्वास नसल्यानं कोणत्याही कारणासाठी वर्गाबाहेर जायचं झाल्यास संबंधित शिक्षकांची परवानगी घ्यावी लागते.

५) वर्गातल्या वर्गात एका बाकावरील विद्यार्थ्याला दुसऱ्या बाकावरील विद्यार्थ्याकडं जाण्यासाठी शिक्षकाची परवानगी विचारावी लागते.

६) कोणतंही प्रात्यक्षिक काम शिक्षकाच्या देखरेखीशिवाय मुलं करू शकतील याचा भरवसा वाटत नाही.

७) चाचणी। सत्र अथवा वार्षिक परीक्षा चालू असता देखरेख नसेल तर विद्यार्थी कॉपी करणारच असं वाटतं. त्यामुळं परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांवर गस्त घालण्यासाठी शिक्षक लागतातच.


८) विद्यार्थ्यांचं सर्व लेखी काम, अगदी पुस्तकात पाहून लिहायचं कामही, तपासण्यासाठी वर्गातील हुषार विद्यार्थ्यांचं पथक चालू शकेल असं वाटत नाही. वरच्या वर्गातील विद्यार्थी खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांचं काम तपासू शकतील असा विश्वास वाटत नाही

९) विद्यार्थ्यांना लेखी काम तपासण्यास दिल्यास ते योग्य मूल्यांकन (assessment) करतील असा आपला अभिप्राय नाही.

१०) अपेक्षेपेक्षा अधिक चांगला गृहपाठ आणल्यास तो विद्यार्थ्यानंच केला आहे का अशी विचारणा होते.

११) शिक्षक वर्गात हजर असल्याशिवाय विद्यार्थी कामात मग्न राहू शकतील याविषयी आपण साशंक असतो.

१२) विद्यार्थी स्वप्रयत्नानं शिकू शकतील



असं आपणास वाटत नाही.

१३) शिकलेल्या भागावर विद्यार्थीच प्रश्नपत्रिका तयार करू शकतात यावर आपला विश्वास नाही.

१४) कार्यक्रमाचं नियोजन व कार्यवाही विद्यार्थी स्वत.च्याच प्रज्ञेनं व प्रतिभेनं पार पाडू शकतील असं आपल्याला वाटत नाही.

१५) चूक शोधून काढून त्या संदर्भात आवश्यक तो न्यायनिवाडा विद्यार्थी करू शकतील असं आपण मानीत नाही.

१६) विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, कल्पनाशक्ती, स्मरणशक्ती अशा क्षमता तसेच त्यांचे चातुर्य, प्रामाणिकपणा, शहाणपण अशा गुणाबाबत आपण साशक असतो.

१७) मूलत. विद्यार्थी सत्प्रवृत्त असतात यावर आपला विश्वास नसतो.

१८) विद्यार्थी विचार करू शकतात, विचारपूर्वक मते बनवू शकतात, निर्णय घेऊ शकतात, न्याय करू शकतात अस आपल्याला वाटत नाही.

१९) शिक्षकाची आज्ञा पालन करणारा विद्यार्थीच विश्वासार्ह असतो असं आपण मानतो.

## सत्ता श्रेष्ठ

ही यादी आणखीही वाढविता येईल; पण यादीची लांबी वाढविणं हा मुद्दाच नाही. कुटुंब व शाळा चालविल्या जातात प्रौढांकडून. प्रौढाचा मुलावर, कुमारांवर विश्वास नसतो किंबहुना अस म्हणण अधिक बरोबर होईल का की आपला एकूण व्यवहारच अविश्वासावर आधारित असतो? सत्तेनं जो श्रेष्ठ त्यानं हाताखालील व्यक्तीवर अविश्वास करायचा ही आपली रीतच आहे का?

किती मुख्याध्यापकाचा शिक्षकाच्या कर्तृत्वावर, शहाणपणावर, निर्णयक्षमतेवर, कर्तव्यपालनावर विश्वास असतो? आपली पाठ फिरली की सारे चकाट्या पिटतील, काम टाळतील असेच त्याना वाटतं! सासूचा सुनेवर, नवऱ्याचा बायकोवर, पालकाचा मुलांवर आणि शिक्षकाचा विद्यार्थ्यांवर—म्हणजेच त्याची कर्तृत्वशक्ती, शहाणपण, चातुर्य, समज – यावर विश्वास नसतो एक पालक म्हणे आपल्या मुलाच्या बॅडमिंटन मॅचेसच्यावेळी त्याच्याबरोबर जात आणि खेळाच्या कोर्टाच्या शक्य तितक्या जवळ उभं राहून ओरडून मुलाला 'पुढं टाक' 'माग टाक' 'शॉट मार' असं सागत! अस हे सांगणं आणि वागणं हे मुलाच्या हितासाठीच आहे असाही त्या पालकाचा दावा होता! अविश्वासावर आधारलेली ही संवर्धनपद्धती सबधित व्यक्तीला वाढूच देत नाही हे आपण समजून घ्यायला हवं. व्यक्तीच्या मूळ क्षमता आणि गुण खुरटवून टाकण्यातच अशा वागणुकीच पर्यवसान होतं हे लक्षात घेऊन आपण वागायला हवं. आपल्या समाजात सत्तेला श्रेष्ठत्व असल्यान 'ज्याच्या हाती ससा तो पारधी' ठरतो. प्रौढापेक्षा वयानं लहान असणाऱ्या मुलाना त्यामुळंच आपण 'त्याना काय समजतय?' अस मानतो. आपल्या ह्या कल्पनेला प्रत्यक्षात अनेकदा तडे जातात. पण तरीही आपण मुलावर विश्वास टाकायला तयार होत नाही ओठावर बोट ठेवूनच आपण शाळेतील पहिला दिवस सुरू करतो. घराघरातही 'मोठ्याच ऐकायचं असतं' हा अनिवार्य नियम असतो. 'प्रेम लाभो प्रेमळाना असं म्हणतात त्याचप्रमाण जे विश्वास ठेवतात त्याच्या विश्वासाचा आदर राखण्याचा प्रयत्न होतो. लोकशाही जीवनपद्धतीचा 'विश्वास' हाच मूलाधार आहे. आपल्या घराच आणि शाळाच लोकशाहीकरण झाल पाहिजे अशी जपमाळ ओढीत बसण्यापेक्षा आपण विश्वासावर आधारित असे परस्पर–संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास त्यातून लोकशाहीची बाकीची तत्व आपोआप रुजू लागतील. एरिक फ्रॉम नावाचा एक लेखक आहे. त्यानं एके ठिकाणी लिहिलं आहे की, 'All change in the quality of a person's life must grow out of a change in his vision of reality.' मुलाच्या / विद्यार्थ्यांच्या वास्तव स्वरूपाबद्दलची आपली दृष्टी कोणती? ते अज्ञानी आहेत आणि आपण त्याचे उद्धारकर्ते आहोत? मुलं जात्याच वाममार्गाकडं जातात. आपण त्याना सदाचाराकडं न्यायच असतं, काय चागलं, काय वाईट हे मुलाना समजत नाही, त्यांना ते शिकवणं हे आपलं कर्तव्य आहे इत्यादी इत्यादी. मुलाच्या—विद्यार्थ्यांच्या वास्तव स्वरूपाबद्दलच्या आपल्या ह्या दृष्टीत जेव्हा बदल होईल तेव्हा मुलं विश्वासार्ह आहेत असं आपणास वाटेल विश्वासास उतरण्याची संधी त्याना दिल्याशिवाय त्याची विश्वसनीयता सिद्ध होऊ शकणार नाही हे आपल्या लक्षात येईल. आपला विश्वास काही वेळा गैरविश्वास ठरेलही! पण जीवन जगत असता दुसऱ्या क्षणी धरणीकंप होऊ शकेल अशा साशंकतेत आपण ज्याप्रमाण जगत नाही त्याप्रमाण त्या गैरविश्वासामुळं एकूण मुलाच्या विश्वासार्हतेवरचा विश्वास ढळण्याच कारण नाही, एकमेकाला विश्वास देऊन–घेऊन आपण अधिक चागले पालक, चागले शिक्षक, चागले साथीदार, चागले नातेवाईक बनू शकू विश्वास बसतो का यावर? □


**परसूच्या पशुकथा**

**वसंत सबनीस । किंमत १२ रुपये**

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिंसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस वर्षांनी भेटला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकांबरोबरच्या शिकारी, मलायात हिंस्त्र श्वापदांचा व्यापार व शेवटीसर्कसबरोबर केलेली भटकती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सांगितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्यांच्या अनेक स्वभाववैशिष्ट्यांच्या या कथा...

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.**

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

## पालक मंडळ

**का**ही कामानिमित्तानं, खेळाच्या निमित्तानं, भिशीच्या निमित्तानं, वाचनाच्या निमित्तानं माणसं एकत्र येतात. गप्पा मारतात; पण केवळ आपल्या मुलांबद्दल बोलण्याच्या निमित्तानं आम्ही काही पालक स्त्रिया एकत्र भेटतो तेव्हा एकमेकींच्या अनुभवातून खूप शिकायला मिळतं. डोळसपणे चार पावलांवरून स्वत:च्या मुलांकडे, स्वत:कडे पाहता येतं. त्या शिकण्यातले काही विशेष प्रसंग असे—

एकदा एक पालक, पालक शिक्षणाच्या शिबिरात सांगत होत्या. मुलगी इयत्ता तिसरीत होती. चाचणी परीक्षा झालेली. आज पेपर्स मिळायचे होते. बऱ्याच मुलींना मिळालेले पेपर्स त्यांच्या आया पहात होत्या. शाळेच्या दारात चर्चा रंगल्या होत्या. तुलना होत होत्या. माझी मुलगी म्हणाली 'माझा पेपर नाही मिळालेला' मी विचारलं, 'असं कसं झालं?' ती म्हणाली, 'माझा नंबर आला तेवढ्यात घंटा झाली. मग बाई म्हणाल्या उद्या देईन.' आम्ही घरी आलो. घरी आल्यावर मुलीनं शांतपणे दप्तरातून पेपर काढून माझ्या हातात दिला. मी म्हटलं, 'हे काय?' तर म्हणाली, 'तुम्ही सगळ्या आया अगदी शाळेच्या दारातच लगेच पेपरबद्दल ज्या चर्चा करता ना, ते मला आजिबात आवडत नाही. म्हणून मी तुला शाळेत पेपर दिला नाही.' त्या तिसरीतल्या मुलीनी आम्हा सर्वांनाच एक छान धडा शिकवला होता!

पालकांच्या चर्चेत असं काही विशेष मुलांकडून ऐकायला मिळतं तसं पालकांनी केलेल्या विविध प्रयोगांबद्दलही ऐकायला मिळतं. घरात सासूबाई फार अधिकार गाजवणाऱ्या! मुलांना वाढवणंही त्या आपल्या हाती घेऊ लागल्या तेव्हा मी मनाचा धीर एकवटून म्हटलं, 'तुम्ही तुमची मुलं मोठी केलीत ना? आता ही माझी मुलं आहेत. ही मी मोठी करणार. यांना कसं वाढवायचं ते तुम्ही ठरवू नका' तेव्हापासून सासूबाईंचे हट्टाग्रह थोडे कमी झाले. 'मुलांच्या भल्यासाठी थोडा वाईटपणा स्वत:कडे घेऊन का होईना पण सुनेनं हे स्पष्ट बोलणं महत्त्वाचं वाटतं नाही का? नाही तर घराघरात या प्रश्नावरून धुसफूस चालू असते. मोठी माणसं आपल्या मतभेदांमधून मुलांना बिघडवत असतात आणि मुलंही दोन्हीकडचे फायदे उपटण्याइतकी बेरकी असतात.

मुलांचं खाणंपिणं, म्हणजे न खाणंपिणं, भाज्या न खाणं नेहमीचे प्रश्न. एक आई सांगत होती मी दर आठवड्याला मुलांना मंडईत घेऊन जाते. त्यांना विचारूनच भाज्या घेते. मग त्यांनी खरेदी केलेली भाजी घरात शिजेल तेव्हा खाण्याचं आपोआप त्यांच्यावर बंधन येतं. मुलं स्वत:च वेळापत्रक ठरवतात भाज्यांचं.

खाण्यापिण्याबद्दलचा आणखी एक प्रयोग मुलांना मार्क देण्याचा. पानात सात पदार्थ आहेत. सातही संपवले तर मार्क असं जाहीर करून बघू कोण सत्तर मार्क मिळवतं म्हटलं की स्पर्धेनं पटापट पदार्थ संपतात हा अनुभव एका आईनं सांगितला.

ऐकलेल्या गोष्टींचे कसे मजेशीर परिणाम मुलांवर होत असतात त्याबद्दल एक बाई सांगत होत्या. मुलगी सहा वर्षांची आणि मुलगा तीन वर्षांचा. दोघं घराजवळ खेळत होते. तिथे बांधकामासाठी मोठे खड्डे खणले होते. मुलगा त्या खड्ड्यात पडला. नंतर मुलगी घरी येऊन सांगत होती 'अग आई, मी किती खडे टाकले तरी 'आमोद वर येत नाहीय' कावळ्याची रांजणातलं पाणी वर काढल्याचा हा प्रत्यक्ष प्रयोग करून पाहणं चालू होतं.

जेमतेम वर्षाचं अंतर असलेले एका बाईंचे दोन मुलगे इंग्रजी माध्यमात शिकत होते. काहीतरी चुकत होतं आणि त्यांचं अभ्यासाशी जुळत नव्हतं. बराच विचार करून, धीर करून बाईंनी मुलांचं माध्यम बदललं आणि प्रश्न सुटला. दोघंही मन लावून अभ्यास करू लागले आणि वर आईला म्हणू लागले, 'आई आता नाही ना आमचं प्रगतीपुस्तक पाहून तुझ्या डोळ्यात पाणी येत?'

सहावीतल्या मुलाच्या अभ्यासात अतिशय मन घालणारी एक आई कायम वैतागलेली असायची. मुलाला आलं नाही की ती संतापायची. मग मुलगा वैतागायचा. भांडण व्हायचं. सगळ्या घरादाराला त्रास व्हायचा. मैत्रिणीच्या सल्ल्यानं तिनं मुलाला शिकवणी लावली. आपण अभ्यास घ्यायचा नाही असं ठरवलं आणि नवल झालं. मुलगा अधिक मन लावून अभ्यास करू लागला आणि घरातही शांतता प्रस्थापित झाली.

नेहमीच्या गप्पांमध्ये मुलांच्या गमतीजमती सांगणं चालतंच. एक आई सांगत होती, दोन वर्षांच्या मुलीच्या हातात चेंडू दिला की ती त्याला 'टाक' म्हणते. कारण नेहमी चेंडू तिला देऊन मी टाक म्हणत होते. तिला वाटलं या वस्तूचं नावच 'टाक' आहे.

तसंच दुसरी एक आई सांगत होती. लहान मुलानं फ्लॉवरपॉटला हात लावला की आम्ही 'वा' म्हणयचो, तर तो आता फ्लॉवरपॉटलाच 'वा' म्हणतो. 'वा' दे म्हणतो.

तसंच एक मुलगी आईच्या मागे लागली 'शेपूची भाजी आण' म्हणून. आईनी कौतुकानी आणली. भाजी केली. मग मात्र मुलगी खाईना. आईनी विचारलं तर मुलगी म्हणाली, 'अग, शेपूची भाजी मला खायला नाही काही आवडत. खेळायला आवडते.'

मुलांच्या शाळांबद्दल तर अनेक गप्पा होतात. पालकांना काही समजत नाही असं शिक्षक समजतात याबद्दल राग असतो. शाळेच्या कामात पालकांनी फारशी ढवळाढवळ करू नये अशी शाळेची इच्छा असते. त्यामुळे पालकांना शाळेत यायला, शिक्षकांना भेटायला प्रोत्साहन दिलं जात नाही. शिक्षकांनी मुलांना मारणं याबद्दल तीव्रपणे काहीतरी करायला हवं आहे. शिस्तीच्या नावाखाली उन्हातान्हाचं मुलांना लांब घरी चालत पाठवतात याबद्दल शिक्षकांना विचारलं पाहिजे. अशा अनेक तक्रारी असतात.

कधी मुलांच्या वागण्याबद्दलचे गंभीर प्रश्न, कधी पालकांच्या स्वत:च्या काळज्या, कधी काही माहितीची गरज, तर कधी स्वत:चं एखादं मुलांबद्दलचं यश सांगण्यासाठी जागा हवी असते. जवळ जवळ राहणाऱ्या समवयस्क पालकांनी महिन्यातून एकदा वगैरे केवळ मुलांसाठी एकत्र यायचं ठरवलं, अशा गप्पा मारल्या तर एकमेकांपासून खूप शिकायला मिळतं. मुलांबद्दल निश्चितपणे विचार होतो आणि अनेक प्रश्नांना वाटा सापडतात. दर पंधरा—वीस घरांचं मिळून असं एकेक पालक-मंडळ बनायची खूप गरज आहे. मुलं आपण महत्त्वाची मानतो; पण त्यांच्या वाढीच्या वयात आपण जे शिकायला हवं त्याकडे दुर्लक्ष करतो. ते शिकण्यासाठी ही पालक-मंडळं निर्माण करायला हवीत. □

## एक अनाथ मुलगी ते जगप्रसिद्ध चित्रपटतारका

# सोफिया लॉरेन ( शिकोलोन ) ची आत्मकथा

रघुपती भट्ट

इटलीमध्ये रोमिल्डा नावाची एक बाई होती. ग्रेटा गार्बोसारखी दिसणारी आणि सिनेमात काम करण्याची महत्त्वाकाक्षा बाळगणारी; पण तिच्या अपेक्षा पुऱ्या झाल्या नाहीत सिनेमात काम करायला तिच्या घरी परवानगी नव्हती. रॉबर्टो नावाच्या एका रुबाबदार तरुणाच्या प्रेमात ती पडली; पण रॉबर्टोनं तिला फसवलं. तिला लग्नाचं आश्वासन देत तो भुलवत राहिला.

काही काळानतर रॉबर्टोपासून तिला दिवस गेले. तिच्या खानदानाची बदनामी झाली. कुमारी मातांसाठी असलेल्या एका इस्पितळात तिने एका मुलीला जन्म दिला. जवळच्या लोकानी तिला सल्ला दिला— ' बिनलग्नाची ही पोरगी कशाला ठेवतेस ?' पण तिने कोणाचे ऐकले नाही. रॉबर्टोने तिच्याशी लग्न केल नाही तरी मुलीच पितृत्व स्वीकारलं.

दवाखान्यातून बाहेर आल्यावर रॉबर्टोने रोमिल्डाची आणि मुलीची एका बोर्डिगवर सोय केली. त्याचे आईवडोल या दोघीना घरात घ्यायला तयार नव्हते रोमिल्डाची मुलगी अगदी अशक्त होती. तिची स्थिती आज मरते की उद्या मरते अशी होती. त्यात ती एकदम आजारी पडली आणि ऐन वेळी रॉबर्टो गाव सोडून पसार झाला.

रोमिल्डा मोठी धीराची बाई होती. रॉबर्टोने फसवणूक केल्यावर तिने काही दिवस काम मिळवण्याची धडपड केली,आणि त्यात यश येत नाही म्हटल्यावर सरळ गावचा रस्ता धरला. गावातील हॉटेल्समध्ये पियानो वाजवून तिने पैसे मिळवायला सुरुवात केली.

तो दुसऱ्या महायुद्धाचा काळ होता. सर्व-सामान्य इटालियन्स मोठ्या कष्टाने जगत होते. रोमिल्डा आणि तिची मुलगी याच्या घरात मुळचेच दारिद्र्य होते त्यामुळे तिची मुलगी अगदी पाप्याचे पितर बनली होती. आसपासची पोरे तिला ' दातकोरण ' म्हणायची.

रॉबर्टोची आणि तिची पुन्हा भेट झाली. लग्नासाठी त्याला राजी करण्याच्या प्रयत्नात तिला आणखी एक मुलगी झाली. ह्या मुलीचे पितृत्व मात्र रॉबर्टोने नाकारले आणि तो सरळ दुसऱ्या एका बाईबरोबर लग्न करून राहू लागला

आता रोमिल्डापुढे दोन मुलीची जबाबदारी होती; पण रोमिल्डाने कबर कसली. हलकीफुलकी कामे करीत ती मुलीना साभाळत होती. महायुद्ध अगदी बहरात होते. त्याच्या गावावर सतत बाँब पडत असायचे. शेवटी एक दिवस असा आला की, सर्वांनी गाव सोडून जावे असा फतवा निघाला

रोमिल्डा, तिची आई आणि दोन मुले यासह नेपल्सला आली. तेथे एका दूरच्या नातेवाईकाच्या घराच्या गलरीत त्याची सोय झाली रोमिल्डा आणि तिच्या काफिल्याची तेवढीच सोय झाली. बाकी सारा आनदच होता युद्धाच्या त्या धामधुमीत कोठे काम मिळेना. पैसा नाही, त्यामुळे दोन वेळच्या जेवणाचीसुद्धा आबाळ होऊ लागली नातेवाईकानी फक्त राहाण्याची सोय केली होती. बाकी बघण्याचे त्याना काय कारण ?

त्यामुळे काही वेळा रोमिल्डा आणि तिच्या मुलीना अक्षरशः भीक मागण्याची पाळी आली. थोरली लेक अशी पाप्याची पितर होती की तिला बघून लोक भीक घालायचेही.

जर्मन्स गेले, युद्ध सपल आणि रोमिल्डा आपल्या परिवारासह आपल्या गावी परत आली बाँबच्या वर्षावाला तोड देत पडझड झालेले त्याचं घर अजन उभे होते.

रोमिल्डाने आपल्या घरात एक बार काढला. जवळच असणाऱ्या सैनिकांच्या तळावरील तरुण अमेरिकन्स त्या बारमध्ये येऊ लागले रोमिल्डा पियानो वाजवायची आणि तिची धाकटी मुलगी गाण म्हणायची. त्या अमेरिकन्सना रोमिल्डाचा बार आवडू लागला. मायदेशापासून अनेक मैल दूर आलेल्या त्या अमेरिकन्सना रोमिल्डाचा बार म्हणजे एक आपुलकीचं ठिकाण वाटू लागलं होतं.

रोमिल्डाची थोरली लेक मात्र बारच्या मागच्या खोलीत भाडी घासत बसलेली असायची. आपण कुरूप आहोत म्हणून तिला लोकाच्या पुढयात जायला लाज वाटायची. दातकोरण म्हणून शेजारपाजारची मुल टिंगल करायची; पण ती मुलगी सगळ सोसत शातपणे काम करीत बसायची.

पण निसर्गाची किमया औरच आहे. ती चौदा वर्षाची झाली आणि तिच सगळं रगरूप बदलल. तिचं शरीर प्रमाणबद्ध दिसू लागल. स्वत.चं रूप आरशात पाहताना थोरली हरखून जाऊ लागली. आसपासच्या लोकानासुद्धा तिच्यातील बदल जाणवू लागला. त्या छोटया गावात रोमिल्डाची तरुण थोरली मुलगी म्हणजे कौतुकाचा विषय बनली. रोमिल्डाच्या आनदाला पारावार राहिला नाही. तिच कुरूप बदकाचं पिल्लू आता एक देखणी राजहंस बनली होती.

तेवढयात रोमिल्डाने सौंदर्यस्पर्धेची एक जाहिरात वाचली. १५ वर्षाहून अधिक वयाची अट त्यात होती; पण रोमिल्डाने थोरलीचे नाव बळेच घातले त्यातल्या त्यात चागला पोशाख करून तिने तिला नेपल्सला नेले.

या स्पर्धेत थोरलीचा नबर आला. मग रोमिल्डा खूपच आनदित झाली. आपण सिनेमात जाऊ शकलो नाही निदान मुलीला तर जाता येईल अशी आशा तिला वाटू लागली होती. होते नव्हते तेवढे पैसे खर्च

करून तिने मुलीला अभिनयशाळेत घातले. या अभिनयशाळेत फक्त तोंड वेगाडायला शिकवत; पण तेसुद्धा उपयुक्त होते.

तेवढ्यात 'क्वो वादिस' या चित्रपटासाठी एक्स्ट्रॉज् पाहिजे आहेत म्हणून समजलं

रोमिल्डा रोमला गेली. दोघीनाही तिच्या प्रयत्नामुळे 'क्वो वादिस' मध्ये काम मिळाले. त्या चित्रपटात काम करीत असताना रोमिल्डाची दुसरी मुलगी आजारी पडली म्हणून तिला आणण्यासाठी ती गावी परत गेली. तेव्हा थोरलीने मॉडेलिंग वगैरे करून काम मिळवले आणि काही चित्रपटात सुद्धा तिला एक्स्ट्रॉजमध्ये घेण्यात आले. दुसऱ्या एका सौंदर्यस्पर्धेत तिला बक्षीस मिळाले आणि यावेळीच प्रसिद्ध इटालियन निर्माता कार्लो पॉंटी याची आणि तिची गाठ पडली.

## कलाकाराची ओळख

कार्लो पॉंटीने तिला पाहताच तिच्यातील कलाकार ओळखला आणि ऑफिसमध्ये बोलवून तिची स्क्रीन टेस्ट घेतली. कॅमेरामननं तिच्यात काही चुका काढल्या. तिच नाक जरा जास्त लाब आहे वगैरे; पण थोरलीने काहीही बदल करून घ्यायला नकार दिला.

तिची आई परत आली आणि पुन्हा निर्मात्याच्या दारात त्याच्या चकरा सुरू झाल्या. रोमिल्डाने निर्धार केला होता की आपल्या मुलीला नटी बनवायचेच. रोमिल्डाने वाचले की, 'आफ्रिका अडर द सीज' नावाचे एक लो बजेट पिक्चर काढण्याचे चालले आहे. तिने पुन्हा खटपट करून आपल्या मुलीला त्यात रोल मिळवून दिला. दिग्दर्शकाने थोरलीला विचारले, 'तुला पोहता येतं काय ?' कारण हा चित्रपट पाण्यात होता. रोमिल्डाने पढवल्याप्रमाणे होकारार्थी उत्तर दिल. वास्तविक तिला पोहता येत नव्हतं.

मग तिचं नाव विचारण्यात आलं. तिचं इटालियन आडनाव त्या निर्मात्याला आवडल नाही. ते बदलायचं ठरल त्याच्या एका चित्रपटात मार्टा टॉरेन नावाच्या एका नटीन काम केलं होतं, तिचं चित्र समोर होतं. त्याच्यावरून सुरवात करीत तो निर्माता लॉरेनवर येऊन थाबला.

तिचं पहिल नाव ठीक होतं. फक्त त्याचं स्पेलिंग बदलण्यात आलं आणि त्या दिवशी रोमिल्डाच्या थोरल्या पोरीचं नामकरण झालं.

सोफिया लॉरेन

अभिनय, सौंदर्य याबद्दल पुढे जगप्रसिद्धी मिळवलेल्या सोफिया लॉरेनची सुरवात अशी झाली. त्या सुरवातीच्या दिवसात ही पुढे एक जागतिक किर्तीची तारका बनेल असं कोणी सागितलं असतं तर लोकानी त्याला मुर्खात काढलं असत. म्हणून सोफिया आपल्या आत्मचरित्राच्या अर्पणपत्रिकेत म्हणते—

'एके काळी एक लाबसडक पायाची, मोठ्या डोळ्याची, त्रस्त तोंडाची एक छोटी मुलगी होती. तिला स्वत.बद्दल इतकी घृणा होती की तिला वाटायचं आपण पऱ्याना आवडत नसू. पण ती जमिनीवर फुललेल्या प्रत्येक पानावर आणि फुलावर प्रेम करायची आणि तिचा विश्वास होता, ज्यांना खजिना मिळवायचा आहे त्यानी कधीच त्याचा उल्लेख करू नये. ती वेड्यावाकड्या मुळयाच्या गाठीत जन्माला आली होती, पण त्याच्या फुलात तिला जग मिळाल, चढायला पर्वत मिळाले, पळायला रस्ते मिळाले.

तिन सगळ्या विश्वाला आलिंगन दिलं. सगळं पाहायचं होत, अनुभवायचं होत पण जीवनाने तिला जी भूमिका दिली होती त्याची तिला भीती वाटली. दूरवरच्या मझीलकडे मोठ्या कष्टाने सरळ चालायची भीती वाटली. प्रेम आणि दुबळेपणाची भीती वाटली. पण ती चालत राहिली आणि तिनं भीतीवर मात केली.

हे पुस्तक तिला आणि सगळ्या मोठ्या डोळ्याच्या, वेड्यावाकड्या मुळ्यात जन्माला आलेल्या सर्व छोट्या मुलीना अर्पण केले आहे.'

( लिव्हिंग अँड लव्हिंग )

अर्थात सोफियाची आई रोमिल्डा हिचाही सोफियाच्या यशात सिंहाचा वाटा होता हे ती मान्य करते. दारिद्र्य, युद्धातील टंचाई, रोगराई,त्यात नवऱ्याने जबाबदारी टाळलेली अस असताना खबीरपणे तिने मुली वाढवल्या, निर्मात्याचे उबरे झिजवले आणि सोफियाचा यशाचा मार्ग खुला केला

'आफ्रिका अडर द सीज'चे शूटिंग रोमपासून दूर होते. समुद्रात जहाज उभं करून प्रोडयुसरने पहिला शॉट घेण्यासाठी सोफियाला समुद्रात उडी घ्यायला सांगितली. आता मात्र सोफिया घाबरली. क्षमायाचना करीत तिन आपल्याला पोहायला येत नसल्याचं सागितल. निर्माता अवाक् झाला. शूटिंगची सर्व तयारी वाया घालवणं त्याला शक्य नव्हतं. तो सोफियाला म्हणाला, 'आता फक्त उडीचा शॉट घेऊ या. पोहण तू शिकून घे; पण आता उडी मार, तुला वाचवण्यासाठी पाण्यात एक सराईत मनुष्य आहेच.'

सोफियाने समुद्रात उडी घेतली. शॉट ओ. के. झाला. निर्मात्याने सागितल्याप्रमाणे पाण्यात एक सराईत होताच. त्याने सोफियाला वर आणले. त्यानेच नंतर सोफियाला पोहणं शिकवल.

हा चित्रपट पूर्ण झाला; पण तेवढा यशस्वी ठरला नाही. या चित्रपटाने सोफियाला जे पैसे मिळाले ते तिने तिच्या बापाला देऊन तिच्या बहिणीला त्याचे नाव लावून घेतले. तिचा तो रॉबर्टो नावाचा बाप इतका नीच प्रवृत्तीचा होता की, तिला पैसे द्यायला सुद्धा तो टाळाटाळ करीत असे. तिच्या बहिणीला आपले नाव द्यायचे त्याने तेवढ्यासाठी टाळले होते. सोफियाची आई अनेकवेळा त्याला सांगून दमली होती. सोफिया चित्रपटात कामे करतेय म्हटल्यावर त्याने तिच्या आईला सांगितले की, चित्रपटाचे सगळे पैसे मिळाले तर तो सोफियाच्या बहिणीला कायदेशीरपणे आपली मुलगी बनवेल. अर्थात रोमिल्डा या नीचपणाने संतापली होती; पण सोफियाने बहिणीचा विचार केला. बापाचे नाव नसल्यामुळे तिला समाजात वावरता येत नव्हते 'आफ्रिका अंडर द सीज' आणि 'रोडा' च्या पैशाने तिने आपली धाकटी बहीण मारिया हिला नाव आणि समाजात मान मिळवून दिला.

कार्लो पॉंटीला पहिल्या दिवसापासून सोफियाबद्दल आत्मीयता वाटत होती. त्याने आफ्रिका अडर द सीज नंतर सोफियाला एक वर्षासाठी करारबद्ध केले. रोमिल्डाचा त्याला विरोध होता आणि तो बरोबर होता. कारण त्यामुळे तिला दुसरीकडे प्रयत्न करता आले नाहीत. फक्त व्हिक्टोरियो डिसिकाने तिला आपल्या आगामी चित्रपटात काम देण्याचे आश्वासन दिले.

'ऐडा' नावाचा एक ऑपेरा चित्रपट सोफियाने साकार केला होता. हे काम जीना लोलो ब्रिजिडाला मिळाले होते; पण दुसऱ्याच्या आवाजाला आपण फक्त आकार देणे तिला बरे वाटले नाही म्हणून तिने नकार दिला त्यामुळे ते सोफियाला मिळाले. सोफियाने प्रथम त्या ऑपेऱ्याचा पूर्ण अभ्यास केला आणि तिला ऑपेऱ्याचे शब्द तोंडपाठ झाल्यावर तिने ती भूमिका साकार केली. ख्रिस्तपूर्व काळातील ही कथा होती. त्या पोशाखात सोफिया गारठून जायची; पण तिने मेहनत घेऊन ती भूमिका साकारली. समीक्षकानी आता तिला नावाजले.

'ऐडा' नंतर कार्लो पाँटीच्या करारात तिने काही नगण्य चित्रपट केले.

आणि एक दिवस अचानक डिसिकाने तिला 'गोल्ड ऑफ नेपल्स' मध्ये भूमिका देऊ केली. एका आक्रमक स्त्रीची ही भूमिका होती. ती कोणातरी मोठ्या नटीला द्यावी असं इतर निर्मात्यांचं म्हणणं होत; पण डिसिकान ही भूमिका सोफियालाच मिळणार असं जाहीर केलं.

'गोल्ड ऑफ नेपल्स' ने सोफियाला बरच काही दिल. डिसिकानं तिच्यातील कलाकार ओळखला आणि तिला खूप मार्गदर्शन केलं. तिला तो म्हणायचा 'तुला कोणत्या अभिनय शाळेत जायला नको. तुला वाटतं ते सगळ्या शरीरातून व्यक्त कर.' डिसिकाच्या तज्ज्ञ देखरेखीखाली सोफियान गोल्ड ऑफ नेपल्स ची भूमिका गाजवली.

त्या चित्रपटामुळे सोफिया प्रकाशझोतात आली. वर्तमानपत्रातून तिच्या मुलाखती येऊ लागल्या. तिला तेवढ इंग्रजी अजून येत नव्हतं. त्यामुळे काही वेळा ती काहीतरी बोलायची. त्यातूनच जीना लोलो ब्रिजिडात आणि तिच्यात गैरसमज निर्माण झाले.

गोल्ड ऑफ द नेपल्स नंतर कार्लो पाँटीनं खास तिच्यासाठी 'वूमन ऑफ द रिव्हर' नावाचा चित्रपट घेतला. या चित्रपटावेळी सोफिया आजारी पडली; पण तिला सगळ्यानी समजावून घेतल. हा चित्रपट संपत येताना कार्लो पाँटी आणि सोफिया एकमेकाच्या आत्यंतिक निकट आले.

'टू ब्रॅड, शीज् चेंड' नावाचा एक चित्रपट प्रसिद्ध दिग्दर्शक ब्लासेटी याच्याकडे सोफिया करू लागली. यात डिसिका आणि

## सोफिया लॉरेनचा जीवनपट

जन्म : १९३४, रोममधील अविवाहित मातासाठी असलेल्या धर्मादाय इस्पितळात.

मूळ नाव : सोफिया शिकोलोन Sofia Scicolone.

पहिला चित्रपट : 'क्वो वादिस' (१९५०) Quo Vadis–एक्स्ट्रा म्हणून

पहिली मोठी भूमिका : आफ्रिका अंडर द सीज (१९५२)

Africa Under the Seas

गाजलेले चित्रपट : द ब्लॅक ऑर्चिड (१९५९) The Black Orchid (१९५२)

टु वुमेन (१९६१) Two Women

यस्टरडे, टुडे अँड टुमारो Yesterday, Today and Tomorrow (१९६३)

मॅरेज इटालियन स्टाईल Marriage Italian Style (१९६४)

लेडी एल् (Lady L) (१९६५)

सनफ्लॉवर (Sunflower) (१९७०)

सन्मान : Two Women बद्दल ऑस्कर पुरस्कार

ती चोऱ्या करणारी बापलेक होती आणि मार्सेलो मस्त्रीओनी याने टॅक्सी ड्रायव्हरची भूमिका केली. डिसिकाने या तिघाचे असे जमवले की, त्यानंतर डिसिका, सोफिया आणि मॅस्ट्रीओनी याचे एक त्रिकूट बनून गेले

कार्लो पाँटीचे आणि सोफियाचे संबंध आता चर्चिले जाऊ लागले होते. त्यात पाँटी हा शादीसुदा मनुष्य होता. सोफियाच्या आईलाही ते पसत नव्हते.

कार्लो सोफियाला टॉप स्टार बनवण्यासाठी धडपडत होता. हॉलीवूडच्या चित्रपटात सोफियाला भूमिका मिळावी यासाठी त्याचे प्रयत्न चालले होते.

सोफियाने प्रयत्नपूर्वक इंग्रजी शिकून घेतले. तिचे उच्चार सुधारले, वाचन सखोल झाले आणि त्याचवेळी कार्लोच्या प्रयत्नाना यश आले. युनायटेड आर्टिस्टच्या 'द प्राइड अँड द पॅशन' या चित्रपटात त्याने सोफियासाठी रोल मिळवला.

चित्रपट सुरू होण्यापूर्वी एक शानदार पार्टी झाली. यावेळी चित्रपटातील इतर प्रमुख कलाकार कॅरी ग्रँट आणि फ्रॅंक सिनात्रा याची व सोफियाची प्रथम भेट झाली. कॅरी ग्रँट आणि फ्रॅंक सिनात्रा ही जगप्रसिद्ध नावे होती आणि सोफिया कोणीच नव्हती. तिची छाती दडपून गेली होती. आपल्या नशिबावर तिचा विश्वास बसेनासा झाला होता.

त्याचे चित्रीकरण स्पेनमध्ये झाले आणि त्यात खूप दिरगाई झाली. सुरुवातीला कॅरी ग्रँट खूप दुरावा ठेवून वावरायचा, पण सहवासातून प्रेम निर्माण झाले. सोफियाच्या दृष्टीने कॅरी ग्रँट म्हणजे स्वप्नीचा राजकुमार होता.

फ्रॅंक सिनात्रा हा मुळचा इटालियनच. सोफियाला त्याने संगीतातील खुब्या समजावून दिल्या. सोफियावर तो खूश होता. एका पत्रकाराने त्याला सोफियावर मत विचारले, तेव्हा तो म्हणाला,

'सोफिया ? शी इज द् मोस्टेस्ट !'

हा चित्रपट पूर्ण होईपर्यंत सोफिया आणि कॅरी ग्रँट एकमेकासाठी काहीही करायला तयार झाले होते आणि विशेष म्हणजे याच कॅरी ग्रँटने चित्रपट सुरू होण्यापूर्वी सोफिया ही कोणी एक नाव नसलेली नटी आहे म्हणून तिच्याबरोबर काम करायला नकार दिला होता.

सोफिया त्यानतर 'बॉय ऑन अ डॉल्फिन'

यात काम करण्यासाठी ग्रीसला आली ते झाल्यावर सहारा वाळवंटात 'लिजेंड आफ द लॉस्ट' नावाच्या चित्रपटात जॉन वेनबरोबर काम करण्याचा तिला योग आला.

जॉनचे व्यक्तिमत्त्व आक्रमक होते, पण स्वभाव लोभस होता. दिग्दर्शकासह सगळे त्याच्या व्यक्तिमत्त्वापुढे दबून असत. पण त्याने कधीच त्याचा गैरफायदा घेतला नाही. ह्या चित्रपटावेळीसुद्धा सोफिया गभीर आजारी पडली होती पण जगण्याच्या अनिवार इच्छेने तिला त्यातून वाचवले.

सोफियाला कीर्ती मिळत होती. अनेक प्रसिद्ध वृत्तपत्रात तिची छायाचित्रे, मुलाखती प्रसिद्ध होत होत्या, पण अजून खरं यश मिळालं नव्हतं.

कोलबियाने तिला चार चित्रपटासाठी, १९५७ मध्ये करारबद्ध केल. त्या चित्रपटात कामं करण्यासाठी ती हॉलीवूडला आली. एक शानदार पार्टी देऊन हॉलीवूडन तिच स्वागत केलं. तिच्या लहानपणापासून तिला आवडत असणारे अनेक मोठे कलाकार तिला पाहायला मिळाले.

## मायदेशाला मुकली

हॉलीवूडमधील तिचे पहिले काही चित्रपट जमले नाहीत. 'डिझायर अंडर द एल्मस्' 'ब्लॅक ऑर्चिड' 'दॅट काइन्ड ऑफ वुमन' वगैरे चित्रपटातून तिचे सहकलाकारांबरोबर जमले नाही. फक्त 'हेलर इन पिंक टाइटस्' च्या वेळी ख्यातनाम दिग्दर्शक जॉर्ज क्युकोरकडून काही नव्या गोष्टी शिकायची संधी तिला मिळाली. (हा चित्रपट नंतर गाजला.)

कॅरी ग्रँट बरोबरचा 'हाऊसबोट' चागला चालला. कार्लो पाँटीच्यामते सोफियाचं पडद्यावरचं व्यक्तिमत्त्व इतक मोठ आहे की तिच्यापुढे नट टिकत नाहीत. 'टाइम'च्या मते अर्धा ग्लास पाण्याबरोबर हॉलीवूडचे सगळे टॉप स्टार गिळण्याची तिची ताकद आहे. फक्त काही लोकच सोफियाबरोबर टिकू शकतात. त्याच्यामध्ये कॅरी ग्रँट एक आहे. मार्सिलो मॅस्ट्रीओनी, रिचर्ड बर्टन, पीटर ओ टूल, मार्लन ब्रँडो, क्लार्क गेबल आणि ग्रेगरी पेक एवढेच तिच्याबरोबर टिकू शकतात

कॅरी ग्रॅंट आणि कार्लो पाँटी या दोघावरही सोफियाचे प्रेम होते कार्लोला घटस्फोट मिळू शकत नव्हता, पण गेली ६।७ वर्षे ते एकत्र राहात होते. कॅरी आणि कार्लो यापैकी कोणाची निवड करावी असा पेच तिच्यापुढे पडला होता. पण कार्लोने मेक्सिकोमध्ये घटस्फोट मिळवला आणि कायदेशीररीत्या वकिलामार्फत सोफियाबरोबर त्याने लग्न केले. दोघांच्या अनुपस्थितीत वकिलानी मेक्सिकोमध्ये लग्नाच्या कागदपत्रावर सह्या केल्या. अर्थात हे अशा प्रकारचे लग्न सोफियाला फारसे रूचले नाही. कॅरी ग्रँट त्यावेळी सोफियाबरोबर 'हाउसबोट' पुरा करीत होता. त्याला जेव्हा लग्नाची बातमी समजली तेव्हा त्याने सोफियाला शुभेच्छा दिल्या.

'या लग्नानं तू सुखी व्हावस अशी आशा आहे.' एवढच तो म्हणाला.

सोफियाला त्या दिवशी खूप वाईट वाटलं. कॅरी ग्रॅंटने तिला आयुष्यातील काही सुखाचे क्षण दिले होते. त्याच्या सहवासात ती बरच काही शिकली होती. अगदी लग्नाची मागणी घालण्यापर्यंत ती दोघे जवळ आली होती. भावनाविव्हल कॅरी ग्रॅंटला नंतर सोफियाबरोबरचे सीन्स करणे अवघड गेल. पण तो अत्यत संयमी मनुष्य होता. स्वत.चा दुबळेपणा दाखवण त्याला कधीच रूचलं नव्हत.

सोफिया आणि कॅरी ग्रँट सर्वथैव एकरूप होते. पण सोफिया त्याच्या नशिबी नव्हती. अनेक वर्षे वाट पाहणाऱ्या कार्लो पाँटीचीच गाठ तिच्याशी बाधली होती.

अगदी सिनेमातील कथेसारखीच.

पण लग्नाचे सुख सोफियाच्या नशिबी नव्हते. रोमच्या व्हेटिकनच मुखपत्र समजल्या जाणाऱ्या वृत्तपत्राने त्याच्या लग्नावर नाव न घेता ताशेरे झोडले. त्याचे लग्न हा बहुपत्नीत्वाचा किंवा रखेल ठेवण्याचा प्रकार आहे आणि असं करणाऱ्याना धर्मबाह्य करावं असा आदेश त्यानं दिला.

सोफिया घाबरून गेली. हनीमूनचे वगैरे बेत बारगळले. त्याच इटलीकड जाणच रद्द करायची पाळी आली एकदा व्हेटिकनची भूमिका स्पष्ट झाल्यावर बाकीचे पुढे आले. 'इटॅलियन मेन्स कॅथॉलिक ॲक्शन' नावाची एक सस्था होती, तिने सोफियाचे चित्रपट पाहू नयेत असा फतवा काढला. वृत्तपत्रातून सोफियावर टीका येऊ लागली. एका वृत्तपत्राने लिहिले ही दोघ मध्ययुगात जन्मली असती तर यांना जिवंत जाळलं असत.

कार्लो पाँटीनं सोफियाची समजूत घातली त्यानंतर ते इग्लंडला 'द की' या चित्रपटासाठी गेले. त्याचा निर्माता लेखक कार्ले-फोरमन यानं सोफियाला सागितल की करार जरी तिच्याबरोबर झाला असला तरी ती भूमिका इग्रीड बर्गमनसाठी आहे. तिच्यासाठी तो दुसरा चित्रपट घेईल.

पण सोफियान माघार घ्यायला नकार दिला. 'द को'ची भूमिका तिला खूप आवडली होती आणि विल्यम होल्डन आणि ट्रेव्होर हॉवर्ड याच्याबरोबर काम करण्याची संधी दवडायला ती तयार नव्हती.

सर कॅरोल हा त्या चित्रपटाचा दिग्दर्शक होता. सोफियाने त्याच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करून भूमिका साकार केली. डिसिकानतर तिला आवडलेला हा दुसरा दिग्दर्शक.

'द की' जेव्हा पूर्ण झाला तेव्हा फोरमनला आपली चूक कळून आली आणि सोफियाचे आभार मानून त्याने मोकळ्या मनाने ती कबूल केली.

'द की' यशस्वी होत असताना इटालियन कोर्टात कोणा एका बाईने कार्लो पाँटी आणि सोफियावर केस दाखल केली. कार्लोवर बहुपत्निकत्वाचा आणि सोफियावर रखेलगिरीचा आरोप तिने ठेवला होता. प्राथमिक सुनावणीनंतर या दोघावर वॉरंट निघाले. इटलीत पाय ठेवताक्षणीच त्याना अटक करावी अस फर्मान होतं.

सोफिया खूप दुखी झाली, आता ती मायदेशाला मुकली होती. तिचं मन अस कष्टी असताना 'राणी इलिझाबेथ' पुढे जाण्याचा सन्मान तिला मिळाला. 'द की'ची राजघराण्यापुढे प्रयोग झाला असता राणी प्रभावित झाली होती आणि तिने सोफियाला भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती.

राणोच्या भेटीसाठी सोफियाने खास पोशाख करून घेतला होता. एक छोटा मुकुटही तिच्या केसात तिने बसवून घेतला होता. राजवाड्यातील लोक त्यामुळे नाराज झाले; पण तो मुकुट काढणे शक्य नव्हते. राणीनं त्यावर प्रतिक्रिया व्यक्त केली नाही; पण दुसरे दिवशी वृत्तपत्रात मथळे आले.

इग्लडला आता दोन राण्या, राणी इलिझाबेथ आणि राणी सोफिया.

'इट हॅपन्ड इन नेपल्स' या चित्रपटात क्लार्क गेबलचा तिला अनुभव आला. एक प्रेमाचा सीन करताना क्लार्कच्या मनगटी

घड्याळाचा गजर झाला. त्याने तावडतोब सोफियाला सोडले आणि सर्वांचा निरोप घेतला. क्लार्क हा अत्यंत वक्तशीर माणूस होता. ९ पूर्वी तो यायचा नाही आणि ५ वाजता गजर झाला की एक मिनिटही थांबायचा नाही. क्लार्कच्या या वागण्याने सोफिया थक्क झाली होती; पण नतर त्याचा तिला सराव झाला. कामाच्या बाबतीत क्लार्क अत्यंत दक्ष असे. त्याच्या ओळी, डायलॉग्ज त्याला सदैव पाठ असत. हा एक तिला वेगळाच अनुभव होता.

व्हेनिस चित्रपट महोत्सवाचे तिला आमत्रण आले. तिचा ब्लॅक ऑर्किड नावाचा चित्रपट स्पर्धेत होता. प्रथम ती जावे का नको ह्या विचारात होती, कारण इटलीमध्ये ती गुन्हेगार होती पण कार्लोने महोत्सवाच्या सयोजकांकडून तिच्या सुरक्षित येण्या–जाण्याची हमी घेतली. मगच ती महोत्सवाला हजर राहिली आश्चर्य म्हणजे इटालियन्सनी तिचे जोमदार स्वागत केले, तिला महोत्सवामध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक मिळाले तेव्हा तर लोकांनी टाळ्यांचा जो गजर केला ते पाहून तिला वाटू लागले की, विरोधी प्रचार काही असो आपल्याबद्दल लोकमत हे चागलेच असावे.

पण महोत्सव संपवून ती परत गेली आणि पुन्हा पहिल्यासारखे सगळे तिच्यावर राग ओकणे चालूच राहिले.

त्यानतर सोफियाच्या आयुष्यात बदल घडवून आणणारा चित्रपट तिच्यापुढे आला. अल्बर्टो मोराव्हियाची प्रसिद्ध कादबरी 'टू वुमेन' यावर जॉर्ज क्युकोर चित्रपट काढणार होता; पण ॲना मॅग्नानी हिने आईची भूमिका करायला नकार दिला. सोफियाची उंची जास्त असल्याने मुलगी म्हणून ती शोभणार नाही असं तिचं म्हणणं पडलं. सोफिया सोडून दुसऱ्या कोणाला मुलीची भूमिका दिल्यास ती करायला तयार होती; पण मग क्युकोरनं प्रयत्न सोडून दिला.

सोफियाने पॅरामाउंटकडून हक्क विकत घेतले आणि डिसिकाच्या हाती चित्रपट सोपवला. डिसिका मॅगनानीची समजूत घालायला गेला पण सोफियाबरोबर काम करायला ती तयार होईना. शेवटी सहज ती डिसिकाला म्हणाली.

'तू सोफियालाच आईची भूमीका का देत नाहीस?'

डिसिकाला ते पटलच आणि सोफियाच्या आयुष्यातील सगळ्यात महत्त्वाची भूमिका तिला मिळाली डिसिकाने मेहनत घेतली आणि सोफियाला भूमिकेचे बारकावे समजावून दिले. युद्धकाळात आपल्या १३ वर्षाच्या मुलीला जपत सहाऱ्याकडे धावणाऱ्या एका धिरोदात्त स्त्रीच्या त्या भूमिकेत सोफियाने प्राण ओतला. आपले स्वत.चे युद्धकालातील अनुभव आणि तिच्या आईचा स्वभाव या गोष्टी टू वूमेनमधील आई साकारताना तिला उपयोगी पडल्या.

ती म्हणते, 'टू वूमेन पूर्ण झाल्यावर मी खऱ्या अर्थाने अभिनेत्री बनले.'

'टू वुमेन' ची ऑस्करसाठी शिफारस झाली. सोफिया कार्यक्रमाला हजर राहिली नाही कॅरी ग्रॅंटने प्रथम फोन करून तिचे अभिनदन केले, तेव्हाच तिला समजले, ती टू वुमेनमुळे ऑस्करविजेती ठरली. आपल्या कलेचा हा सन्मान पाहून ती आत्यतिक भारावून गेली.

सोफियाची आई रोमिल्डा त्या समारभाला उपस्थित होती. ऑस्कर पारितोषिक जेव्हा तिच्या हातात देण्यात आल तेव्हा आयुष्यभर नटी व्हायची महत्त्वाकांक्षा बाळगणारी आणि सोफियाच्या करियरसाठी धडपडत राहिलेल्या त्या झुझार मातेच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. सोफियाने तिच्या परिश्रमाचे चीज केले होते आणि नियतीने ऑस्कर आणि त्याच्या टाळ्या तिच्यासाठी देऊन तिच्या जिद्दीची कदर केली होती.

एके दिवशी कार्लोनं फोन करून तिला मेरीलिन मन्रोच्या आत्महत्येची बातमी दिली. सोफियाला धक्का बसला. तिने मेरिलिनचे अनेक सेक्सी फोटो पाहिले होते. तिच्या अफेअर्सबद्दल ऐकल होत; पण तिला माहिती होतं की मन्रो अतिशय एकाकी जिणं जगत होती. तिला खरेखुरे मित्र कुणी नव्हतेच.

मेरिलिनला तिच्या कामातून आनद मिळत नव्हता असं सोफियाला वाटतं. त्या दिवशी ती बातमी ऐकल्यावर सोफियाने तिला प्रिय असणाऱ्या मेरीलिनबद्दल एकांतात अश्रू ढाळले.

सोफियान सुद्धा अनेक चित्रपटात मेरीलिनप्रमाणे सेक्सी काम केलं आहे यस्टरडे, टुडे, टुमारो नावाच्या एका चित्रपटात डिसिकान तिला स्ट्रीप टीज नावाचा एकामागून एक कपडे उतरण्याचा नृत्य प्रकार करायला लावला होता; पण डिसिकाच्या शैलीमुळे तिला त्यामध्ये अभिनयाचा आनद मिळाला होता

एकदा चार्ली चॅपलीनचा तिला फोन आला, तो तिला भेटायला येणार होता. लहानपणापासून आवडणारा विनोदी नट आणि त्याची उत्तुगता या दोन्हीमुळे सोफिया गोंधळून गेली.

चार्ली आला त्या वेळी तर तिच्या तोंडातून शब्दच फुटेनात. चार्ली 'अ काऊंटेस फ्रॉम हॉंगकॉंग' नावाच्या एक कॉमेडीची पटकथा घेऊन आला होता. त्याच्याकडे ती बरेच दिवस पडून होती; पण यस्टरडे, टुडे ॲंड टुमारो बघितल्यावर सोफियाला घेऊन तो पुरा करण्याची त्याला इच्छा आली होती.

सोफियाला त्याने कथा वाचून दाखवली. सोफियाचे लक्ष त्याच्या वाचनापेक्षा त्याच्या आविष्काराकडे होते. ती म्हणते,

'मला त्यातील एक शब्दही ऐकता आला नाही. मी त्याच्या भावाव्यक्तीने दिपून गेले होते. त्याने टेलिफोन डिरेक्टरी जरी वाचून दाखवली असती तरी मी हा चित्रपट केलाच असता.'

त्यानत त्याने सोफियाला आणि मार्लन ब्रॅंडोला स्वित्झरलॅंडला आपल्या घरी बोलवले आणि तेथे एकदा कथा वाचून दाखवली. मार्लन ब्रॅंडो कथा ऐकताना अक्षरश: पेंगायचा; पण सोफिया त्याबद्दल त्याला दोष देत नाही.

तो चित्रपट तेवढा चागला जमला नाही. समीक्षकानी त्यावर प्रचड टीका केली; पण सोफियाला त्यातून चार्ली चॅपलीन समजला. त्याने तिला आपल्या बालपणाविषयी, चित्रपटाबद्दल बरच सागितले. सोफिया त्यापासून बरच काही शिकली. सहज बोलता बोलता तो मोठी वाक्ये बोलून जायचा, 'प्रत्येक कलेमुळे सगळ्यात मोठी कला समजायला मदत होते ती म्हणजे जगण्याची कला'

सोफियाला तो म्हणायचा, 'तुझ्यात एक मोठा दुर्गुण आहे तो दूर कर. तुला 'नाही' म्हणता येत नाही हा एक मोठा दुर्गुण आहे. मलासुद्धा त्यावर मात करताना कष्ट झाले; पण एकदा 'नाही' म्हणायला शिकलं की, जीवन सुखकर होतं.'

सोफिया म्हणते की, अजूनही ती उदास झाली की, ती चार्लीच्या चित्रपटातील दृश्यं आठवते. पाय फाकून निरागस चेहऱ्याने काठी फिरवत चाललेला ट्रॅम्प—आणि तिची उदासिनता दूर होते.

सोफियाचं लग्न इटलीमध्ये बेकायदेशीर ठरल होतं. कार्लोच्या वकिलांना त्यावर उपाय सापडत नव्हता; पण कार्लोची पहिली बायको वकिलापेक्षा हुशार ठरली. कार्लोनं फ्रेंच नागरिकत्व घ्याव अस तिनं सुचवल.

कार्लोनं आणि सोफियान फ्रेंच नागरिकत्व घेतलं. फ्रेंच कायद्यामुळे त्यांच्या बायकोलाही ते विनासायास मिळाले. मग तिने अर्ज करून फ्रेंच कोर्टात घटस्फोट घेतला.

आणि मग एप्रिल १९६६ मध्ये सोफिया अगदी साध्या समारंभात रीतसर सौ. कार्लो पाँटी बनली. तिच्या आयुष्यातील तो एक आनंदाचा क्षण होता. एक रोमन कॅथॉलिक म्हणून सोफियाला आपलं लग्न कायदेशीर नाही याची फार खत होती. ती काही प्रमाणात त्यामुळे दूर झाली.

## डिसिकाचा वियोग

१९७३ च्या दरम्यान रिचर्ड बर्टन सोफियाबरोबर 'द जर्नी' मध्ये काम करण्यासाठी रोमला आला. रिचर्ड त्यावेळी पिणं कमी करण्यासाठी प्रयत्न करीत होता. रिचर्ड आणि सोफिया याची चागलीच गट्टी जमली होती. रिचर्ड एलिझाबेथ टेलरबद्दल सागायचा त्यावेळी सोफिया श्रोत्याची भूमिका घ्यायची. रिचर्ड सोफियाला सागताना सगळा दोष स्वत कडे घ्यायचा आपल्या चुकीमुळेच एलिझाबेथ दुरावली आहे हे तो मान्य करायचा.

डिसिका आजारी असल्याने द जर्नीचे चित्रिकरण सुरू झाल्यावर एलिझाबेथने फोन करून रिचर्डला बोलवून घेतले. पुन्हा ती रोमला आली

पण सोफियाला समाधान होत असतानाच त्याचे संबंध पुन्हा बिघडले. पुन्हा रिचर्डचं समाधान करण्याची पाळी सोफियावर आली. यातूनच त्याची अगदी खोल अशी मैत्री जडली.

सोफियाच्या स्मृतीतील रिचर्ड बर्टन शेक्सपियरच्या शोकांतिकातील राजाप्रमाणे आहे. एलिझाबेथवर नितात प्रेम करणारा, तिच्याशिवाय जगता न येणारा आणि त्याच वेळी तिच्याबरोबर ससार न करता येणारा.

डिसिकाबरोबरचा तिचा तो अखेरचा चित्रपट ठरला. डिसिकानं तिला आयुष्यात बरच काही दिलं होतं बापाप्रमाणे त्यानं तिला मार्गदर्शन केल होतं. तिच्यातील अभिनेत्री फुलवण्यात त्याचा फार मोठा वाटा होता

एकदा तिच्या घरात मोठी चोरी झाली होती. तिन जीवापाड जपलेले दागिने चोरीला गेले होते तिने किती प्रयत्न केला तरी तिला आपलं दुःख दाबता आल नव्हतं. ती ओक्साबोक्शी रडत बसली होती. त्यावेळी डिसिकान तिची समजूत घातली होती.

'तुझा काका व्हिहोरियो आता तुला नाहक अश्रूवर एक छोटे भाषण देणार आहे. तू आणि मी, आपण कोण आहोत ? नेपल्सहून आलेले दोन निर्धन, पण आपण पैसा मिळवला. माझ विचारशील तर मी मिळवतो, जुगारात घालवतो, पुन्हा मिळवतो. मी तुझ्यापेक्षा वयान खूप मोठा आहे आणि एक मोठे सत्य मला समजलय. जे तुमच्याबद्दल रडू शकत नाही त्याच्याबद्दल तुम्ही कधीच रडू नये.

असा डिसिका ! किती तरी वेळा प्रेमळपणे तो सोफियाच्या मागे उभा राहिला होता. आता त्याच्यात तो प्रसिद्ध डिसिका स्पर्श राहिला नव्हता. 'द जर्नी'च्या शेवटच्या दिवशी त्याने सोफियाला निरोप दिला. तेव्हा का कोण जाणे आपल्याला पुन्हा डिसिका दिसणार नाही या भावनेने कातर होऊन सोफिया मागे पुन्हा पुन्हा पाहात राहिली होती.

आणि एक महिन्याने तिला कार्लोने फोन करून सागितले की डिसिकाने पॅरीसमध्ये देह ठेवला आहे सोफिया धावतच पॅरीसला गेली. तिने डिसिकाच्या मृत देहाला वदन केले. ती पंधरा वर्षाची असताना ज्याने तिला प्रथम संधी दिली होती, बापाचे प्रेम दिले होते आयुष्य जगायला शिकवले होते, तो डिसिका आता या जगात नाही हे तिला पटेनासे झाले होते.

'मॅन आफ ला मॅचा 'च्या निमित्ताने सोफिया आणि पीटर ओ टूल एकत्र आले. या दोघाचीही ही पहिलीच सगितिका होती. त्यामुळे आपल्याला हे कितपत जमेल याबद्दल ते साशंकच होते.

पीटर ओ टूल अत्यंत वक्तशीर असे. सोफियाबरोबर पत्ते खेळताना तो खूप फसवायचा. पीटरबरोबर बोलण हा एक आनद आहे असं सोफियाला वाटत. चित्रपट सपेपर्यंत पीटरबरोबर तिचे एक अतूट नाते निर्माण झाले होते. निरोप घेताना त्याने सोफियाला एक शहामृगाचे अंडे भेट म्हणून दिले.

एका मुलाखतीत पीटर ओ टूल सोफियाबद्दल म्हणाला, 'जितका मी जास्त तिच्या सहवासात आलो तितकीच सोफिया मला खाण्यायोग्य वाटत राहिली.'

पीटरचे हे विधान सोफियाला फार आवडले. असाच तिचा उल्लेख नोअल कॉवर्डने केला होता सोफिया चॉकलेटने बनवलेली असायला पाहिजे होती म्हणजे जगाला तिचा स्वाद घेता आला असता.

सोफियानं अनेक अवघड भूमिका पार पाडल्या आणि त्याबद्दल समीक्षकाची आणि प्रेक्षकाची वाहवा मिळवली, पण दोन भूमिका तिला हव्या होत्या पण मिळाल्या नाहीत. त्या म्हणजे 'व्हूज अफ्रेड ऑफ व्हर्जिनिया वूल्फ' जी एलिझाबेथ टेलरनं केली आणि दुसरी म्हणजे ॲना कॅरेनिनाची जी गार्बोनं केली.

ती ज्यावेळी एखादी भूमिका साकार करते त्यावेळी ती त्या भूमिकेत पूर्णपणे शिरते. काही वेळा आपल्या व्यक्तिमत्वावर काबा ठेवणं कठीण जाते हे तिला मान्य आहे त्यामुळे बऱ्याच वेळा त्या भूमिकात सोफिया लॉरेन जाणवते. 'सनफ्लावर' मधल्या प्रतिनिष्ठ स्त्रीची किवा टू वूमेन मधील आईची भूमिका करताना आपले अनुभव आत्यंतिक उपयोगी पडले असं ती कबूल करते म्हणून अभिनय करू शकणाऱ्यांबद्दल तिला नितात आदर आहे.

अनौरस म्हणून जन्मलेल्या, रोगराई, युद्ध आणि उपासमार यांना तोंड देत पुढे आलेल्या सोफियाची ही थोडक्यात कहाणी आहे. जसा तिला जन्म देऊनसुद्धा जबाबदारी टाळणारा बाप भेटला, तसाच तिच्यावर बापासारखं प्रेम करणारी डिसिका भेटला. तिच्यासाठी वणवण पायपीट करणारा कार्लो पाँटी भेटला. ही कहाणी केवळ सोफियाची नव्हे तर तिच्या महत्त्वाकांक्षी आईची पण आहे.

आपलं आत्मचरित्र लिहिताना सोफिया केवळ ४४ वर्षाची होती. पण या ४४ वर्षात ती कोठून कोठे गेली ! एक पोझुलीची अनाथ मुलगी ते जगप्रसिद्ध सोफिया लॉरेन असा प्रवास तिने केला आणि या प्रवासात जेवढं अनुभवता येईल तेवढं अनुभवलं.

'लेडी एल्' मध्ये तिने ८० वर्षाच्या वृद्धेचं काम केलंय. तिला वाटतं ८० वर्षाची होईपर्यंत ती कॅमेऱ्यापुढे असेलच. प्रसन्नपणे ती लिहिते,

'मला आशा आहे की मी ८० वर्षाची होताना प्रत्यक्षातही तशीच दिसेन ( जरी 'लेडी एल्' लागल्याप्रमाणे फक्त ४ तास त्याला लागणार नाहीत) मी स्वतःला दोन मुले, सुना, नातू, माझी वहीण, तिचा नवरा आणि मुले यांच्यामध्ये प्रसन्नपणे वसलेली पहातेय. पण खरं महत्त्व माझ्या नवऱ्याला असेल कारण त्याने काही महिन्यापूर्वी १०० ओलांडलेली असेल. □

रंगभूमी

# काही वर्षे हरवली आहेत

## अजून सुधारणा हवी

वि. भा. देशपांडे

'**का**ही वर्षे हरवली आहेत' हे सुधा करमरकरांनी लिहिलेले नाटक शकुंतला गोगटे यांच्या 'स्मृतिभ्रंश' कथेवर आधारलेले आहे. अर्थात या कथेला मूळ आधार आहे एका अमेरिकन कादंबरीचा. नाटकाच्या नावावरून नाटकाच्या विषयासंबंधी कुतूहल निर्माण होते विशेषतः त्यातल्या गूढतेमुळे ! प्रिया करंदीकर या विवाहित स्त्रीच्या जीवनातील सहा वर्षांचा कालखंड नाटकासाठी निवडला आहे. या सहा वर्षांतील काळ ती पूर्णतः विसरलेली आहे तिला त्यातल्या घटना कणभरही आठवत नाहीत. तिची स्मृती पूर्णतः गेलेली आहे. ती स्मृती कोणत्या कारणाने गेली, त्याचा उलगडा शेवटच्या भागात केला आहे. अशी स्मृती जाणे किंवा विशिष्ट काळातील गोष्टी अजिबात न आठवणे हा एक मनोविकार असतो. वर्तमानाचे नाते भूतकाळाशी तुटले म्हणजे मग जीवनात एक भयाण पोकळी निर्माण होते. त्या काळात घडत असलेल्या प्रसंगांना कमालीची नाट्यमयता प्राप्त होते. प्रस्तुत नाटकात पहिल्या अंकात या विषयाचे–व्यक्तिरेखेचे वेगळेपण सहजपणाने जाणवते आणि पुढील घटनांचे कुतूहल निर्माण होते. परंतु पुढच्या अंकांमध्ये ते नाट्य–ताण तितके बळकट राहिलेले नाहीत. एकतर अशा नाटकांची जात घटितांपेक्षा विश्लेषणाची, तपशीलाची अधिक असते. त्यामुळे ज्यांना नाटकात सतत काही घडत राहावे अशी अपेक्षा असेल त्यांची निराशा होणे शक्य आहे. पण नाट्यविषयाची जात जाणून घेतली तर त्रास कमी होईल.

पण या नाटकात झाले आहे असे की, हे नाटक पुरेसे घटनांच्या पातळीवर नाही, आणि पुरेसे विश्लेषणाच्या किंवा मनःदर्शनाच्या पातळीवर तितक्या ताकदीने व्यक्त झालेले नाही. परिणामी संवादात मोठ्या प्रमाणात ते अडकून पडले तीच तीच गोष्ट किंवा अवस्था वर्णनाच्या पातळीवर राहिली. एखाद्या माणसाची स्मृती काही काळ का होईना गेल्यावर त्याला त्याच्या संदर्भातली माणसे जेव्हा भेटतात, तेव्हा जे नाट्य घडते ते महत्त्वाचे ठरते. समोरचा माणूस आपल्याला ओळखतो आहे आणि आपण त्याला ओळखू शकत नाही किंवा आपण काय म्हणतो ते त्याला आकळू शकत नाही असे जेव्हा घडते तेव्हा त्याक्षणी एक थरार निर्माण होतो. त्या थराराची अवस्था संपली की अनुकंपा निर्माण होते. परिणामी शोकात्म भावाकडे हे सारे नाट्य जाते. तसे या नाटकाच्या लेखनाच्या संदर्भात घडले नाही. कुतूहलापासून अनुकंपेचा प्रवास अशा नाटकांची गुणवत्ता वाढवीत असतो. मूळच्या कथेत त्या माध्यमाच्या हिशेबात वर्णनाला, विस्ताराला पुरेसा वाव असतो. तसा नाट्यमाध्यमात असणार नाही जी काही मानसिक अवस्थांतरे, आंदोलने असतील ती शब्द–संवादाच्या मिताक्षरामध्येच व्यक्त व्हायला हवीत. अवस्थांची वर्णने मर्यादेपेक्षा अधिक येऊ लागली की, नाट्याचे सूत्र क्षीण होते. त्यामुळे क्रमाने अंकांचे परिणाम उतरत जातात. तसे या नाटकात घडले.

नाटकाच्या अखेरीला असे वाटत होते की अशा मानसिक स्तरावरच्या सूत्रावरचे नाटक तशाच पद्धतीने संपेल. पण प्रत्यक्षात स्मृतिभ्रंशाला कारणी झालेला प्रसंग कोणत्याही गल्लाभरू चित्रपटाला लाजवील किंवा त्यात घेता येईल इतका तद्दन खोटा होता. त्याच्या कृत्रिमपणामुळे नाटकाचा जो काही थोडाफार परिणाम विषय–व्यक्तिरेखेमुळे झाला असेल तोही पुसला गेला. नाटक संपल्यावर प्रेक्षक नायिकेविषयी किंवा एकूण अवस्थेविषयी काही बरोबर घेऊन जात नाही. अशा नाटकात हे अपेक्षित असते सुधा करमरकरांनी लेखनाच्या संदर्भात आणखी जाणकारीने विचार करून ते काहीसे मुरल्यानंतर पक्व अवस्थेत आणायला हवे होते.

लेखनातल्या उणिवा प्रयोगात तर त्रास-

दायक होत होत्याच, पण पुन्हा अभिनय-दिग्दर्शन यातल्या काही गोष्टी त्या त्रासाला साह्य करीत होत्या. मध्यवर्ती नायिकेच्या भूमिकेत खुद्द सुधाताई होत्या. कोणाही अनुभवी, गुणवान कलावतीला अशा व्यक्तिरेखेचा मोह होणे यात गैर नाही. व्यक्तिरेखेच्या संदर्भातील अनेक बारकावे दाखवण्याचा प्रयत्न त्या करीत होत्या, पण एकतर त्यामध्ये मुद्राभिनयाची आणि स्वराची पुनरोक्ती जाणवत होती. लेखनातले शब्दांचे प्रमाणही जाणवत होते. तरीही अतिशय जिद्दीने ती भूमिका करण्याचा प्रयत्नही चागल्या अर्थाने जाणवत होता. पण पूर्णत: समाधान मात्र लाभले नाही.

नायिकाप्रधान असलेल्या ह्या नाटकात इतर व्यक्तिरेखा दुय्यम, साह्यकारी अशाच होत्या. त्यामध्ये सिस्टर दाते (नीलम भडेकर), आई (प्रभा आपटे), पहिला नवरा डॉ. नंदन भारद्वाज (किरण भोगले), दुसरा नवरा चारुहास करंदीकर (अशोक समेळ) इत्यादी होते. प्रत्येकाने आपल्या वाटयाला आलेल्या भूमिका ठीक केल्या. नीलम भडेकर यांची भूमिका अधिक लक्षवेधी वाटली. किरण भोगले आणि समेळ याना अभिनयाला फारसा वाव नव्हताच. त्याच्या दोघाच्याही बोलण्यात ऐतिहासिक ढग अधूनमधून जाणवत होता. या नाटकाच्या पहिल्या काही प्रयोगात नायिकेच्या मैत्रिणीचे काम ललिता केंकरे करीत होती असे ऐकले आणि वाचले होते. पण पुण्याच्या प्रयोगात तिची भूमिका एकतर काटछाट होऊन आली आणि ललिताच्याऐवजी दुसरीच कोणी काम करीत होती.असे का घडले ते कळायला मार्ग नाही; पण त्यामुळे ती मैत्रिणीची व्यक्तिरेखा जी काही मूळची असेल ती पार बदलून पुढच्या प्रयोगात लेखनात आणि अभिनयात सपक रीतीने आली.

सोनाली आणि नाटयसपदा याच्या सहयोगाने हा प्रयोग पेश झाला. यातली प्रयोगतंत्राची बाजू यथायोग्य होती. अशा सहयोगाने नाटक अधिक परिणामकारी झाले असते तर बरे वाटले असते !

□

चित्रपट

# ' कर्मयुद्ध '

## नेहमीचाच मसाला

हिंदी चित्रपटात पोलीसांना तसं फारसं स्थान नाही ' अर्धसत्य 'सारख्या एखाद्या चित्रपटात पोलिसी खात्यातील भ्रष्टाचाराचं आणि बेशिस्त कारभाराचं विदारक दर्शन घडतं; पण इतर बहुतेक चित्रपटातही गुन्हेगाराला नायकानं बरीच मारामारी करून पकडल्यावर त्याचे आभार मानायलाच पोलीस येताना दिसतात. अर्थात या फॉर्म्युल्यात थोडासा बदल म्हणून कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारीही मधूनमधून दाखवले जातात. ' कर्मयुद्ध ' हा चित्रपटही अशाच एका कर्तव्यदक्ष, तडफदार वगैरे असलेल्या पोलीस इन्स्पेक्टरची कहाणी पेश करतो.

चित्रपटाचा नायक आहे इन्स्पेक्टर विजय. (मिथुन चक्रवर्ती) त्याचे वडीलही असेच प्रामाणिक इन्स्पेक्टर असतात व कर्तव्य बजावतानाच त्याचा खून झालेला असतो. कर्तव्यपालनाची ही परपरा पुढे चालवण्याच शिक्षण विजयला त्याची आई (आशालता) देते शहरात ' स्पायडर ' हे नाव धारण करणाऱ्या व्यक्तीच्या गँगनं धुमाकूळ घातलेला असतो. त्याची पाळंमुळं खणून काढायच्या प्रयत्नात विजय असतो. राकेश सक्सेना (तेज सप्रू) हा सी. आय डी. इन्स्पेक्टर या गँगमध्येच राहून त्याची सगळी माहिती विजयला पुरवत असतो; पण हे उघडकीला येऊन त्याला मारण्यात येते आणि या गँगशी सामना देण्याची जबाबदारी बिचाऱ्या एकटया नायकावरच येऊन पडते.

सोहनलाल पुरी (अमरीशपुरी) हा संभावितपणे वावरणारा आणि आपल्या वडिलाचा मित्रच ' स्पायडर ' आहे इतकच नव्हे तर त्यानच वडिलाचा खून केलेला आहे हे विजयला कळत आणि तो पुरीविरुद्ध लढा उभारतो. राकेश सक्सेनाची बहीण उषा (अनिता राज) आणि प्रथम गुन्हेगार असलेला पण नतर हृदयपरिवर्तन झालेला चरणसिंग (प्राण) त्याला येऊन मिळतात आणि अर्थातच पुरीचे साम्राज्य नष्ट करतात.

' कर्मयुद्ध ' ची कथा यापूर्वी असल्य वेळा पडद्यावर येऊन गेली आहे त्यामुळे कथेत काही नाविन्य नाही. त्याच्या हाताळणीतही काही वेगळेपणा नाही. दिग्दर्शक स्वरूपकुमारन चित्रपट रेंगाळणार नाही एवढी दक्षता घेतली आहे अशा चित्रपटात दिग्दर्शक एवढच करू शकतो, ते त्यान केलं आहे.

' कर्मयुद्ध 'च्या काही भागावर ' जजीर '-ची छाप आहे. चरणसिंग ही प्राणन केलेली भूमिका तर ' जंजीर 'मधील त्याच्या भूमिकेशी खूपच मिळतीजुळती आहे. त्याच्या हृदयपरिवर्तनाचा प्रसगही ' जंजीर 'मधल्या प्रसगासारखाच आहे. दोन्ही चित्रपटातल्या नायकाची नावही सारखीच आहेत.

विजयच काम मिथुन चक्रवर्तीनं झोकात केल आहे. कर्तव्याबरोबरच हा इन्स्पेक्टर मारामाऱ्या, प्रेम, नाचगाणी, घोडे पळवणं वगैरे वगैरे सर्व गोष्टी करतो. हे सगळं मिथुनन व्यवस्थित निभावल आहे. त्याच्या मारामाऱ्या अस्सल वाटतात. आपल्या मेहुण्याचा खून करवलेला आणि बहिणीच्या मृत्यूम कारणीभूत असलेला पुरी न्यायालयात निर्दोष सुटतो. तेव्हा चवताळलेला विजय न्यायालयातच त्याच्यावर तुटून पडतो. हा प्रसग, त्या वेळचे भाव मिथुनने छान दाखवले आहेत.

चित्रपटाची नायिका आहे अनिता राज. अर्थात या नायकप्रधान चित्रपटात 'शो पीस' व्यतिरिक्त तिला काही वाव नाही. ही नायिका मारामाऱ्या वगैरे करते हाच तिच्या व्यक्तिरेखेतला वेगळेपणा सपूर्ण चित्रपटात ती फारशी बरीही दिसत नाही. त्यामुळे तिचा काहीही प्रभाव पडत नाही.

खलनायकाचे काम करणे अमरीशपुरीच्या आता अगवळणी पडले आहे. इथेही पुरी उर्फ स्पायडर त्यानं सफाईन रंगवला आहे. विजयच्या आईच्या भूमिकेत आशालता आहे.

पुरीच्या हस्तकाच काम भरत कपूरन केल आहे. ' बाजार 'सारख्या चित्रपटात नसिरुद्दीन आणि स्मिता पाटीलसारख्या अभिनेत्यांसमोर उभा राहूनही लक्षात रहाणाऱ्या या गुणी अभिनेत्याला इथं मात्र काहीही अर्थ नसलेल्या ठिसूळ भूमिकेत काम कराव लागल आहे

चित्रपटात सगीताला काही महत्त्व नाही. उगीच नायकाला नाचायचा शौक असल्यानंच तो पुरा करण्याकरता तीन-चार गाणी कोंबली आहेत. ती पुरेशा ठणठणाटासह सादर करायचं श्रेय अर्थातच सगीतकार भप्पी लहिरीचं.

—सीमा कुलकर्णी

विज्ञान

# जंगले-पाऊस आणि गैरसमज

डॉ. सुभाषचंद्र सारंग

सर्व प्राणी सृष्टीवर वनस्पती जीवनाचा असलेला प्रभाव व्यापक स्वरुपाचा आहे. त्यातही जंगलांचे महत्त्व अधिकच आहे आणि ते सर्वमान्य झाले आहे. जंगलातून मिळणारी उत्पादने हा प्रत्यक्ष लाभ झाला पण त्याचबरोबर जंगलांचे अनेक अप्रत्यक्ष लाभ आहेत. जंगलामुळे हवामान सम बनण्यास मदत होते, वाऱ्याचा वेग कमी होतो, पावसाच्या थेंबांचा जमिनीवर होणारा मारा थोपविला जातो, जमिनीत अधिक प्रमाणात पाणी मुरते. झाडांच्या मुळांमुळे माती घट्ट धरून ठेवली जाते आणि धूप कमी प्रमाणात होते. जमिनीवरून वाहणाऱ्या पाण्याचा वेग कमी होतो आणि जमिनीला होणारा पाण्याचा पुरवठा वाढतो. जंगलात केवळ प्राणीच नव्हे तर अनेक आदिवासी जमाती सुरक्षित राहू शकतात. या आणि अशा प्रकारच्या कोणत्याच विधानाबद्दल वाद नाही. दुमत नाही. मात्र अनेकदा, 'जंगलामुळे पावसाचे प्रमाण वाढते' किंवा 'जंगलामुळे पाऊस पडण्यास मदत होते.' अशी जी विधाने केली जातात त्याबद्दल निश्चितच दुमत आहे. जंगलामुळे प्रत्यक्ष जंगल व्याप्त प्रदेशात किंवा आसपासच्या प्रदेशात पावसाचे प्रमाण वाढते का? हा वादग्रस्त प्रश्न आहे.

जंगल वाढविल्यामुळे त्या प्रदेशात पावसाचे प्रमाण वाढते असा एक रूढ समज आहे. या प्रश्नावर सखोल संशोधन होण्यापूर्वी काही शास्त्रज्ञांनी तसा दावाही केला होता; परंतु अनेक शास्त्रज्ञांनी उलट मत मांडले आहे. जंगलांचा पावसाशी काहीही संबंध नाही, जंगलामुळे पावसाच्या प्रमाणावर कोणताच परिणाम होत नाही असे अनेक शास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे. या प्रश्नावरील शास्त्रज्ञांच्या मतांचा विचार करण्यापूर्वी दोन महत्वाच्या मुद्यांची चर्चा आवश्यक आहे. एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या संदर्भात शास्त्रज्ञांच्या संशोधनाच्या मर्यादा. शास्त्रज्ञांचे या प्रश्नाबद्दलचे निष्कर्ष पावसाच्या प्रत्यक्ष मोजमापावर आधारीत आहेत. तथापि पावसाचे अचुक मोजमाप जंगल व्याप्त प्रदेशात शक्य होत नाही. जंगले नसलेल्या प्रदेशात पर्जन्यमापक हवेतील विविध प्रवाह, वारे इ. पासून सुरक्षित नसते. तर जंगल व्याप्त प्रदेशात पर्जन्यमापक ठेवण्यासाठी जंगलाचा काही भाग तोडून साफ करावा लागतो. अशा जागी ठेवलेल्या पर्जन्यमापकाला सुरक्षितता अधिक प्रमाणात लाभते. त्या ठिकाणी पडणाऱ्या पावसावर वाऱ्याचा विशेष परिणाम होत नाही. मात्र अशा पद्धतीने दाट जंगलात पर्जन्यमापक ठेवण्यासाठी जे छिद्र अथवा मोकळा भाग निर्माण होतो त्यामध्ये वेगवान अधोगामी असे हवेचे प्रवाह निर्माण झाल्याने जास्त पावसाची नोंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही जंगल अच्छादनाच्या पातळीवर पर्जन्यमापक बसविले तर त्या ठिकाणी वाऱ्याचा अधिकच जोर असतो. त्यामुळे या प्रश्नाच्या उत्तराकडे जाणारी संशोधन पद्धतीच सदोष असल्याचे दिसून येते.

दुसरा मुद्दा पावसाच्या प्रकाराबद्दल आहे. सर्वत्र पडणारा पाऊस एकाच प्रकारचा नसतो. पृथ्वीवर ठिकठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचा पाऊस पडतो. विषुववृत्तीय प्रदेशात हवेत अभिसरण प्रवाह निर्माण होऊन बाष्पयुक्त हवा वर वर जाऊ लागते व ती थंड झाल्यामुळे पाऊस पडतो, हा झाला अभिसरण किंवा आरोह प्रकारचा पाऊस. भारतासारख्या देशात समुद्रावरून येणारे बाष्पयुक्त वारे डोंगर रांगामुळे अडविले जाऊन पाऊस पडतो त्याला प्रतिरोध पाऊस असे म्हणतात, मध्य अक्षवृत्तीय विभागात आवर्तामुळे पाऊस पडतो. आता यापैकी नेमक्या कोणत्या प्रकारच्या पावसावर जंगलांचा परिणाम होण्याची शक्यता आहे ते पहावे लागेल.

जंगलामुळे पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याबद्दलचा समज तरी का निर्माण झाला? वनस्पती मुळावाटे पाणी घेतात आणि पानावाटे ते हवेत सोडतात. म्हणजेच जंगलामुळे बाष्पोच्छ्वासावाटे वातावरणाला पाण्याचा पुरवठा होतो व त्यामुळे पावसाचे प्रमाण वाढते असे मानायला जागा होती; परंतु रॅख्मनॉव्ह या शास्त्रज्ञाने १९६२ मध्ये संशोधनाने जंगल व्याप्त प्रदेशात बाष्पोच्छ्वासामुळे हवेला मिळणारे पाणी इतर प्रदेशांच्या तुलनेने फारसे जास्त नसते असे सिद्ध केले. म्हणजेच जंगलामुळे हवेत होणारी बाष्पवाढ काही लक्षणीय स्वरूपाची नसते. शिवाय पानझडी जंगलांच्या बाबतीत ती आणखी कमी असते.

इ. स. १८६५ मध्ये प. युरोप आणि उ. अमेरिकेतील उदा. च्या साहाय्याने मार्शने जंगल तोडीमुळे पावसाचे प्रमाण घटते असा विचार मांडला तर पिकॉटने जंगलामुळे पावसाच्या प्रमाणात किमान दहा टक्क्यानी वाढ होते असे मत मांडले (१९०९). त्यानंतरच्या काळात १९२७ मध्ये जंगलामुळे पाऊस वाढतो असे म्हणणाऱ्या झॉन या शास्त्रज्ञाने १९४५ मध्ये आपले पूर्वीचे मत बदलून जंगलांचा पावसाशी फारसा संबंध नसतो असे म्हणायला सुरुवात केली. त्याच काळात किट्रेज या कॅलिफोर्निया विद्यापीठातील प्राध्यापकाने आवर्तामुळे पडणाऱ्या पावसावर जंगलांचा कोणताच परिणाम होत नाही, मात्र प्रतिरोध पर्जन्याच्या प्रमाणात जंगलामुळे दोन ते तीन टक्के वाढ होण्याची शक्यता स्पष्ट केली. त्याने जंगलात ठेवलेल्या पर्जन्यमापकात जास्त पावसाची नोंद झाली; पण ती खरी नव्हती. जंगल व्याप्त प्रदेशात, मोकळ्या प्रदेशातल्या परिस्थितीत पर्जन्यमापक बसविल्यास केवळ एक टक्का जास्त पावसाची नोंद होते असे मत त्याने मांडले.

केनया आणि युगांडामधील काही जंगल व्याप्त प्रदेशात पावसाचे प्रमाण वाढल्याचे निकोलसनने नमूद केले आहे; पण त्याचप्रमाणे काही जंगलात पावसाचे प्रमाण वाढत नसल्याचाही उल्लेख त्याने केला आहे. प्रतिरोध प्रकारचा पाऊस पडणाऱ्या प्रदेशात प्रत्यक्ष जंगलात पावसाचे प्रमाण फारसे वाढत नसले तरी आसपासच्या प्रदेशात ते लक्षणीय प्रमाणात वाढते असे त्याचे मत

आहे. एकाच मोठ्या जगलापेक्षा छोटी-छोटी अनेक जंगले त्या प्रदेशात असतील तर ती पावसाचे प्रमाण वाढण्याच्या दृष्टीने अधिक उपयोगी पडतील असा विचार त्याने माडला असला तरी त्याला आधार नाही.

जगातील अनेक शास्त्रज्ञानी जगलाचा पावसाशी संबंध नसतो असे स्पष्ट केले असले, तरीही भारतामध्ये अजूनही जगलामुळे पाऊस पडतो हा गैरसमज कायम आहे. भारतात पडणारा बहुतेक पाऊस मोसमी प्रकारचा असतो. मोसमी वाऱ्यांची निर्मिती हिंदी महासागर विभागात होते. हे वारे भारताकडे खेचले जातात तेही मध्य आशियातील हवेच्या स्थितीमुळे म्हणजेच भारतात पडणारा पाऊस प्रामुख्याने भारताबाहेरील परिस्थितीवर अवलबून असतो. स्थानिक उठावाचा पावसाच्या प्रत्यक्ष वितरणावर परिणाम होतो. जंगलामुळे पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता फारच कमी. इ. स. १९०६ मध्ये याबद्दलचा एक अहवाल विल्यम स्लीच यानी तयार केला. त्यानीसुद्धा अहवालात जगलामुळे पाऊस पाडण्यास मदत होते असे स्पष्ट केले नाही. भारत सरकारचे डायरेक्टर जनरल ऑफ ऑब्झर्वेटरीज श्री. वॉकर यानी त्याच सुमारास जगलतोड झालेल्या प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी झाले नाही अथवा नव्याने जगलवृद्धी झालेल्या प्रदेशात पावसाचे प्रमाण वाढले नाही असे दाखवून दिले. त्यांनी दिलेल्या आकडेवारीवरून पावसाचे प्रमाण आणि जगले यांचा सबध नाही हेच स्पष्ट होते. ब्रह्मदेश व भारत याच्या सीमेवर मोठ्या प्रमाणात जगलतोड झाली असली तरी त्या प्रदेशात पावसाचे प्रमाण घटलेले नाही हे सुद्धा त्यानी दाखवून दिले.

व्हीलकर यानी आपल्या 'इम्प्रूव्हमेंट ऑफ इडियन अॅग्रीकल्चर' या ग्रथामध्ये निलगिरी विभागातील जंगले व पाऊस यामधील सबध स्पष्ट केला आहे. या प्रदेशात इ. स. १८७० ते १८७४ या चार वर्षात ३७४ दिवस पाऊस पडला. त्या काळात या प्रदेशात फारशी जगले नव्हती जगले वाढत असताना इ. स. १८८६ ते ९० या चार वर्षात ४१६ दिवस पाऊस पडला तर दाट जगलाची वाढ झाल्यावर इ. स. १९१८ ते २२ या चार वर्षात पावसाचे दिवस ४८१ झाले. पावसाचे दिवस मोजताना व्हीलकरनी जून ते ऑगस्ट या महिन्यातला पाऊस विचारात घेतलेला नाही. व्हीलकर याच्या सशोधनावरून जगल वाढते त्या प्रमाणात पावसाचे प्रमाण व दिवस वाढतात, असे म्हणता येते. व्हीलकरनी सुमारे ५० वर्षांची पावसाची आकडेवारी दिली आहे. पावसाच्या सदर्भात काही निश्चित सिद्धांत माडण्यासाठी पन्नास वर्षांचा कालावधी पुरेसा नाही हे त्याच प्रदेशातील १९७१ नंतरच्या सशोधनावरून सिद्ध झाले आहे. निलगिरी विभागात प्रचंड जगलतोड झाल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वनीकरण कार्यक्रम राबवून 'युकॅलिप्टस ग्रँडीस' ची जगले वाढविण्यात आली आणि पुढे पावसाचे प्रमाण कमी कमी होत असल्याचे दिसून आले. युकॅलिप्टसच्या लागवडीमुळेच पाऊस कमी झाला, अशी मोठ्या प्रमाणावर टीका होऊ लागल्यामुळे तामिळनाडू शासनाने सत्य शोधनासाठी तज्ज्ञ समिती नियुक्त केली. या समितीने सर्व पुरावे विचारात घेऊन, काळजीपूर्वक सशोधन केल्यावर आपल्या अहवालामध्ये स्पष्ट केले की, युकॅलिप्टसच्या लागवडीचा पाऊस कमी पडण्याशी कोणताच सबध नाही. तसेच पावसाचे प्रमाण कमीजास्त होण्याशी जगलाचा संबंध नाही. याचाच अर्थ असा की जगलामुळे पाऊस वाढत नाही तर पावसामुळे जगल वाढते हेच खरे.

पावसाशी जगलाचा सबध नाही म्हणून जंगलाचे महत्त्व काही कमी होत नाही. पर्यावरण सतुलनासाठी व जगल उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी कोणत्याही देशाच्या क्षेत्रफळाच्या ३५ टक्के क्षेत्र जगलव्याप्त असावे लागते. आपल्या देशात हे प्रमाण २० टक्क्यापेक्षा कमी आहे जंगलामुळे पाऊस वाढतो का नाही हा शास्त्रज्ञाच्या सशोधनाचा विषय आहे. आपल्या दृष्टीने मात्र जगले वाढविणे हा अग्रक्रमाने हाती घ्यावयाचा कार्यक्रम आहे. □

---

## मुंबापुरी ते गोहाटी : पृष्ठ ५ वरून

मुंबापुरी ते गोहाटी : पृष्ठ ५ वरून

खोडसाळ वार्तापत्रे दिली आहेत.'

बहुसंख्य आसामी लोकांना कलकत्याची वृत्तपत्रे आणि बगाली बाबू ह्यांच्याबद्दल थोडा राग आहे. ज्योती बसू हे कलकत्त्यात त्यांच्या तीन मजली घराच्या मधल्या मजल्यावर रहातात. वरचा मजला आणि तळमजला हे भाड्याने दिलेले आहेत. ज्योती बसूचा 'पोटार्थी साम्यवाद' स्पष्ट करताना भवानीप्रसाद म्हणून माझ्या एका आसामी पत्रकार मित्राने मला आसाममधली एक प्रचलित म्हण सागितली. या म्हणीचा मतितार्थ असा की, 'डोके भाड्याने द्यायचे आणि पाय भाड्याने द्यायचे. स्वतः मात्र पोटावर जगायचे'

### क्रायसिस ऑफ आयडेंटीटी

विरेंद्र भट्टाचार्य हे ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले आसामचे एकमेव लेखक. 'Assam a crisis of identity' ह्या पुस्तकात मी त्याचे छायाचित्र पाहिले होते. त्याचा पत्ता आणि फोन नंबर मला गोहाटी प्रेस क्लबमध्ये मिळाला. फोनवर त्याची वेळ ठरवून मी सकाळीच नऊ साडेनऊच्या दरम्यान त्याच्या घरी पोहोचलो. भट्टाचार्य हे समाजवादी विचारसरणीचे आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील एस्. एम् जोशी, मृणाल गोरे ही मडळी त्याच्या चागल्याच परिचयाची आहेत विधानसभेच्या निवडणुकीत मृणाल गोरे निवडून आल्या हे ऐकून त्याना आनद झाला.

भट्टाचार्यांनी नागालँडमध्ये शिक्षक म्हणून बराच काळ काम केले. तेथे त्याना जे अनुभव आले त्यावर त्यानी 'यारुइजेन' (yaruingen) म्हणजे लोकाचे राज्य अशा नावाची कादबरी आसामी भाषेत लिहिली. तिचे इग्रजी रूपातरही झाले आहे. त्यानी एकूण २३ कादंबऱ्या लिहिल्या आणि १०० हून अधिक कविता प्रसिद्ध केल्या. १९७९ साली त्यांच्या 'मृत्युजय' ह्या कादबरीला अनुलक्षून त्याना ज्ञानपीठ पारितोषिक देण्यात आले. सध्या ते आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष आणि साहित्य अकादमीचे उपाध्यक्ष आहेत.

भट्टाचार्यांसाठी मी बरेच प्रश्न काढून

ठेवले होते; पण आपल्याजवळ आंदोलनाबद्दल फारसे बोलण्यासारखे नाही असे ते म्हणाले. मी त्यांना 'आसाम, क्रायसीस ऑफ आयडेंटीटी' ह्या पुस्तकात त्यांचे भाषण करीत असतानाचे छायाचित्र पाहिल्याचे सांगितले. ते म्हणाले की, त्यांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले तेव्हा सरकारी नोकरांच्या संघटनेने त्यांचा सत्कार केला. त्यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना आंदोलनाविषयीही बोलण्याचा आग्रह केला. त्या प्रसंगी काढलेले ते छायाचित्र होते.

भट्टाचार्य आंदोलनाच्या संदर्भात बरेच बोलले पण प्रत्यक्ष आंदोलनाबद्दल मात्र फार कमी बोलले. ह्या आंदोलनाला सर्वसामान्य लोकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला आणि प्रथमच विद्यार्थी हे राजकीय शक्ती म्हणून पुढे आले असे ते म्हणाले. ज्या ज्या वेळेस राज्यकर्ते संसदीय मार्गाने केलेल्या विरोधाला जुमानत नाहीत, त्या त्या वेळेला हिंसाचार उफाळतो. गेल्या पाच वर्षांच्या काळात हिंसाचाराच्या ज्या काही घटना झाल्या त्या ह्या सरकारी दडपशाहीच्या धोरणाचा परिपाक होता असे ते म्हणाले.

निघण्यापूर्वी मी भट्टाचार्यांना एक प्रश्न विचारला. 'तुम्ही एकूण २३ कादंबऱ्या लिहिल्या. तुमचे बरेचसे लिखाण हे तुमच्या आसाम, नागालँड आणि इतर ठिकाणच्या अनुभवांवर आरधारलेले आहे. तुम्ही स्वत: आसामी आहात. गेली पाच वर्षे ह्या आंदोलनाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. ह्या प्रश्नावर तुम्ही काहीच कसे लिहिले नाही ?'

भट्टाचार्य क्षणभर स्तब्ध राहिले. मग म्हणाले की, आंदोलनावर पत्रकार किंवा लेखक म्हणून काही लिहावे असे अजून त्यांना वाटले नाही. ह्यापुढे वाटले तर कदाचित ते लिहितीलही. मी प्रश्नाचा पाठपुरावा केला नाही.

भवानीप्रसाद व्यवसायाने पत्रकार नाहीत. पण ते आसामच्याच एका साप्ताहिकात टोपण नावाने लेख लिहितात. आसामच्या प्रश्नावर ह्या ना त्या निमित्ताने त्यांनी १५० तरी लेख लिहिले असतील. माझ्या सर्वच अनुभवांबद्दल मी त्यांच्याशी चर्चा करीत असे. भट्टाचार्यांना मी विचारलेल्या प्रश्नाबद्दल मी त्यांना सांगितले.

उत्तरादाखल त्यांनी मला हितेश्वर सैकियांच्या सरकारने वापरलेल्या दडपशाहीच्या धोरणाची माहिती दिली. शर्मा नावाच्या एका मध्यमवर्गीय दांपत्याला त्यांच्या मुलाच्या अपराधासाठी बेड्या घालून भर रस्त्यातून चालत नेऊन तुरुंगात डांबले. ही हकिगत सांगून ते म्हणाले, गोहाटीत सर्वांना हा प्रसंग ठाऊक होता. मी दिल्लीला पीपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबर्टिज् (पीयुसिएल) ला लिहून कळवले. आठवडाभरात त्यांचे पत्र आले. त्यांनी लिहून कळवले होते की, 'गोहाटीत त्यांचा प्रतिनिधी आहे– विरेंद्र भट्टाचार्य–त्यांच्याकडे मी ही तक्रार नोंदवावी.'

मग थोडा वेळ थांबून ते म्हणाले

'As you go up your stakes are higer, Bhattacharya will not write on Assam agitation. He is Assam's registered intellectual.'

## बरुवा... सोनी... शर्मा...

उरलेल्या दिवसात मी सेंटिनल ह्या इंग्रजी वृत्तपत्राचे संपादक बेझ बरूआ, गोहाटी विद्यापिठातील पोलिटिकल सायन्स ह्या विभागाचे प्रमुख डी. पी. बरूआ, गोहाटीतील भारतीय जनता पार्टीचे सोनी, नेगिन शर्मा, बीना शर्मा नावाच्या स्त्री आंदोलक इत्यादी बऱ्याच लोकांना भेटलो. पंजाबप्रमाणेच आसामचेही दुखणे देशाला कायम बरोबर वागवावे लागेल असाच सर्वसाधारण सूर दिसला. बरुआना सरकारचे धोरण आडमुठे वाटते, तर बेझ बरूआंना आसुच्या ताठर भूमिकेमुळे प्रश्न सुटायला उशिर लागत आहे असे वाटते. परकीय नागरिकांची नावे मतदार यादीतून गाळणे, भारत बांगला देश सरहद्दीवर कुंपण उभारणे आणि काही प्रमाणात ह्या परकीय नागरिकांचे देशातील इतर भागात स्थलांतर करणे ह्याच तीन उपायांवर जवळजवळ प्रत्येकाचा भर होता.

आंदोलनाच्या सुरवातीच्या काळात आसुची संघटना आणि त्यांचे कार्य नेत्रदीपक होते. परंतु तात्कालिक प्रश्न सोडविण्यासाठी कोणत्याही मूलभूत विचारसरणीवर न आधारलेली अशी संघटना जेव्हा बांधली जाते तेव्हा जितका अधिक काळ लोटावा तितके मूळ उद्दिष्टाला फाटे फुटू लागतात. Anything that is Sustained over a period of time tends to deterirate. आसुही त्याला अपवाद नाही.

घासून गुळगुळीत झालेला हा विषय असे म्हणूनही त्यावर आम्ही लेखणीला धार लावत बसलो. असो. पत्रकारांच्या स्वभावाला औषध नाही. आसाम आंदोलनांवर काही लिहू नये असे म्हणता म्हणता शेवटी एवढे लिहून झालेच. आणखीही बऱ्याच लोकांच्या गाठीभेटी झाल्या. पण त्यात सांगण्यासारखे नवे काही नाही. मुंबापुरी सोडूनही आता तीन आठवडे उलटले होते. त्यामुळे आता त्या उकाड्याचीही ओढ वाटायला लागली होती. गोहाटीहून मजल दरमजल करीत आम्ही मुंबापुरीच्या वेशीवर पोहोचलो तेव्हा वाघाच्या डरकाळ्या कानी आल्या. आमच्या गैरहजेरीत मराठी माणसाच्या अस्मितेने मुंबई महानगरपालिकेचा चेहरामोहराच पालटून टाकला हे एव्हाना तुम्हाला समजले असेलच.

राज्यपाल इद्रिस लतिफ आणि बेगम बिल्किस लतिफ (त्यांना मिसेस लतिफ म्हटलेले आवडत नसे.) ह्यांना आम्ही तुमच्याप्रमाणेच वर्तमानपत्रांतून पहात वाचत होतो. त्यामुळे आमच्या गैरहजेरीत ते पॅरीसला गेल्याचे सुखदुःख आम्हाला नाही. आता एकदा 'बॉम्बेची' 'मुंबई' झाली की रस्त्यावरचे खड्डे, लोकलमधली गर्दी, गल्ल्यांमधला कचरा हे सारे कसे पुढील पाच वर्षे सुखावह होईल याची आम्हाला खात्री वाटायला लागली आहे. आम्ही मात्र सदराचे नाव पहिल्यापासून मुंबापुरीच ठेवले आहे. त्यामुळे मराठी माणसाला तक्रारीला जागा नाही !

गेल्या सहा वर्षात आसामचा प्रश्न काही सुटला नाही परंतु आंदोलन सुरू झाल्यापासून गौहाती स्थानकाचे नाव मात्र बदलून गुवाहटी असे लिहिण्यात आले आहे.

□

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28


# राजहंसची दोन नवीन प्रकाशने

मराठी माणसाला "नाटक" हा आणखी एक अवयव विधात्याने बहाल केला आहे. असे अनेक कलावंत आहेत की आपली वहिवाटीची वाट सोडून नाटकाच्या बिकट वाटेकडे वळले आहेत. म्हणूनच आपली मराठी रंगभूमी एक वेगळाच घाट घेऊन मानाने मिरवीत आहे. रंगभूमीच्या या हृद्य आठवणी अगत्याने सांगण्याचा हेतु इतकाच की, आजच्या पिढीला आपल्या पूर्वसुरींची ओळख व्हावी, आठवण रहावी नि त्यांच्याबद्दल सदैव कृतज्ञता वाटावी.

साप्ताहिक माणूस मधील
गाजलेल्या लेखमालेचा संग्रह

## नाट्यपंढरी

गो. रा. जोशी

किंमत वीस रुपये

## ऊर्जा प्रश्न
### आशा उद्याच्या

प्रि. खं. कुलकर्णी

किंमत पंचवीस रुपये

श्री. कुलकर्णी यांनी या पुस्तकात ऊर्जेच्या प्रश्नासंबंधी माहिती, आपल्या देशाच्या संदर्भात दिली आहे आणि तिच्या वापरासंबंधी सर्वांची जबाबदारी काय आहे याविषयी चांगले विचार मांडले आहेत. निरंतर मिळणाऱ्या ऊर्जेच्या उपयोगासाठी माणसाचे काय प्रयत्न चालू आहेत आणि भावी काळात त्यांची दिशा काय राहील याचेही चांगले दर्शन मिळते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही सर्व शास्त्रीय माहिती व आकडेवारी, किचकट न करता, सुलभ भाषेत सांगितली आहे. विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य वाचकांना, ऊर्जेची आजची समस्या, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याविषयी सोपी परंतु मूलभूत माहिती या पुस्तकाद्वारे होईल, असे वाटते.

वि. ग. भिडे
कुलगुरु
पुणे विद्यापीठ

## राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०
फोन : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे ४१, भवानी शंकर रोड, चितळे पथ कॉर्नर
जोशी वाडी, दादर (प.) मुंबई ४०० ०२८ फोन : ४२२५४५५